
मॉडर्न

PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S

# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE

## POONA 5.

### Our Faculty 1978-79

## Heads of the Departments

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Dr. L. H. Gadgil, Principal | M.Sc., Ph.D. | Chemistry |
| 2. | Prof. S. Y. Gambhir Vice-Principal | M. Sc. | Physics |
| 3. | Prof. P. S. Chirputkar Vice-Principal | M.Sc. (Maths) M.Sc. (Stats) | Mathematics and Statistics |
| 4. | Dr. B. B. Kulkarni, | M. A., Ph.D. | Marathi |
| 5. | Dr. S. Y. Paranjape | M.Sc., Ph.D. | Biology |
| 6. | Prof. S. R. Raykar | M. A., D. T. E. | English |
| 7. | Prof. M. S. Mahajan | M. A. | Economics |
| 8. | Prof. S. G. Datar | B. A., M.Com. | Commerce |
| 9. | Prof. Dr. (Mrs.) S. S. Vanarase | M.A. Ph.D. | Psychology |
| 10. | Prof. P. D. Apte | M. A. | Geography |
| 11. | Dr. S. N. Navalgundkar | M.A., Ph.D. | Political Science |
| 12. | Prof. M. R. Bhave | B.Com., F.C.A. | Accountancy |
| 13. | Prof. P. D. Parkhi | M.Sc., I C.W.A. | Cost Accounting |

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५

संपादन समिती


प्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ, **अध्यक्ष**
उपप्राचार्य प्रा. स. य. गंभीर, **उपाध्यक्ष**
उपप्राचार्य प्रा. व. स. चिरपुटकर, **उपाध्यक्ष**
प्रा. म. रा. मराठे, **सदस्य**
डॉ. मु. त्र्यं. धायगुडे, **सदस्य**
प्रा. जयंत जोरवेकर, **सदस्य**
डॉ. र. वि. गंधे, **सदस्य**
श्री. दशपुत्रे, **सदस्य**
रमेश हंडे, **विद्यार्थी प्रतिनिधी**


# मॉडर्न ७८-७९


संपादक
सीताराम रायकर

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय, पुणे ३०

ठसे
सुप्रीम प्रोसेस, पुणे ३०

प्रकाशक
प्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ


**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५**

# ग्रंथालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन



पाचव्या पंचवार्षिक योजनेखाली विद्यापीठ अनुदान मंडळाच्या आर्थिक साहाय्याने मॉडर्न महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची इमारत बांधण्यात येत आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाव्यतिरिक्त पुण्यातील दानशूर प्रसिद्ध उद्योगपती श्री. गिरिधरलालजी पित्ती यांनी पित्ती चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ग्रंथालय वास्तूसाठी एक लाख रुपयांची बहुमोल देणगी दिलेली आहे.

# संपादकीय

मॉडर्न महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकाचा हा नववा अंक आपल्या हाती देताना आम्हांस अतिशय आनंद होत आहे. हा अंक म्हणजे १९७८-७९ मधील कॉलेजच्या सर्वांगीण प्रगतीचा एक आलेखच आहे.

तीन वर्षांमागे सुरू करण्यात आलेला १०+२+३ ह्या आकृतिबंधातील +२ हा टप्पा आता महाविद्यालयांमधून स्थिरावला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आपल्या महाविद्यालयातील अकरावीच्या तुकड्यांत यंदा वाढ करण्यात आली. यंदा अकरावीच्या सात तुकड्या सुरू करण्यात आल्या.

या वर्षीच्या शेवटी उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने भाषाविषयक अत्यंत रास्त व विवेकी धोरण स्वीकारले असल्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांतील एक विसंगती दूर झाली आहे. यापूर्वी इंग्रजी, मराठी आणि हिंदी या भाषांचे निम्न आणि उच्च असे स्तर असत. या स्तरांकरिता देण्यात येणाऱ्या तासिकांची संख्या भिन्न असे. तशातच इंग्रजी उच्च स्तर घेणाऱ्यांना अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शाखांकडे प्रवेश मिळणार असे तर्कदुष्ट धोरण ठरविले गेल्यामुळे अनेक कुवत नसलेले विद्यार्थी इंग्रजी (उच्च स्तर) घेत व परिणामतः त्यांची अक्षरशः ससेहोलपट होत असे. उच्च स्तर असल्याने पुस्तक अवघड व तासिकांची अपुरी संख्या यांमुळे शिक्षकवर्गाचीही कुचंबणा होत असे. तथापी येत्या (१९७९-८०) वर्षापासून अकरावीला व १९८०-८१ पासून बारावीला भाषा विषयाचा एकच स्तर राहील व प्रत्येक भाषेला दर आठवड्याला पाच तासिका असतील, असे स्पष्ट निवेदन मंडळाने केले असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांनाही हायसे वाटले आहे. मंडळाच्या धोरणातील या रास्त बदलाचे आम्ही स्वागत करतो.

कनिष्ठ महाविद्यालयाची घडी अशा प्रकारे व्यवस्थित बसत असताना, सत्र पद्धती सुरू करण्यात आलेल्या वरिष्ट महाविद्यालयातील वातावरण मात्र अस्थिर आहे व ही अस्थिरता नजीकच्या काळात दूर होईल असे दिसतही नाही. पूर्वीच्या पद्धतीमध्ये परीक्षांसाठी जाणारा वेळ

खूपच कमी होता. परिणामतः क्वचित निकाल उशिरा लागले तरी महाविद्यालयांतील तास वेळेवर सुरू होण्यावर त्याचा फारसा परिणाम होत नसे. नवीन सत्र पद्धतीमुळे परीक्षेसाठी लागणारा वेळ खूपच वाढला आहे. परीक्षा दोन महिन्यांहून अधिक काळ चालतात, नंतर निकाल. या सर्व गोष्टी होईपर्यंत प्रत्येक सत्रातील कित्येक दिवस निघून जातात. महाविद्यालयांना असलेल्या सुट्ट्या, अभ्यासतेर उपक्रमांसाठी काढून ठेवावे लागणारे दिवस व इतर अनुषंगिक अभ्यासविरहित दिवस लक्षात घेता १४ आठवड्यांचे सत्रच मुळात अपुरे आहे; त्यात उशिरा निकाल लागल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या अडचणींत भरच पडते. पहिल्या परीक्षेचा निकाल कळल्याशिवाय दुसऱ्या सत्राला जाण्यास विद्यार्थी अनुत्सुक असतात. (काही ग्रामीण विभागातील काही महाविद्यालयांत तर विद्यार्थी निकाल हाती लागल्याशिवाय महाविद्यालयात येतच नाहीत अशी परिस्थिती आहे.) त्यामुळे शिक्षक वेळात अभ्यासक्रम आटोपायचा म्हटले तर विषयाचा व्यापक संदर्भ ध्यानात ठेवून तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अशक्यच आहे. विद्यार्थी पहिल्या दिवसापासून प्रश्नपेढीच्या अनुरोधाने अभ्यास घेतात व शिक्षकाला मागणी तसा पुरवठा या तत्वाचा अंशतः का होईना स्वीकार करावा लागतो. अशा प्रकारे अभ्यास व विषयाचा उडत उडत परिचय असलेले पण अंतर्गत चाचण्या आणि विद्यापीठीय चाचण्या यांच्या बाबतचे परीक्षा तंत्र हस्तगत केलेले विद्यार्थी बहुसंख्य होण्याची साधार भीती आताच निर्माण झाली आहे. अंतर्गत चाचण्या हीही एक गंभीर समस्या होऊ पाहत आहे. अंतर्गत चाचणीला पुनःपुन्हा बसण्याची सवलत विद्यापीठाने दिलेली असल्यामुळे पूर्वावशेष (backlog) चाचण्या किती वेळा घ्याव्यात याला मर्यादाच उरलेली नाही. या सर्वांची योग्य प्रकारे नोंद ठेवणे हे प्राध्यापक व कार्यालयातील कर्मचारी या दोघांच्याही दृष्टीने अतिशय जिकिरीचे होऊ लागले आहे. सत्र पद्धतीचा एक महत्वाचा भाग म्हणजे ठराविक अभ्यासखंड ठराविक मुदतीत पुरा करावयाचा आणि त्यावर चाचणी देऊन विद्यार्थ्याने पुढील खंडाकडे जायचे, पण सध्याचा अनियमिततेमुळे अंतर्गत चाचणी, पुनःर्चाचणी, पुनपुनर्चाचणी आणि परीक्षा झाल्यावर आवश्यक वाटल्यास पुढच्या वर्षी पुन्हा चाचणी या प्रकारामुळे सत्र पद्धतीतल्या एका महत्वाच्या अंगाची चेष्टा होत आहे. ‘सध्या मिश्रपद्धतीमुळे त्रास होतो आहे. सत्र पद्धती सर्व वर्गांना लागू झाली की परिस्थिती सुधारेल’ या आशावादाला फारसा आधार नाही. फक्त सम सत्रांच्या किंवा विषम सत्रांच्या परीक्षा घेतल्यानेही सत्र पद्धतीने निर्माण केलेले सर्व प्रश्न सुटतील असे नाही. सध्याचे उपाय केवळ मलमपट्टीच्या स्वरूपाचे आहेत. सत्र पद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे पुन्हा एकदा सखोल परीक्षण करून त्यातील अपायकारक गोष्टींचे निराकरण आताच केले पाहिजे असे वाटू लागले आहे.

आपल्या महाविद्यालयाच्या गौरवात भर टाकणाऱ्या काही घटनांचा उल्लेख येथे केला पाहिजे.

या वर्षी आमच्या प्राध्यापक सहकाऱ्यांपैकी तिघांनी आपापल्या विषयामध्ये Ph.D. ही अत्युच्च पदवी मिळविली याचा आम्हांला अभिमान व आनंद वाटतो. डॉ. सु. व्यं. धायगुडे यांनी इंग्रजी विषयात डॉक्टरेट मिळविली. त्यांच्या संशोधनाचा विषय Some Aspects of Indian and Western Poetics, हा होता. डॉ. काटदरे यांनी जीवशास्त्र विषयामध्ये Invitro studies of the effect of Actinomycene-D on the morphogenesis of chic embryos in order to understand the mechanism of its action, आणि डॉ. गंधे यांनी Smuts in Maharashtra या विषयांवर संशोधन करून Ph.D. ही पदवी मिळविली. कॉलेजचे काम सांभाळून ही उच्च पदवी प्राप्त करून घेणाऱ्या आमच्या सहकाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो. या वर्षी आमच्या अनेक सहकाऱ्यांनी संशोधनपर लिखाण केले व महाविद्यालयीन पाठ्यपुस्तके लिहिली. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन. ग्रंथपाल श्री. द. गो.

बापट व कार्यालयातील श्री. प्रकाश खोपकर यांची शिक्षकेतर कर्मचारी संघटनेवर निवड झाली. त्यांचे पण आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो.

१९७८-७९ या वर्षात आमचे काही सहकारी प्राध्यापक मित्र महाविद्यालय सोडून गेले तसेच नवीन काही सहकारी महाविद्यालयात दाखल झाले. या नवागतांचे आम्ही स्वागत करतो करतो व महाविद्यालय सोडून गेलेल्या आमच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा व्यक्त करतो.

गेल्या दोन वर्षाप्रमाणे यंदाही कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे साहित्य या नियतकालिकामध्ये दिले आहे. साहजिकच अशा प्रयोगामुळे या साहित्याचा दर्जा काहीसा उंचसखल राहतो. तथापि आमच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांमधील लेखनगुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या लेखनप्रयत्नांना उत्तेजन देणे आम्ही अधिक महत्त्वाचे मानले आहे. या दृष्टीने य. गो. जोशी यांच्या कादंबरीवर शास्त्र विभागाच्या दोन विद्यार्थ्यांनी प्रकट केलेल्या प्रतिक्रियांचा आम्हांला विशेष उल्लेख करावासा वाटतो. यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे होत आहे. या विषयावरही मानसशास्त्र विभागातील एका विद्यार्थिनीने लिहिलेला एक विशेष लेख आम्ही देत आहोत.

नियतकालिक प्रकाशित झाल्यानंतर संपादकांना अनेक पत्रे येतात. ती नियतकालिकाचे कौतुक करणारी जशी असतात तशीच कळत न कळत झालेल्या वाङ्मय चौर्याविषयी तक्रारी करणारीही असतात. अशा पत्रांना उत्तर देणे हा एक क्लेशदायक अनुभव असतो. मराठीतील पुस्तकांतून व मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या संपूर्ण वाङ्मयाशी संपादकांचा परिचय असणे सर्वस्वी अशक्य आहे. तरीसुद्धा वाङ्मय चौर्याचे काही प्रकार कोणाला आढळल्यास संपादक अगाऊच दिलगिरी व्यक्त करीत आहेत. अशा वाङ्मय चौर्याचे बळी झालेले लेखक संपादकांची याबाबतची असहायता लक्षात घेतील अशी अशा आहे.

नियतकालिक आणि तेही प्रगतिपथावरील महाविद्यालयाचे नियतकालिक संपादित करणे, व ते वेळेवर प्रकाशित करणे; ही तशी अवघडच गोष्ट. पण संपादन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ यांनी प्रत्येक गोष्टीत जातीने मार्गदर्शन केले. उपप्राचार्य, समितिसदस्य प्रा. संगोराम, डॉ. धायगुडे, प्रा. मराठे, श्री. जोवेंकर, डॉ. गंधे आणि प्रा. दशपुत्रे यांनी कामाचा भार उचलला. भूतपूर्व संपादक प्रा. पुंडे यांनी या अंकाच्या घडणीत प्रथमपासून लक्ष घातले व त्यांच्या अनुभवाचा फायदा आम्हांस करून दिला. इतर प्राध्यापकांनी विविध छोटी मोठी कामे सुकर व गतिमान केली. कार्यालय अधीक्षक श्री. देशपांडे, ग्रंथपाल श्री. बापट आणि इतर सेवकवर्ग यांनी महत्त्वपूर्ण तपशील तत्परतेने सादर केला.

विश्वकर्मा मुद्रणालयाचे श्री. निनाद माटे आणि ब्लॉकमेकर श्री. खाडिलकर यांनी अल्पमुदतीत छपाई व ठसे यांचे कार्य उरकले.

या साऱ्यांचे आणि अंक सिद्ध करताना साहाय्यभूत झालेल्या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

**रमेश हुंडे**
विद्यार्थी-प्रतिनिधी

**सीताराम रायकर**
संपादक

# कवी, कविता आणि वाचक — एक अनोखी बातचीत



कविता हा एक अनोखा साहित्यप्रकार आहे. किंबहुना अन्य साहित्यप्रकारांपेक्षा हा संपूर्णतः वेगळा साहित्यप्रकार आहे. कविता मनाला भावते, मनात घर करून बसते. कविता हा काव्यप्रकार तिच्या संवेदनशीलतेमुळे नित्य प्रयोगशील बनलेला आहे. या प्रयोगशीलतेमुळे कवितेवर बरेचसे आरोप केले जातात. समीक्षकांच्या धारदार नजरांतून किंवा वाचकांच्या प्रांजळ मनांतून निर्माण होणारे असे विविध आरोप प्रत्यक्ष कवीला मान्य असतात का? कविता या साहित्यप्रकाराबाबत प्रत्यक्ष कवीचे स्वतःचे असे काही चिंतन असते का? या दृष्टीने एक शोध घ्यावा म्हणून वासंती इनामदारशी केलेली ही बातचीत.

वासंतीकडे हा हेतू मनात ठेवून आम्ही गेलो पण गप्पा खूप रंगल्या आणि आम्हांला जाणवलं की आम्ही खऱ्या अर्थानं एका कवितेजवळच येऊन पोहोचलो आहोत. अर्थात 'वासंती इनामदार' हे नाव मॉडर्न महाविद्यालयाच्या परिसरात कुणालाही अपरिचित नसावं. १९६० पासून अवघ्या दीड तपाच्या कालावधीत व तेही शालेय, महाविद्यालयीन जीवनात २००० वर कविता, दोनशेच्या वर कथा व चार कादंबऱ्या एवढं साहित्यविश्व तिनं निर्माण केलं. तिच्या 'माझी बडबड गाणी' या बालगीत संग्रहाला राज्यपुरस्कार मिळाल्याचे सर्वश्रुतच आहे.

**रवींद्र खरात**, तृतीयवर्ष वाणिज्य
**मनोहर सोनवणे**, तृतीयवर्ष वाणिज्य

'कवी म्हणून तुला प्रथम प्रसिद्धी कधी मिळाली?'

'प्रसिद्धीला प्रथम सुरुवात पुणे आकाशवाणीच्या बालोद्यानातून झाली. त्यानंतर लहान मुलांच्या मासिकांतून. मात्र सातत्याने लेखन प्रसिद्ध होत गेले ते मात्र १९६० पासून.'

'याबाबत तुला कुणाचं प्रोत्साहन किंवा मार्गदर्शन मिळाले का?'

'तसं जाणीवपूर्वक मार्गदर्शन कुणाचंच मिळालं नाही असं म्हटलं तरी चालेल. आत्मनिरीक्षणातूनच लेखनाचा विकास झाला. अर्थात त्यामुळेच बरेचसे दोष माझ्या लेखनात राहिले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्व लेखन केले ते अंतःस्फूर्तीनेच.'

'तू कवितांव्यतिरिक्त ललित साहित्याचे इतर प्रकारही हाताळलेस. पण कवितेतच अधिक रमलीस असं का?'

'माझा मूळ पिंड कवितेचा. प्रकाशकांनी कादंबरी क्षेत्रात ओढले आणि नियतकालिकांच्या संपादकांनी लघुकथा, लेख लिहिण्यास प्रवृत्त केले असं म्हटलं तरी चालेल.'

'आजच्या कवितेच्या अभिव्यक्तीत तोचतोचपणा जाणवतो असं वाटतं. तुझं काय मत आहे यावर?'

'खरं सांगू का मनोहर? तोचतोचपणा जाणवतो आहे हे नक्कीच. आतापर्यंत मी बऱ्याचशा काव्यस्पर्धांचे परीक्षण केलेले आहे. त्यासाठी येणाऱ्या असंख्य कवितांच्या बाबतीत तू म्हणतोस तेच सतत जाणवत गेलं. पण असं जरी असलं ना तरीही काहींच्या कवितांमधून हे समजूत आलं की कविता ही प्रयोगशील होत चाललीय. आणि आताच्या कवितांबाबत सततच्या गतिमान प्रयोगशीलतेमुळे बा. सी. मर्ढेकरांच्या वेळी वाटला तसा 'अचानक' धक्का कुठे वाटत नाही.'

'कवितेच्या या बदलत्या स्वरूपामुळे ती अधिक गूढ होते आहे. सर्वसामान्य वाचक ती जाणू शकत नाही म्हणून कवितेची लोकप्रियता संपेल का? कवितेची लोकप्रियता कशी टिकू शकेल? आजची नियतकालिकं आणि प्रकाशनं याबाबत काय करू शकतात?'

'तुझ्या या प्रश्नाचं उत्तर थोडक्यात देता येणं जरा

कटीणच वाटतं बघ रवींद्र. पण तू म्हणतोस कविता गूढ होते आहे म्हणजे निश्चितपणानं काय होते आहे? कविता ही सर्वसामान्य वाचक जाणू शकतो अथवा नाही यावर ती गूढ आहे अथवा नाही असं ठरविता येतं का? आणि मुळात म्हणजे कविता गूढ असते का हाच प्रश्न मला तुम्हांला दोघांना विचारायचा आहे. असं पहा आताच्या या नव्या 'इडियम'मधली कविता लिहिणारे जे कवी आहेत त्यांच्यावर ते फार दुर्बोध लिहितात असा आरोप करण्यात येतो. तुम्हांला कविता गूढ म्हणजे दुर्बोध असंच म्हणायचं आहे का? माझ्या मते कविता गूढ कधीच नसते आणि ती दुर्बोधही नसते. कवितारूपाने व्यक्त होणाऱ्या एका अनन्यसाधारण अनुभूतीला तिची स्वतःची अशी एक लय असते आणि आजची कविता ही संवेदन घडवू पाहते आहे. त्यामुळेच त्यात प्रतिमांचे आधिक्य दिसून येते. मात्र त्यामुळे ती दुर्बोध होण्याचे अजिबात कारण नाही. कवितेतला आशय हा कवितेतूनच अनुभवायचा असतो आणि तुम्ही म्हणता तशी गूढता सर्वसामान्यांना वाटत असली तरी त्यातली भावोत्कटता रसिकाला जाणवल्याशिवाय राहत नाही. कवितेचा वाचक हा थोडा निराळा मानण्यात येतो ना ते याच अर्थी. 'हा फळा आहे आणि ही खडूची पेटी आहे.' हे वाक्य सर्व थरातील वाचकांना समजते. कवितेबाबत अशी अपेक्षा ठेवायची का? कविता ही रसिकबोध असते. ती बालबोध नसते. रसिकांचे कवितेतील आशयाशी सहसंवाद जुळणं महत्त्वाचं असतं. कुठल्याही कवितेची भाषा ही रसिकाच्या आकलनयोग्य असतेच. ती प्रतीती देणारी असते आणि त्यामुळे कवितेचे उद्दिष्ट हे परसापेक्ष असले पाहिजे ही धारणाच मुळात चुकीची आहे. मी तर म्हणेन कविता दुर्बोध आहे असं जे म्हणतात त्यांना कुठलीही कविता सर्वार्थाने समजणंच अशक्य आहे. किंबहुना त्यांनी कवितेची वाट सोडून पुढं जावं. कुठल्याही कवितेची आस्वाद्यमानता अमुक एखाद्या घटकावर आहे आणि सर्वसामान्य वाचक तो घटक जाणू शकेल वगैरे वगैरे विधानं निरर्थकच म्हटली पाहिजेत. कविता ही रसिकप्रिय असते आणि तशी ती राहणारच. आजची नियतकालिकं याबाबत कळत, नकळत स्पर्धेतून, कवितांना स्वतंत्र विभाग जाणीवपूर्वक देऊन अथवा काहींच्या कविता आणि त्यावर कवीचे भाष्य इत्यादी प्रकारांतून कवितांबाबत चोखंदळपणा दाखवीत आहेत. प्रकाशनाबाबत मात्र मी काही बोलू इच्छित नाही.

'ललित साहित्यातील अन्य विभागांपेक्षा कविता अधिक प्रभावी आहे असं तुला वाटतं का?'

'म्हणजे कविता हा सर्वश्रेष्ठ प्रकार आहे का असंच ना? निश्चितच आहे. इतर ललित साहित्यप्रकारापेक्षा कविता ही अत्यंत अल्प अक्षरांनी स्वतःच्या जाणिवार्थ आणि अनुभूत्यर्थ रसिकांमध्ये संक्रांत करण्याचा प्रयत्न, तोही सर्वार्थाने करते. आणि त्या प्रयत्नात यशस्वी होते आहे. तसे यश इतर प्रकारांना लाभत असेल असे वाटत नाही. पु. शि.च्या कविता त्या दृष्टीने लक्षणीय ठरतात.'

'व्यापार क्षेत्रात जाहिरातीसाठी किंवा एखादे उत्पादन लोकप्रिय करण्यासाठी कविता किंवा 'कोटेशन्स' करणं योग्य आहे का? की तसे करू नये?'

'व्यापारी क्षेत्रात जाहिरातीसाठी कवितांचा उपयोग करणं किंवा उत्पादन लोकप्रिय करण्यासाठी त्यांचा वापर करणं ही पद्धत त्याज्य मानली पाहिजे असं नव्हे. पण ती फारशी चांगलीही म्हणता येणार नाही. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' असा प्रकार तेथे सुरू होऊ लागतो आणि मग त्याला वाङ्मयीन, साहित्यिक मूल्य उरतच नाही. पण एखाद्या कवीचे एखादं चांगलं 'कडवं' किंवा 'चरण' उत्पादकाला योग्य वाटत असेल तर त्याला ते वापरू देण्यास साहित्यिकाची हरकत नसावी. इतरांना जर सर्व गुन्हे माफ असतील तर साहित्यिकांनाच का नसावेत? पण केवळ पैशासाठी स्वतःचं साहित्य विकणं केव्हाही गैरच.'

'मानधन हा प्रकार साहित्य निर्मितीइतकाच मोलाचा आहे का?'

'मानधन हा प्रकार साहित्य निर्मितीइतका मोलाचा नसला तरी तो मोलाचा आहे हे निश्चित. त्याचे कारण फक्त आर्थिक नाही तर मानसिक आहे. इथे जीवनव्यवहारातली नाण्याची किंमत आणि साहित्यातल्या शब्दांची किंमत यात फरक असला तरी आपल्या साहित्यकृतीचे कौतुक 'नाण्या'च्या स्वरूपातही बरे वाटते.'

'मग साहित्यिकांना शासनानं दिलेल्या पारितोषिकांवर उठलेल्या गदारोळाबाबत काय?'

'मानधन हे साहित्यनिर्मितीला मर्यादित प्रमाणात का होईना स्फूर्तिदायक ठरते हे नाकारण्यात अर्थ नाही. पुस्तकांना देण्यात येत असणाऱ्या सरकारी पारितोषिकांवर अलीकडच्या काळात जे काहूर उठले होते आणि लेखकांनी त्यावर बहिष्काराचा जो स्टंट केला होता त्याला विशेष अर्थ नाही.

ते चंद्रबळ म्हटले पाहिजे. इथे प्रश्न महत्त्वाचा आहे तो पारितोषिक देण्याची पद्धत शुद्ध कशी होईल एवढाच.'

'मुलाखत लांबत चाललीय खरी, पण महाविद्यालयीन साहित्याच्या दृष्टीने एक प्रश्न विचारावासा वाटतो, आजच्या महाविद्यालयीन नियतकालिकांचे स्वरूप पाहता बरेचसे लोक त्याला बालिश आणि किमान दर्जा देतात. तुला काय वाटतं?'

'महाविद्यालयीन साहित्य हे बरंचसं अपरिपक्व असतं. त्यात अनुकरणाचा भाग फार मोठ्या प्रमाणात असतो. पण तेही नीट नसतंच. लेखांचा दर्जा किमान तसेच चाकोरीबद्ध व ठरीव विषयांवरील लेखन यामुळे हा प्रकार बालिश या सदरात मोडू शकतो, पण तरीही 'बी. जे.' 'इंजिनिअरिंग' इत्यादींची नियतकालिके उत्तम दर्जाची, चांगली वाटतात. त्यातल्या काही कविता तर प्रथितयश कवींपेक्षाही दर्जेदार वाटतात. पण अशी नियतकालिकंही थोडी आणि साहित्यही थोडं. बस्स. याबाबत एवढंच म्हणता येईल.'

'आजच्या प्रथितयश कवींमध्ये तुला कुणाच्या कविता प्रिय आहेत?'

कुसुमाग्रज, बोरकर, पु. शि. रेगे, आरती प्रभू यांच्या कविता मला प्रिय आहेत आणि अलीकडच्या कवींमध्ये काही प्रमाणात ग्रेस. खरं तर कवी आवडण्यापेक्षा कविता आवडणं म्हणजेच जाणवणं महत्त्वाचं असतं. त्यामुळे माझ्या संवेदनशील मनाला, माझ्या जाणीवविश्वाला भिडणारी कविता ज्याची कुणाची असेल तो मला प्रिय असणार. माझ्या मते कवी कोण यापेक्षा त्या कवितेचे स्फुरण कसे आहे तेच मला महत्त्वाचे वाटते. त्यातले भावमूल्य महत्त्वाचे वाटते. त्यामुळेच आजच्या नवकाव्याने जे नवीन 'अर्थतंत्र' रसिकांपुढे आणण्याचे प्रयत्न चालविलेले आहेत ते मला मनापासून आवडतात.'

'खरं सांगायचं तर अजून बरंच विचारायचं आहे पण..'
'पण किती विचारायचं असंच ना? खरं तर महाविद्यालयीन नियतकालिकांच्या दृष्टीने आपल्या ह्याच गप्पा खूप झाल्या. नाही का?'

□

## किती सजल्या चांदण्या

किती सजल्या चांदण्या
झाले नभ अमृताचे
स्वप्न चांदण्या गोजिऱ्या
गूज जपले हृदीचे ॥ १ ॥
असे जपू जपू झाले
सये घनगर्द नक्षी
किती उखाणे टिपणे
प्रीत सावळीशी वक्षी ॥ २ ॥
किती सजल्या चांदण्या
किती सावरू ओंजळ
क्षण इवल्या पाऊली
अशी लाजरीशी धूळ ॥ ३ ॥

**वासंती**

## रामपण

माझ्या अस्तित्वाच्या
कोळ्याकभिन्न शिळेवर
तुझा रामस्पर्श उतरू दे...
जीर्ण आश्रमातले ऋषी
हात उंचावून आशीर्वाद देतील...
चांदण्यांचे धुंद शिल्प वागवणारे आभाळ
तेजवृष्टी करेल... थांब थांब
मला तुझ्या पायाचे दर्शन घेऊ दे
तुझे रामपण
संपून जाण्याच्या आत...!
तुझे रामपण संपून जाण्याच्या आत

**वासंती**

# क्रीडा संघटना व्यवस्थापन समिती



बसलेले (डावीकडून) कु. नातू (I.C.S.R.), प्रा. पाथरे, श्री. छाब्रा, प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. गंभीर, प्रा. नवलगुंदकर श्री. मोहन हेगडे (I.C.S.R.)

उभे : पहिली रांग (डावीकडून) : श्री. पाटील, श्री. पाटील, श्री. देशमुख, श्री. गायकवाड, कु. कुलकर्णी, श्री. ललवाणी, श्री. जाधव श्री. मठाधिकारी, श्री. हंडे.

दुसरी रांग (डावीकडून) : श्री. उत्तेकर (सेवक), श्री. पवार (सेवक), श्री. पारखी, श्री. आजबे, श्री. डांगे, श्री. सासवडे, श्री. माळी (सेवक)

## विद्यापीठ युवक महोत्सव (१९७८-७९



बसलेले (डावीकडून) : श्री. शहा; प्रा. जोरवेकर; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ प्रा. गंभीर; प्रा. सौ. अनुराधा कुलकर्णी

उभे पहिली रांग (डावीकडून) : कु. प्रधान; कु. हांडे; कु. पुंडले; कु. पाटणकर; कु. पटवर्धन; कु. भडगावकर कु. खैरे; कु. भिडे; कु. अभ्यंकर; कु. पाठक

उभे दुसरी रांग (डावीकडून) : श्री. घोलप; श्री. राऊत; श्री. विद्वांस; श्री. सातभाई; श्री. आजबे; श्री. दिवेकर; श्री. वेलणकर

## शारीरिक शिक्षण-गटनायक




बसलेले (डावीकडून) कु. हंडे; श्री. देशमुख; श्री. पाटोळे; श्री. लिमये; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ प्रा. गंभीर; श्री. छाब्रा; श्री. मठाधिकारी; कु. कदम

उभे पहिली रांग (डावीकडून) : कु. बावडेकर, कु. जोशी; कु. ललवाणी; कु. चिरमुरे; कु. लालीहळद कु. नखणे; कु. देशपांडे; कु. भिडे; कु. शहा; कु. गद्रे; कु. नगरे कु. अगरवाल; कु. सावंत; कु. गणपुले

दुसरी रांग (डावीकडून) : घोलप; श्री. जगताप; श्री. भोसले; श्री. कर्णिक; श्री. आब्रचेट्टी; श्री. सातव, श्री. सिध्धू श्री मेंढेदळे; श्री जोशी; श्री पाडवे; श्री सर्वे; श्री सैंगर; श्री भोसले

## वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा



बसलेले (डावीकडून) : प्रा. नवलगुंदकर, प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. गंभीर, प्रा. आपटे
उभे (डावीकडून) : श्री. डांगे, कु. पुंडले, श्री. गायकवाड

## मैदानी खेळ




बसलेले (डावीकडून) : कु. तुमपल्लीवार; प्रा. चिरपुटकर; प्रा. ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर; श्री. छाब्रा; कु. देशपांडे

## आंतरविद्यापीठ स्पर्धेत भाग घेणारे विद्यार्थी



बसलेले (डावीकडून) : श्री. मोहन हेगडे (I.C.S.R.), प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर कु. नातू (I.C S.R.)
उभे पहिली रांग (डावीकडून) : श्री. कुलकर्णी; श्री. वाकणकर; श्री. जालनापुरकर; श्री. भागवत; श्री. पंधारे
उभे दुसरी रांग (दुसरी रांग) : कु. अरगडे; कु. साने; कु. देशपांडे; कु. सोमण; कु. हर्डीकर; कु. खैरे

## राष्ट्रीय सेवा योजना




बसलेले (डावीकडून) : श्री. भिलारे; प्रा. गोसावी; प्रा. गोखले; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर प्रा. कुलकर्णी; श्री. जाधव राजेंद्र

## जलतरण सघ



बसलेले (डावीकडून) : श्री. छाब्रा; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर; श्री. मोहन हेगडे (I.C.S.R.)
उभे (डावीकडून) : श्री. गंभीर; श्री. कुंटे; श्री. गोडे; श्री. कुलकर्णी; श्री. अचवल; श्री. जोशी; श्री. कार्णिक

## वर्ग प्रतिनिधी



बसलेले (डावीकडून) : श्री गोखले आर. डी.; श्री. शहा; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर
श्री. धुमाळ; श्री. गोखले बी. डी.
उभे (डावीकडून) : श्री. घोडके; श्री. शितोळे; श्री. नारखेडे; श्री. लिमये; श्री. ललवाणी; श्री. वेलणकर

## व्हॉली बॉल : विद्यार्थिनी (कनिष्ठ विभाग)



बसलेले (डावीकडून) : प्रा. पाथरे; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर; श्री. छात्रा
उभे (डावीकडून) : कु. पाठारे; कु. हर्डीकर; कु. पाटील; कु. खांडगे; कु. कुलकर्णी; कु. गांधी (संघनायक); कु. चिरमुरे

## राष्ट्रीय शालेय पातळीवर संघ



बसलेले (डावीकडून) : श्री. जोशी; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर, श्री. छात्रा
उभे (डावीकडून) : कु. देशपांडे; कु. गांधी; कु. जवडे; कु. तमपल्लीवार; कु. अंत्रिके; कु. कुलकर्णी; कु. ताटके

## बॉल बॅडमिंटन विजेता संघ



बसलेले (डावीकडून) : कु. नातू (I.C.S.R.), प्रा. गोसावी, प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. गंभीर कु. देशपांडे, कु. भारती शहा (Coach)

उभे (डावीकडून) : कु. अरगडे, कु. हर्डीकर, कु. बेडसे, श्री. सासवडे (सचिव), कु. भडगांवकर, कु. जलेगांवकर कु. राका आयना

## जिमनॅस्टिकस्



बसलेले (डावीकडून) : श्री. हेगडे (I. C. S. R.), प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. गंभीर

उभे (डावीकडून) : श्री. जालनापुरकर, श्री. साठे, श्री. पाटोळे, श्री. मठाधिकारी

## खो–खो : विद्यार्थिनी




बसलेले ( डावीकडून ) : प्रा कुलकर्णी; प्रा. चिरपुटकर; प्राचार्य ल. ह. गाडगीळ; प्रा. गंभीर; श्री. छात्रा
उभे पहिली रांग (डावीकडून) : कु. दाबके; कु. देशपांडे; कु. कुलकर्णी; कु. ताटके; कु अंबिके; कु. भोसले; कु. जबडे
दुसरी रांग (डावीकडून) : कु. अवधानी; कु. तुमपल्लीवार; कु. छत्रे; कु. गद्रे

## व्हॉली बॉल विद्यार्थिनी (वरिष्ठ विभाग)




बसलेले (डावीकडून) : कु. नातू (I.C.S.R.), प्रा. पाथरे, प्रा. चिरपुटकर, प्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. गंभीर
कु. देशपांडे, श्री. मोहन हेगडे (I.C.S.R.)
उभे (डावीकडून) : कु. अरगडे, कु. हर्डीकर, कु. पठारे, कु. सोमण, कु. पाठक, कु. चार, कु. निंबाळकर.

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ




चंदू बोर्डे यांच्या समवेत मोहन हेगडे, प्राचार्य गाडगीळ आणि कु. नातू



ज्युदोपटू चंद्रशेखर कुंटे ज्युदोचा डाव टाकताना

## "मॉडर्न श्री"




विंचूरकर एम. जी.

## क्रीडा नैपुण्य



वैद्य के. बी.



पंधारे एम. एस.



वाकणकर ए. पी.




जालनापूरकर आर. डी.

## वक्तृत्व नैपुण्य



स्मिता पुंडले




गायकवाड जी. पी.

## अभिनय नैपुण्य



घोलप एस. एस.

## शैक्षणिक गुणवत्ता



देशपांडे ए. आर.

## आय.एम.ए.साठी निवड



गोखले जे. बी.

## आंतर-वर्ग क्रीडापटू



सूर्यवंशी सुनील

## राष्ट्रीय छात्र सेना



वेंकटरामन

# उन्हातल्या सावल्या

**मनोहर सोनवणे**
तृतीय वर्ष वाणिज्य

‘ ती येणार आहे.
यंदा तर नक्कीच.
कारण तिनं तर तसं प्रॉमिस दिलंय.
तेव्हा पावसाची रिमझिम सुरू होईल
आणि सूर्य ढगांच्या तावदानाआड
आपला चेहरा फिरवून बसेल.
आणि तेव्हा फुलांनो
तुम्हीही फुलायचं बरं का ! ’
इंद्रधनुष्याच्या वाकदार कमानींनो
हेच निमंत्रण समजून
तुम्हीही आकाश सजवायचं बरं का !
आणि साता समुद्रांपलीकडून धाव घेणाऱ्या पक्ष्यांनो
आपले सूर यंदा तरी विसरू नका
कारण
यंदा ती नक्कीच येणार आहे.
तिनं तर तसं प्रॉमिस दिलंय ना ! ’

तो एकेका तारेला छेडत होता. त्याचा हात सफाईनं फिरत होता. सुरांचे शब्द बनत होते आणि शब्दांची पिसं. पहाता पहाता शब्दांचाच एक पिसारा फुलत गेला. खोलीत अंधार दाटत चाललेला पहाताच तो उठला.

‘ दिवा लावायला हवा ’

स्वतःशीच पुटपुटत तो विजेच्या बटणाकडे निघाला.

आणि तेवढ्यात प्रकाशाचे शिंतोडे चौफेर उधळले.

समोर तो स्मित चेहऱ्याने उभा होता.

‘ केव्हा आलास रे तू ? ’

‘ केव्हाच. तू व्हायोलीन वाजवत होतास. ’

‘ आवडलं ? ‘ Invitation song ’ होतं. ’

‘ यंदा ती नक्कीच येणार म्हणायचं होय ना ऑस्कर ? ’ त्याच्या शब्दात उत्सुकता होती.

‘ होय रे विली होय. यंदा मारी येणारच. हाऊ स्वीट. उन्हाळ्याचे तेही दिवस गेले जेव्हा फक्त रखरखाट होता आणि...आणि आता पुन्हा एकदा सावली येते आहे विली, मारी येते आहे. ’

ऑस्कर आनंदाने वेडा झाला. त्याच्या चेहऱ्यावर नुकत्याच दिसू लागलेल्या सुरकुत्या साफ नाहीशा झाल्या होत्या.

त्याची मारी येणार होती ना. तब्बल सात वर्षांनंतर.

विलीचं मन भरून आलं.

खिडकीवरचा पडदा हलकासा सरकवीत त्यानं काळ्याभोर होत चाललेल्या आकाशाकडे पाहिलं.

त्याचे डोळे दाटून आले.

आकाशात लुकलुकणाऱ्या एका बारक्याशा चांदणीकडे पहात तो मुकाटच राहिला.

‘ आणि विली, यंदा तर मारी सरप्राईज घेऊन येणाराय तुला माहीताय ? मला नातू झालाय. म्हणजे...म्हणजे मी आजोबा झालोय. विश्वासच बसत नाही. होय ना ? ’

‘ तुला ? तुला आठवत ऑस्कर ? मारी तेव्हा खूप लहान होती. चिमुरडी. आकाशातल्या मधाळ ढगासारखी. बालिश नजरेची आणि खेळकर चेहऱ्याची. ती माझ्या बागेत काय करत होती ?

एका इवल्याश्या खुरपानं ती जमीन खणत होती.

मी तिला विचारलं तर म्हणते कशी :

‘ अंकल, इंडियात जेव्हा अंधार होतो ना तेव्हा अमेरिकन पऱ्या विमानांसारखे पंख लावून येतात आणि मग किनई इथल्या अमेरिकन मुलीनं खणलेल्या इवल्याशा खड्डयात त्या त्यांच्या देशातल्या सफरचंदाच्या बिया पेरतात.

मग रोज येऊन त्यांची देखभाल सुद्धा करतात.’

पाहिलंस कशी अल्लड होती. आणि बालिश सुद्धा. आताही तशीच असेल का रे ? '

' आणि विली तुला आठवतं ! मारीच्या सातव्या वाढदिवसाला तिला घेऊन आपण दूर पर्वताकडे गेलो होतो.

'आणि त्या वेळी किमान सात वेळा तिचे बूट बदलताना तुझ्या नाकी नव आले होते ना...'

' ते नव्हे रे. तेव्हा तुझा टॉम मारीला घेऊन धावत सुटला. आपण दोघही नको नको म्हणून ओरडू लागलो. पण टॉम ऐकतो थोडाच. खूप वेळ झाला ते दिसेनात तेव्हा मात्र मी हवालदिल झालो. तुझ्याही चेहऱ्यावर घाम साचला. आणि तू ओरडत सुटलास :

' टॉम...मारी धावत या. '

आणि तेव्हा मला काय वाटलं माहीत आहे. टॉमचं आणि मारीचं......'

तसा विली उठला.

सरकवलेल्या पडद्याआडून तो अधिकच घट्ट झालेल्या अंधाराकडे मुकाट पहात राहिला. मघाशी चमकणारी चांदणीसुद्धा कुठेतरी लुप्त झाली होती.

त्याला आठवला तो एरोड्रम.

माणसांनी बजबजलेला. फुललेला. रंगीबेरंगी कपड्यांतल्या मुलांनी भरलेला.

'पापा. Wish me good luck' टॉम म्हणत होता.

संध्याकाळ दाटली होती. हवेच्या लहरी उसळत होत्या. गर्द निळ्या कोटातला विली टेरेसला टेकून उभा होता. तोंडात चिरूटचा धूर उसळवत.

' Wish you best of luck Tom ' यंदा चॅम्पियनशिप मिळवूनच यायचं बर का '

' यस पापा ' हातातली स्टिक नाचवत टॉम विलीच्या निळ्या कोटाला बिलगला. विलीचा हात फक्त त्याच्या गर्द केसांवरून फिरत राहिला.

' बाय पापा '

' बाय...' विलीचा सूर घुसमटत गेला. मनाची चलबिचलता वाढली. त्याचा टॉम दौऱ्यावर निघाला होता.

निळ्या हातमोजातले त्याचे हात टॉम विमानात शिरेपर्यंत हालत राहिले.

' गुड बाय टॉम...गुड बाय ' तो जोरात ओरडला.

' विली एवढं फिल होऊ देऊ नकोस. यंदा टॉम हॉकी चॅम्पियनशिप मिळवूनच येणाराय. '

विलीने नुसतेच आकाशात झेपावलेल्या विमानाच्या लालसर दिव्यांकडे पाहिले होते आणि ते दिवे रात्रीच्या गर्द अंधारात विरून जाईपर्यंत तो नुसताच पहात राहिला होता.

विलीला फक्त एवढंच आठवलं. गेलेला टॉम परत आलाच नाही. एवढासा टॉम त्या भयानक अपघातात कुठल्या पोकळीत चिरडला गेला असेल ते त्याला समजलंच नाही.

विली भानावर आला तसा त्याला समोरचा काळोखही सहन होईना. त्याला नुसतेच दिसू लागले लाल डोळे विमानाचे आणि निळे हात ' गुड बाय ' म्हणणारे—

' आणि विली यंदा तूही एरोड्रमवर चलायचंस बरं का. मी तर गाडी तयार ठेवणार आहे. यंदाचा उन्हाळा आनंदात जाणार. पुन्हा एकदा दूरच्या पर्वतांवर जाता येईल. तेथले जमिनीतून उगवणारे सूर्योदय पाहता येतील. गच्च भरलेल्या हवेत आनंदाने वेडेपिसे होऊन गेलेल्या वर्षांचे हिशेबही करता येतील. '

पण विली आकसत गेला. त्याचा चेहरा काळवंडत गेला. तो खिन्न झाला.

' नाही ऑस्कर. मी नाही येणार. तुम्ही डोंगरांपलीकडे जा. फेसाळणाऱ्या लाटांच्या तांडव नृत्यात फुललेली इंद्रधनुष्ये पाहा. दूरवर दिसणाऱ्या हरणांच्या कळपांमागे धावा. रोज नव्याने उगवणाऱ्या सूर्याकडे पहा आणि जीवनाचे मधुर संगीत गा. मला हे सारं नकोय असं नाही. निसर्गाच्या मुग्ध व्हायोलिनच्या तारा मला छेडायच्याच नाहीत असंही नाही, पण माझ्या दृष्टीनं ते फक्त एक स्वप्न ठरेल. माझ्या रखरखीत उन्हात उमटलेली एक काटेरी सावली. याहून अधिक कोणतंच अस्तित्व त्याला रहाणार नाही. '

' नाही विली. कदाचित् हे स्वप्न नसेलही. तू तुझ्या टॉमला माझ्या नातवात शोधू शकतोस. आणि गेलेल्या टॉमचं दुःख तू किती दिवस करणार ? माझ्या मारीत तू तुझ्या टॉमला शोध. त्यांचे लपंडाव आठव. त्यांच्या एकमेकातल्या खोड्या आठव. एकदा आठवतं, टॉम माझ्याकडे तक्रार घेऊन आला होता :

' अंकल, मारीला सांगा '

' काय केलं रे तिनं ? '

' ती माझ्याबरोबर शाळेत येत नाही '

' नाही पप्पा, यानं माझी बोरं चोरली '

अशा अनेक मजा. मी नाही त्या आठवत.

मारीचं लग्न झालं आणि मायकेलबरोबर ती न्यूयॉर्कला रवाना सुद्धा झाली. त्याच एरोड्रमवरून, ती सुद्धा पुन्हा आलीच नाही. मीही कधीकधी खूप उदास होतो. वाटतं आपलं जीवन म्हणजे रखरखीत उन्हाळा आहे. पण

त्यातही मारी आहे. तिची आठवण म्हणजेच एक सावली आहे. माझ्या रखरखीत उन्हाला सावरणारी.'

' नाही ऑस्कर, ती सावली भरगच्च आंब्याच्या झाडासारखी नाही. ती आहे पाने झडून गेलेल्या निष्पर्ण वृक्षासारखी सतत बोचणारी, विष पसरवणारी, माझ्या समोर काय ? क्षणभर मारी येईल. मी तिला आपलं म्हणीन पण तरीही तिच्या मुलात मला आपुलकी दिसणार नाही मी गोंधळून जाईन. आणि ती गेल्यावर मी पुन्हा एक आसरा हरवेन. टॉमच्या जळत्या दुःखात मारीच्या गोंडस मुलाचे दुःख रुजवात घालेल आणि मग मीच माझ्या समाधानासाठी पत्करलेली सावली विष बनून मला जाळत राहील. पुन्हा मारी आणि तिचा मुलगा येईपर्यंत. तेव्हा पुन्हा नव्याने दुःख म्हणजे तीही एक मालिकाच. नकोच ऑस्कर. तुझ्या सावलीत तूच सुखात रहा. '

आता मात्र ऑस्कर भडकला.

' विली तू माणूस आहेस की आणखी कोणी ? नव्हे तर तू स्वार्थी आहेस. तू स्वतःला जपू पाहतोस. तुझी दृष्टी वेंधळी आहे. ' विली शांतपणे उठून निघून गेला.

० ० ०

तेही दिवस गेले तिच्या येण्याचे. मारीच्या हास्यात विरघळून जाण्याचे नातवाला टेरेसवर बसवून व्हायोलिन ऐकवायचे. दूर डोंगराआड धावून सूर्योदय पहाण्याचे.

मारी आलीच नाही. दिवसागणिक ग्रीष्म संपू लागला. झाडं हिरवी झाली. आमंत्रण दिल्याप्रमाणे फुलंही फुलली आणि इंद्रधनुष्यांनी आकाशही सजविले. सावली शोधणारा ऑस्कर मात्र वाटेवर डोळे भिजवत राहिला. व्हायोलिनच्या बेफाट तारा चाळवत.

पण व्हायोलिनच्या सुरांची पिसं मेल्याप्रमाणे घरंगळत गेली.

' यावेळी व्हायोलिन प्राणाच्या आकांतानं धुमसलं पाहिजे जेणे करून माझी तडप तिच्यापर्यंत पोहोचायला हवी ' ऑस्कर पुटपुटायचा.

ग्रीष्म संपता संपता मारीचं पत्र आलं:

सॉरी पापा, स्मिथ अमेरिका सोडायला तयार नाही. आणि मलाही तिकडे पाठवत नाही. मीही काय करू ? आणि तिथे येऊन तरी काय कंटाळाच येणार. मला आताशा अजिबात करमायचं नाही. तेव्हा तुम्हीच याना इथे आमच्याकडे.

ऑस्कर रडरड रडला.

सावलीचा आश्रय नकोसा झाला म्हणून दूर गेलेला विलीही परत आला. आला तसा म्हणाला.

' रखरखीत उन्हापेक्षा त्यात पसरलेल्या काटेरी सावल्याच माणसाला जास्त जाळतात हे मला आत्ताच समजलं तर '

ऑस्कर फक्त आकाशाकडे डोळे लावून बसला.

एरोड्रमवरून झेपावलेली दोन्ही विमाने.

दोघांचेही लाल डोळे. आ वासून आकाशात पुरलेले

अखेर थकला भागला ऑस्कर जीव घेऊन विलीवर ओरडला.

' शहाण्या, उन्हाची फुलं इतकी गोंडस असतात हे तुला माहीत असूनही मला का सांगितलं नाहीस. नसतो शोधत बसलो सावल्यांना. '

विली फक्त मंद हसला. आणि व्हायोलिन छेडीत गेला.

० ० ०

---

## डोळे

माझे चार डोळे
खाचांचे आणि काचांचे !
दोन काचांमध्ये आहे
सारे काही कमावलेले,
पण दोन खाचांमध्ये मात्र
सारे काही गमावलेले !

**सरिता कुलकर्णी**, बारावी शास्त्र

# सायकलवरून गोवा सफर

**सुनील कडूसकर**
बारावी वाणिज्य

पुष्कळ दिवस माझ्या मनात सायकलवरून लांब दौऱ्यावर जाण्याचा विचार होता. दौरा कुठे काढावा याचे मार्गदर्शन होत नव्हते. आम्ही मित्र असेच एकदा गप्पा मारत असताना सायकलवरून सफर करण्याचा माझा विचार मी मित्रांपुढे मांडला. प्रथम मित्रांकडून नकार आला परंतु हळूहळू सर्वजण या गोष्टीत रस घेऊ लागले व चर्चेनंतर गोवा हे रमणीय स्थान आमच्या सर्वांच्या संमतीनुसार ठरले. प्रथम बरेचसे जण यात भाग घेत होते परंतु जसजसा क्षण जवळ येत गेला तसतसे एकएक जण पिकलेल्या फळा प्रमाणे गळायला लागले व अखेरीस पाचच जण गोव्याला जायला तयार झाले.

सर्वप्रथम यासाठी आम्हांला चांगल्या दुचाकीची अवाश्यकता होती याच आम्हांला शेवटपर्यंत साथ देणार होत्या. म्हणून आम्ही आमच्या दुचाकी दुरुस्तीस टाकल्या ट्रिपसाठी कमी वजनाची आवश्यकता होती. म्हणून सायकलचे जेवढे वजन कमी करता येईल तेवढे कमी केले. त्यासाठी आम्ही मडगार्ड, चेनकव्हर्स, कॅरिअर्स इत्यादी काढून टाकले. आमची सफर लांब पल्लयाची असल्याने आम्हांला सायकल दुरुस्तीची साधने नेणे आवश्यक होते. त्यासाठी आम्ही पान्हे, पंक्चरचे साहित्य, पंप इत्यादी सामान गोळा केले.

माझा भाऊ असाच चार ते पाच वर्षांपूर्वी अशा सहलीचा आनंद लुटून आला होता. त्याला आलेले अनुभव व अडचणी समजावून घेणे, आवश्यक होते. त्यासाठी आम्ही त्याचे व इतरांचे योग्य ते मार्गदर्शन घेतले. ट्रिपसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शक नकाशे आम्हाला जमवणे आवश्यक होते. ते सर्व नकाशे माझ्याकडे असल्याने त्यासाठी करायला लागणारी धावपळ वाचली. आम्हाला नकाशाचा अभ्यास करणे आवश्यक होते. तसेच कोणत्या शहरात विश्रांतीसाठी थांबायचे याचा प्लॅन आखायचा होता व त्यासाठी प्रत्येक मोठमोठ्या शहरांचे किलोमीटर अथवा मैलांमध्ये अंतर माहीत असणे आवश्यक होते. त्याप्रमाणे आम्ही सर्वांनी एकत्र बसून चर्चा करून एक विशिष्ट प्लॅन आखला व त्याप्राणे जाण्याचे ठरवले. ज्या शहरात आमची राहण्याची सोय शक्य होती तेथे आम्ही पत्रव्यवहार करून त्यासंबंधीची माहिती त्यांना कळवली व राहण्याची सोय उपलब्ध केली.

याच धांदलीत आमची परीक्षा जवळ आली असल्याने अभ्यासामुळे मला या गोष्टीकडे दुर्लक्ष करावे लागले.

परीक्षा संपताच आमचे लक्ष पुन्हा दौऱ्याकडे वळले. जोमाने पुन्हा तयारीस लागलो प्रथम जे माझ्याबरोबर येण्यास तयार होते त्यांची मी नावे लिहून काढली ती अशी होती. मी स्वतः जगदीश पारनेरकर, विवेकानंद जवळगेकर, पराग पूरम, विपीन राजे यांच्या घरून परवानगी मिळवली व आम्ही पुढील कामास मोकळे झालो.

आम्हांला ही ट्रिप कमीत कमी खर्चात बसवायची होती. मदतीचा हात म्हणून आम्ही कॉलेजची पत्रे घेण्याचे ठरविले व त्यासाठी आम्ही कॉलेजकडे अर्ज केला व दोनच दिवसांत पत्रे आमच्या हातात पडली. आमचा उत्साह वाढत चालला होता मी स्वतः सुमारे अडीचशे (२५०/–) रुपये घेतले होते. त्यातील दोनशे रुपयांचे प्रवासी चेक्स व पन्नास रुपये रोख घेतले होते. बाकीच्यांनी रोख रक्कम घेतली होती.

शेवटी ज्या दिवसाची आम्ही आतुरतेने वाट बघत होतो तो दिवस उजाडला. ११–४–१९७८ रोजी बरोबर पाच वाजता आमच्या प्रवासास सुरवात झाली. प्रथम आमचा बेत ऐकून इतर लोक आमची चेष्टा करीत व आमची मने पालटविण्याचा प्रयत्न करीत, परंतु त्यांचा तो

प्रयत्न निष्फळ ठरला. आम्हाला कात्रज घाट ओलांडायला सकाळचे पावणेसात वाजले. आनंदाच्या भारात कधी घाट पार केला कळालेसुद्धा नाही. त्याच आनंदात आम्ही पुण्य नगरीचा निरोप घेतला. उत्साह वाढत होता त्यामुळे आम्ही जोमाने गाड्या मारल्या. पुणे सातारा हा रस्ता म्हणजे जरा कठीणच म्हणायचा कारण याच रस्त्याच्या दरम्यान दोन मोठ्या घाटांशी सामना करावा लागतो. एक म्हणजे कात्रज, दुसरा म्हणजे खंडाळा. त्यापैकी कात्रज घाट लवकर व सहज पार केला परंतु खंडाळा घाट चढायला सुमारे दोन तास लागले. खंडाळा ते सातारा हा रस्ता फार कटीण आहे कारण यामध्ये सुमारे सहा खिंडी आहेत. पुढे सातारा आ वासून आमचे स्वागत करीत होते. आम्ही थकलो होतो. परंतु आमचा निश्चय अढळ असल्याने सायकल मारीत होतो. याच भागात वारे उलटे असल्याने गाडी मारण्यास त्रास होई. साताऱ्यास आम्ही पावणे आठच्या सुमारास पोहोचलो. साताऱ्यास पोचताच आमच्या भोवती एकच गर्दी जमली त्यातून वाट काढता काढता नाकी दम आला.

त्या रात्री साताऱ्यास मुक्काम करून दुसऱ्या दिवशी उठून आवराआवर केली. पहिलाच दिवस असल्या कारणाने आम्हांला सामान अवरायला नऊ वाजले. सातारा सोडताच माझा मित्र विवेकानंद त्याच्या सायकलचे टायर बसले त्यामुळे आम्हाला पुन्हा सातारला यावे लागले. त्यामुळे आम्हाला १२ एप्रिल हा दिवस वाईटच गेला. त्या दिवशी दुपारी चार वाजता आम्ही कऱ्हाड शहरात प्रवेश केला. मला ओगलेवाडीचा काचकारखाना पाहण्याची तीव्र इच्छा होती पण इतरांकडून नकार आला. कऱ्हाडला आम्हाला आमची सोय रेस्ट हाउसमध्ये करावी लागली. दुसऱ्या दिवशी दि. १३–४–१९७८ रोजी पहाटे सव्वा पाच वाजता कऱ्हाड सोडले व कोल्हापूरच्या रस्त्याला लागलो. रस्ता चांगला असल्याने आम्ही बाराच्या सुमारास कोल्हापुरात पोचलो. कोल्हापुरात आमचा मुक्काम शिवाजी विद्यापिठातील एका प्राध्यापकांकडे होता. कोल्हापुरास लवकर पोचल्याने आम्ही पन्हाळगड पाहिला. दुसऱ्या दिवशीही आमचा मुक्काम कोल्हापुरातच होता. त्या दिवशी आम्ही रंकाळा तलाव, महालक्ष्मीचे मंदिर, शालीनी महाल व साखर कारखाना बघितला. १५–४–१९७८ ला कोल्हापूरचा रामराम आम्ही पहाटे चार वाजता घेतला. अंधारातच आम्ही महाराष्ट्राची हद्द संपवून कर्नाटकच्या हद्दीत प्रवेश केला. या रस्त्यावर हॉटेल नसल्याने जेवणाची आमची गैरसोय झाली. आम्ही बेळगावला चार वाजता पोचलो. कोल्हापुर ते बेळगाव अंतरासाठी जवळजवळ १२ तास लागले हे अंतर जवळजवळ १२२ किलोमिटर्स आहे त्यामुळे आम्ही खूप दमलो होतो व दुसऱ्या दिवशी विश्रांती घ्यायचे ठरवले. बेळगावला प्रेक्षणीय असे काहीच नसल्याने तो दिवस फुकट गेल्याची खंत आम्हांला वाटू लागली. १७–४–१९७८ ला आम्ही बेळगाव सकाळी पाच वाजता सोडले. कर्नाटकची हद्द संपवून गोव्याच्या हद्दीत आम्ही बारा वाजता प्रवेश केला. बेळगाव ते गोवा या रस्त्यात आम्हांला पाण्याची टंचाई भासली. अनमोड घाटापर्यंतचा सर्व रस्ता चढाचा होता. थोड्याच वेळात आमच्या लक्षात आले की आमच्यापैकी जगदिश पारनेरकर व पराग पूरम हे दमले असल्याने ट्रकने पुढे निघून गेले आहेत. शेवटी आम्ही तिघेच जण राहिलो असल्याने जंगलातून जाताना थोडी भिती वाटत होती. हे जंगल फार भयानक होते. किर्र आवाजाने हृदय हेलावून जात होते चिटपाखरूही दिसत नव्हते. अनमोड घाट आम्हाला उतरायचा होता. या घाटातच गोव्याची हद्द सुरू होते घाट पुष्कळ मोठा असल्याने तो उतरण्यास आम्हांला अर्धा तास लागला. गोव्यात फार टेकड्या असल्याने सारखे मोठे चढउतार होते. त्यामुळे आम्हांला फारच त्रास होत होता. दिवसभर उपास घडल्याने पोटात कावळे कोकलत होते. काजुची फळे दिसताच आम्ही त्यावर तुटून पडलो. शेवटी आम्ही गोव्यातल्या फोंडा गावात पोहचलो. तिथे चौकशी केल्यावर समजले की आमची मुक्कामाची जागा २० कि. मी. लांब आहे. शेवटी कसेबसे सायकल मारीत आम्ही ते अंतर कापले. बेळगाव ते गोवा हे अंतर १३२ कि. मी. आहे ते कापावयास आम्हाला तेरा तास लागले. गोव्याला सायकलवरून पोहोचल्याने आम्हांला आनंद झाला होता. त्या दिवशी संध्याकाळी आमच्यात वाद सुरू झाला की सायकलवरून पुण्यास केव्हा कोण परतणार व रेल्वेने कोण जाणार. जगदीश व पराग हे रेल्वेने जाणार हे निश्चितच झाले होते. रत्नागिरी मार्गाने परत यायचे तर विवेकानंद येणार होता व सावंतवाडी कोल्हापूर मार्गे येणार असेल तर बिपीन येणार होता व शेवटी विवेकानंद गळाला. मी आणि बिपीनने २३ तारखेला पुण्याला यायचे ठरवले दुसऱ्यादिवशी आम्ही दोघांनी पणजीस जाऊन राहण्याची सोय केली. गोवा बघण्यासाठी टूरीस्ट बसचे रिझर्वेशन केले. आम्ही आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी परतलो. ते तिघे मडगावला जाऊन रेल्वेचे रिझर्व्हेशन करून आले होते. दुपारी आम्ही पणजीला मुक्कामाला गेलो. १९ व २० तारखेला टूरिस्ट बसने आम्ही गोवा बघितला. २१

तारखेला हणजून बिच बघितला. २२ तारखेला विश्रांती घेतली. गोव्यातील चर्चेस फारच सुंदर व भव्य आहेत. तेथील कोरीव कामे डोळ्यांचे पारणे फिटवणारे आहे. २३ तारखेला ५ वाजता आम्ही पणजी शहर सोडले. हा दिवस आम्हांला वाईटच गेला कारण विपीनच्या सायकलचे बरेचसे स्पोक तुटले सायकल तसीच चालवत म्हापशापर्यंत गेलो व तेथे गाडी दुरुस्त केली. आम्ही गोव्याला दहा वाजता रामराम ठोकला. सावंतवाडीला आम्ही तीन वाजता पोहोचलो. कॉलेजच्या पत्रांमुळे आमची राहण्याची सोय शाळेमध्ये होऊ शकली. तो दिवस सावंतवाडीत राहिलो. २४–४–१९७८ ला सकाळी पाच वाजता सावंतवाडी सोडली. फोंडाघाट मोठा असल्याने ट्रकने जाण्याचे ठरवले. सावंतवाडी ते कोल्हापुर हा सर्वात खराब रस्ता होता सायकल चालवणे फारच जड गेले. राधानगरीला २–३० ला पोहोचलो. फोंडाघाट चढल्यानंतर हे गाव लागते. कोल्हापुरात रात्री ८–३० ला पोहोचलो. जेवण करून विद्यापीठात मुक्कामाला गेलो. २५–४–१९७८ ला कोल्हापूर पाच वाजता सोडले. कोल्हापूर ते कऱ्हाड हे अंतर फार नसल्याने आम्ही साडेदहा वाजता कऱ्हाडला पोहोचलो लवकर पोहोचल्याने मी ओगलेवाडीचा काचकारखाना बघायचे ठरवले पण विपीनकडून नकार आल्याला मी एकटाच कारखाना बघायला गेलो तो दिवस कऱ्हाडला काढला. २६-४-१९७८ला सकाळी५-३०ला कऱ्हाड सोडले. कऱ्हाड ते सातारा हे अंतर कमी असल्याने दहा वाजता साताऱ्यात पोचलो. हॉटेलमध्ये खाऊन घेतले. साताऱ्याला लवकर पोहोचल्याने आम्ही जास्तीत जास्त अंतर कापायचे ठरविले त्यासाठी एस. टी. स्टँडवर जाऊन किती अंतरावर रेस्टहाउसेस आहेत व कुठल्या गावी आहेत हे लिहून घेतले. शिरवळ पंचावन्न कि. मी. असल्यामुळे आम्ही शिरवळ गाठायचे ठरवले. पण खंबाटकी घाटात जाताच आम्हाला पाऊस लागला व आम्ही भिजतच घाट चढलो व तेथील शेडखाली थांबलो. पाऊस थांबताच पुढील प्रवासास लागलो, पाच वाजता शिरवळला पोचलो व रेस्ट हाउसमध्ये राहण्याची सोय केली, पुणे फारच जवळ आल्याने आम्हाला पुण्याला जायची घाई झाली होती, पण दमल्यामुळे विश्रांती घ्यायचे ठरवले, दुसऱ्या दिवशी सकाळी चार वाजता उठलो, सगळे अवरेपर्यंत पाच वाजले, पाच वाजता शिरवळ सोडले, ८-३० वाजता आम्ही कात्रज घाटाच्या तोंडावर होतो, पुण्यनगरी बघून फारच हायसे वाटले. ९-३० वाजता आम्ही घरी पोहोचलो, सायकलवरून ट्रीप पूर्ण केल्याचे समाधान आम्हा दोघांना लाभले.

---

## आठवण

येते आठवण अजून त्या क्षणांची,
झाली होती भेट तिची-माझी प्रीतीची
आला होता निंबाला दाटून बहर,
बहर आला होता माझ्या हृदयावर
होता चैत्र; परंतु श्रावण होता मनात
होती सावली मनात उन्हाच्या साम्राज्यात
येते आठवण अजून त्या अबोलीची;
परंतु होती भाषा बोलक्या हृदयाची
आठवतो अजून तोच निंबाचा पार
रंगवीत जीवनचित्र बसलो होतो त्यावर
येते केवळ आठवण अजून त्या क्षणांची,
आहे मनात साठवण फक्त आठवणींची

**पऱ्हाड व्ही. जी.**, बारावी वाणिज्य

# खुन्नस

**जयंत जोगळेकर**
तृतीय वर्ष वाणिज्य

तिने माझ्याविषयी उच्चारलेले शब्द मला समजल्यापासून मेंदू-एकसारखा धपापत होता. लोहाराच्या भात्याने रागाने फास फूस करावे तसा श्वास चालत होता. वाटत होतं ... अस्सं जावं आणि तिचे खांदे गदगदा हालवून विचारावं हेच ओळखलंस मला ? आणि ओळखायलाही कोणी सांगितलं होतं ? मी आहे हा असा आहे. तुला नको होतो तर नाही म्हणून सांगायचंस ! ' वास्तविक पाहता तिचा माझा काहीही संबंध नव्हता ती माझी मामेबहीण म्हणजे नातेवाईक होतो आम्ही. परंतु मागणी मी घातली नव्हती.

तिच्या त्या वाक्याने मला कसंकसं झालं ! सारा भूतकाळ पुन्हा सामोरा येऊ लागला. ज्याला मी परतवीत होतो तोच डोक्यात भिनला. डोक्यातून रक्ताचे लोट डोळ्यांकडे वाहू लागले. डोळ्यांमधून रक्तातले पाणी झिरपायला लागलं गालावर एक टपोरा थेंब थांबला. मी डोकावलं त्याच्यात त्यात एक झोपडी दिसायला लागली.

एक झोपडी ... गवतानं बांधलेली. आतमधून ट्यिा-ट्यिा आवाज येत होता. छोटसं बालक रडत होतं. खूप गोडस दिसत होत ते ! साता नवसाने जन्मलेलं ! आई-वडिलांना परमावधीचा आनंद झाला होता. दिवसभर पाटलाच्या वाड्यावर काम करून गुजराण करणारे ते दोघं आणि -आणि उतारवयात जन्मलेले ते मूल !

जास्त दुःख जसं हानिकारक तसं जास्त सुख देखील हानिकारकच असतं !त्या दोघांच्या आयुष्याला फुटलेला एक अंकुर ! त्या अंकुराला कीड लागायला लागली. त्याला आजार झाला. देवाचा एवढं गोरगोमटं बाळसेदार पोरगं परंतु त्याला ग्रासलं त्या महामायेनं ! पाटलाची कृपा पोरगं बरं झाल; परंतु शरीरावर व्रण घेवून ! पोरगं कुरूप झालं ह्यापेक्षा वाचलं ह्याचाच साऱ्यांना आनंद झाला काहीच नसण्यापेक्षा काहीतरी असणं कधीही चागलं ! ते पोरगं वाढू लागलं, मोठं होऊ लागलं चार पोरांत खेळू लागलं चंद्या नावानं !

होय ! मीच तो चंद्या ! मोलमजुरी करून दोन वेळचं जेवण मिळविण्याच्या काळजीत असलेल्या आई-बापांचा एकुलता-एक मुलगा ! लहानपणापासून मला माझी झोपडी दिसत होती. तिथे बंगला उभा करावा हे माझं स्वप्न ! आणि त्यासाठी मी प्रयत्न करायला लागलो. वयाच्या दहाव्या वर्षापासून प्रौढ झालो. शिक्षणाचा हात धरला. प्रयत्नाने नेत्र स्वच्छ ठेवले. आणि ... आणि मला दिसला एक सुंदर राजमार्ग ! की ज्या राजमार्गाने गेल्यावर मला एक सुंदर राजवाडा दिसणारच होता. त्या राजवाड्यातील एक रूपवती राजकन्या माझ्यासाठी आसुसलेली होती. सारी संपत्ती माझ्या पदस्पर्शाची वाट पहात होती. तो राजमार्ग शिक्षण होता आणि म्हणूनच दरवर्षी फर्स्ट क्लास मिळवत मी एम्. एस्सी झालो. प्राध्यापक झालो. पीएच. डी. करीत होतो. आणि आई वडिलांनी टुमणं लावलं लग्नाचं ! मी त्यांना होकार दिला. तेव्हा मोठ्या आनंदाने बाबांनी मला मिठी मारली. आईने शेंगदाण्याचा लाडू दिला.

विद्यापीठाच्या एका कामासाठी मी पुण्याला आलो. सोबत प्रा. मिस परांजपे होत्या. मनातून मी खुष होतो. कारण परांजपे सुंदर होत्या विद्वान होत्या. सुंदरतेला भाव देणारा मी ! परांजप्यांवर प्रेम करीत होतो. एकतर्फी ! त्यांचंही विद्यापीठात दोन दिवसांसाठी काम होतं. निमित्त मिळालं. पण घाबरतही होतो. एकदा त्या म्हणाल्या देखील, " भालेराव, तुम्ही फार संकोचता वाटतं ? "

" न ..नाही. "

" मग फार गंभीरपणे वागता ? "

काहीतरी टोलवाटोलवीची उत्तर दिली मी त्यांना, कामे झाली व सहज आम्ही दोघेही माझ्या मावशीच्या घरी गेलो. गप्पा मारत मारता लग्नापर्यंत पोहोचल्या आणि-आणि तिने ते सांगितले.

माझ्या मामाकडे बाबांनी शब्द टाकला होता. मामांनी नकार दिला का ? का तर मुलीच्या सांगण्यावरून ! मामांची मुलगी विद्या ! ती मामाजवळ आणि मावशीजवळ म्हणाली, " शिक्षण नोकरी सारं ऽऽ काही असलं म्हणून काय झालं ! असल्या छपन्न टिकल्यांशी कोण करतं लग्न ! "

रणरणत्या उन्हातून चालताना एकदम जाळ अंगावर यावा तसं वाटलं मला ! तळपायाची आग मस्तकात जाऊन डोकं पेटायला लागलं मावशीच्या घरातून काढता पाय घेतला.

मिस् परांजपे म्हणाल्या, " काय करते तुमची विद्या ? "

" माझी ? "

" नसू द्या ! पण काय करते ? "

" काही नाही ! घरीच असते. "

" शिक्षण ? "

" नॉन्-मॅट्रिक "

" अँ ! " नेहमीपेक्षा मिस् परांजप्यांचा 'अँ' मोठा होता.

" कुठे राहतात तुमचे मामा ? "

" पुण्यातच ! "

" मग आताच जाऊ या त्यांच्या घरी. "

" काय ! " मी ओरडलो " माझा अपमान अजून व्हावा असं वाटतं तुम्हांला ? "

" बघू ! कोण कुणाचा करतं ! "

" नाही ! ते शक्य नाही. "

" तुम्हांला यायला हवं भालेराव, माझ्यासाठी ! "

मिस्. परांजप्यांच्या शब्दाला मी बळी पडलो. मामांच्या घरी गेलो. विद्या नव्हती. मी सुस्कारा सोडला. मैत्रीण म्हणून ओळख करुन दिली मिस् परांजप्यांची ! आणि . . अचानक दुधाच्या पेल्यात मिठाचा खडा पडावा तशी विद्या उपटली. मामा मामींनी तिची मिस्. परांजप्यांशी ओळख करून दिली. मी चेहरा लपवू लागलो. मी छपन्न टिकल्या म्हणून आणि विद्याचा-माझा तिरस्कार करणाऱ्या खलनायिकेचा चेहरा दिसू नये म्हणून परांजपे बोलत होत्या- आणि त्या एकदम म्हणाल्या.

" अहो काका ! तुम्हांला एक सांगायचं राहिलचं !"

" काय ? मामा

" ह्यांचं लग्न ठरलयं ! "

" अरे वा ? कुठली मुलगी ? "

" त्यांनाही सांगायला लाज वाटते. माझ्याशीच " आणि मिस्. परांजपे सॉलिड लाजल्या. मी पहातच राहिलो.

विद्याचा चेहरा छपन्न बूट मारल्यासारखा झाला. मिस् परांजपे तिच्यापेक्षा छपन्न पटीने सुंदर होत्या. ज्ञानी होत्या. मामी तर आतल्या खोलीतच पळाल्या. कपाळावर एक आठी वाढवीत मामा म्हणाले.

अरे वा ! अभिनंदन हं दोघांचाही !"

मला चक्कर आल्यासारखं वाटायला लागलं होतं. रस्ता समोर नीट दिसत नव्हता. चालताना अडखळत होतो. परांजपे म्हणाल्या "अडखळता काय असे ! प्लीज ! आपण जरा कॉफी घेवू."

" समोरच्या हॉटेलात फॅमिली रूममध्ये आम्ही बसलो. " कशासाठी तुम्ही असं म्हणालात ? " मी

" खुन्नस ! "

" कोणाला ? "

" विद्याला ! "

" पण त्यासाठी हे नाटक कशाला ? "

" नाटक नाही महाराज ! "

" म्हणजे तुम्ही माझ्याशी..."

" अं हं ! " माझ्या ओठांवर बोट टेवीत त्या म्हणाल्या.

" तुम्ही नव्हे तू ! आणि आता मिस् परांजपे नव्हे तर चंद्रकला !!

" छान ! आज मला अप्सरा मिळाली "

" क्या लाऊ साब " वेटर कडमडला.

पण आता काळजी नव्हती. चंद्राला चंदी मिळाली होती. सारीच चांदी झाली होती.

# विनू : एक अद्वितीय तारा

नंदकुमार भोसले
द्वितीय वर्ष शास्त्र

क्रिकेटच्या क्षेत्रातील एक अविस्मरणीय खेळाडू विनू मंकड यांचे निधन झाले, परंतु त्यांनी क्रिकेटच्या क्षेत्रात जे विक्रम प्रस्थापित केले आहेत ते अमर आहेत. विनू मंकडचं नाव माहीत नसणारा क्रिकेट रसिक नसेल! त्याच्या पराक्रमाला मुजरा न करणारा क्रिकेटपटू नसेल! तसेच विनू मंकडच्या जागतिक विक्रमांची नोंद न करणारा जगात एकही धावफलक नसेल! विनू मंकड ही भारतीय गौरवशाली आणि अभिमानास्पद व्यक्ती आहे, तिने भारताची शान व मान उंच केली आहे.

क्रिकेट जगतात जे पाच अष्टपैलू खेळाडू आहेत त्यात विनू मंकडचेही स्थान अग्रेसर आहे. एक उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक म्हणून विनूची कामगिरी नेत्रदिपक अशी आहे. अशा ह्या महान खेळाडूचं बाल-जीवन पाहणंही उद्बोधक ठरेल. विनूचे संपूर्ण नाव मुळवंतराय हिंमतराय मंकड असे आहे. त्याचा जन्म १२ एप्रिल १९१७ रोजी नवानगरमध्ये झाला. लहानपणी त्याचे मित्र त्याला 'मिनू' या टोपण नावाने हाका मारीत. परंतु त्याने ज्यांच्यापासून क्रिकेटचे धडे घेतले त्या ए. एफ् वेन्सले यांनी मिनूच्या ऐवजी 'विनू' असेच ऐकले व तसेच समजून ते त्याला 'विनू' च म्हणू लागले. पुढे हेच नाव सर्वत्र प्रसिद्धीला आले. विनूचे शिक्षण असे फारसे झालेच नाही. ह्याबाबत विनूचे विचार होते— 'मी अजिबात शिकलोच नाही. मला शाळेची आवड फारशी लागलीच नाही आणि जो मुलगा क्रिकेट खेळातच दिवसाचे आठ तास खर्च करीत असे तो शाळेत तरी कसा जाणार?'

क्रिकेट खेळाबाबत विनूला घराण्याचा वारसा मिळालाच नाही. परंतु ज्या मातीत जन्मला त्या मातीलाच जणू एक मोठे वरदान होते. क्रिकेटमध्ये चिरंजीव झालेले रणजी, शैली व स्वतःच्या खेळाने वैशिष्ट्य प्रस्थापित केलेले प्रिन्स दुलिप आणि पूर्वीच्या जमान्यातील आपल्या गतिमान व प्रभावी गोलंदाजीने ज्याने आपले नाव अमर करून ठेवले आहे असा अमरसिंग! हे सगळे त्याच मातीत जन्मलेले असल्याने त्या मातींचा गुण साहजिकच विनूच्या रक्तात भिनला होता. त्यांचाच आदर्श तो आत्मसात करीत होता. विनूला लहानपणी क्रिकेटबद्दल ज्यांचे सर्वात मोठे साहाय्य मिळाले त्यापैकी नवानगरचे जामसाहेब हे एक होते. क्रिकेटचे अतिशय शौकीन असलेल्या जामसाहेबांनी विनूचे सुसगुण बरोबर ओळखले. त्यांनी विनूला वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षीच इंग्लंडला नेले. तेथे त्याला क्रिकेटचे खरे शिक्षण मिळाले.

विनू मंकड यांनी वयाच्या १८ व्या वर्षी म्हणजे नोव्हेंबर १९३५ मध्ये प्रथमश्रेणी सामन्यात प्रवेश केला. बंगाल-आसाम विरुद्ध नवानगर क्रिकेटमधील त्यांनी पहिले शतक काढले. १९४३ मध्ये विनूला महाराष्ट्राकडून खेळण्यासाठी बोलावण्यात आले. पहिला रणजी सामना तो मुंबई विरुद्ध खेळला. २२ जून १९४६ पासून १९५९ पर्यंत सुमारे चौदा वर्षे विनू कसोटी क्रिकेट खेळला. न्यूझीलंडच्या संघाविरुद्ध त्याला भरघोस यश लाभलं, तर वेस्ट इंडीजच्या संघाविरुद्ध तो फलंदाजीत पार अपयशी ठरला.

१९४६ च्या इंग्लंडच्या दौऱ्यामध्ये विनू मंकड यांच्या गोलंदाजीला खरा वाव मिळाला. त्यांच्या गोलंदाजीची खरी किंमत तेथे अजमावली गेली. दुसऱ्या महायुद्धापूर्वी इंग्लंडचे व्हेरिटी नावाचे डावखुरे गोलंदाज सर्व क्रिकेट जगतात प्रथम क्रमांकाचे मानले जात होते. त्याची जागा विनूने युद्धानंतर घेतली. विनू प्रारंभी मध्यमगती गोलंदाजी करीत असे. त्याला फिरकी गोलंदाजी वेन्सले ह्या सुप्रसिद्ध मार्गदर्शकाने करण्यास भाग पाडले. उजव्या हाताच्या फलंदाजास मंकड एक लेग ब्रेक व दुसरा आर्मर असे दोन

प्रकारे चेंडू वळवत, परंतु चेंडूचा टप्पा पडून वर येण्याच्या उंचीमध्ये, टप्पा पडून तो वळण्यामध्ये आणि हवेतील उंची किंवा फ्लाइटमध्ये इतकी विविधता होती की त्याचा प्रत्येक चेंडू नवनिर्मित कला वाटायची. चेंडूची फ्लाइट किंवा चेंडूवरील फिरकी बदलल्यामुळे चेंडूचा टप्पा पडून तो कमी अधिक उंचीने वर येतो याचे त्यांना ज्ञान होते. त्याचा विनू संपूर्ण उपयोग करीत असे. मद्रासमधील एका कसोटी सामन्यात त्यानी लेगस्टंपच्या बाहेर ओव्हरपिच्ड चेंडू टाकून फलंदाजाच्या पाठीमागून स्टंपवर घालविला. तसाच त्याचा आर्मर चेंडू तीन स्टंप तरी आतमध्ये यावयाचा. अनेक डावखुऱ्या गोलंदाजांच्या लेगब्रेक आणि आर्मर चेंडूमधल्या फ्लाइटमध्ये बराच फरक असतो. त्यामुळे ते दोन निरनिराळे चेंडू ओळखणे सोपे जाते. परंतु विनू मंकड लेगब्रेक व आर्मर चेंडू जवळजवळ त्याच उंचीने टाकत असल्यामुळे ते ओळखण्यास उशीर लागत असे. या दोन्ही फिरकीवर त्याचा इतका ताबा होता की त्याला हवा इतका चेंडू तो वळवू शकत असे. पहिला आर्मर चेंडू तो तीन स्टंप वळवीत असे तर दुसरा एक स्टंप. त्यामुळे चेंडू शेवटपर्यंत पाहिला नाही तर फलंदाजाची चांगलीच फजिती होत असे.

आपल्या गोलंदाजीवर चेंडू कोणत्या ठिकाणी टोलविला जाईल याची त्याला अचूक कल्पना असे आणि म्हणूनच हातातून चेंडू सुटल्याबरोबर चपळाईने त्या जागेकडे तो धाव घेई. मद्रासमधल्या एका टेस्टमध्ये त्याने स्वतःच्या गोलंदाजीवर जवळजवळ शॉर्टलेगपर्यंत धावत जाऊन रॉबर्टसनचा एक अप्रतिम झेल घेऊन दाखविला होता. मंकडने आपल्या क्रिकेटच्या कारकीर्दीत जवळजवळ सर्वच देशांचे इंग्लिश, ऑस्ट्रेलियन, वेस्ट इंडीजचे जागतिक दर्जाचे खेळाडू बाद करण्याचे श्रेय मिळविले होते. डॉन ब्रॅडमन त्या जागतिक दर्जाच्या खेळाडूला त्याने तीन वेळा बाद केले होते. डॉन ब्रॅडमनबद्दल विनूचे विचार फारच आदराचे असत. ब्रॅडमनबद्दल तो म्हणे—'ह्या थोर खेळाडूला ५० धावांच्या आतच बाद केले तर– अन्यथा त्यानंतर त्याची विकेट मिळणे बहुधा अशक्यच.' एकदा ब्रॅडमनने विनूच्या एका षटकात तीन चौकार, तीन षटकार आणि दोन धावा म्हणजे ३२ धावा टोलावल्या. तेव्हा दुसऱ्या बाजूस मिलर होता. तो विनूला सहानुभूती दाखवित म्हणाला. 'तुझ्या बोलिंगवर अशी तडाखेबाजी करण्याचे धाडस, शतक पूर्ण केल्यानंतर ब्रॅडमनने दाखवले आहे हे लक्षात ठेव.' क्रिकेटसम्राट ब्रॅडमनलाही विनूबद्दल आदर होता. १९४७ साली ऑस्ट्रेलियाचा दौरा संपल्यावर ब्रॅडमननं स्वतःचं छायाचित्र सही करून विनूला भेट दिलं होतं आणि त्याखाली लिहिलं होतं 'गोलंदाज म्हणून विनूचं नाव माझ्या सदैव लक्षात राहील!'

विनू मंकड उजव्या हाताने फलंदाजी करणारे आघाडीचे फलंदाज होते. त्याची फलंदाजी फारच शास्त्रशुद्ध होती. त्याच्या आवडीचा आणि स्वभावाला साजेसा एक अडव्या बॅटीचा फटका होता. ऑफ स्टंप किंवा ऑफ स्टंपच्या बाहेर थोडीशी उंची असलेला ऑफब्रेक चेंडू तो किंचित उडी मारून अडव्या बॅटीने लाँग ऑन ते मिड विकेटच्या परिसरात उंचून टोलवीत असे. फटके तर मारावयाचे पण त्यात घेढुटपणा जाणवत नसे. फलंदाजीमध्ये अगदी आघाडीपासून शेवटच्या नंबरावर देखील तो खेळत असे. परंतु आघाडीचा फलंदाज म्हणून तो पुढे कायम झाला. १९५५-५६ साली मद्रास इथं झालेल्या न्यूझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यात पंकज रॉयच्या मदतीनं त्यानं पहिल्या विकेटसाठी ४१३ धावांची भागीदारी केली होती. तेव्हा पंकज रॉयने १७३ तर विनूनं २३२ धावा केल्या होत्या. हा विक्रम जागतिक असून तो अजून अबाधित आहे. १९४८ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या कसोटी सामन्यात त्यानी पहिले शतक काढले.

पूर्वी १०००० धावा व २०० विकेटस्चा दुहेरी मान मिळवायला ऑस्ट्रेलियाच्या मॉटी नोबेलला २७ कसोटी सामने लागले होते. असा दुहेरी मान मिळविणारे अष्टपैलू खेळाडू क्रिकेटमध्ये फक्त सतराच आहेत. त्यांत विनू हेच एकमेव भारतीय. १५ नोव्हेंबर १९५२ या दिवशी आपल्या तेविसाव्या कसोटी सामन्यात त्यानं वरील दुहेरी पराक्रम केला होता.

१० फेब्रुवारी १९५२ या दिवसाची भारतीय क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झाली आहे. या दिवशी भारतानं कसोटी क्रिकेटमधील पहिला विजय नोंदविला. इंग्लंड विरुद्धच्या या सामन्यात विनूची कामगिरी नेत्रदीपक होती. १०८ धावांच्या मोबदल्यात त्याने १२ खेळाडू बाद केले होते. त्या मूळेच भारताला हा पहिला विजय नोंदविता आला. विनूनं १९५५ मध्ये पाकिस्तानला गेलेल्या भारतीय संघाचे कर्णधारपद भूषविले होते.

फलंदाजाच्या अगदी जवळ उभे राहून क्षेत्ररक्षण करणाऱ्या जगातील उत्तम क्षेत्ररक्षकांच्या मालेत त्याचा समावेश केला जाई. त्यामुळेच की काय त्याने चेंडू टाकल्यावर फलंदाजाचा जलद धाव घेण्याचा धीर होत नसे. कारण चेंडू टोलविलेल्या जागी तो स्वतःच धाव घेई. त्यामुळे दुसऱ्या क्षेत्ररक्षकाची जरूरीच भासत नसे. तो नेहमी 'फाइनलेग' ला क्षेत्ररक्षण करी. त्या जागी तो असला

म्हणजे त्याच्याकडे आलेला चेंडू तत्क्षणी यष्टिरक्षकाकडे फेकला जाई. हा होता विनूचा चपळपणा!

मंकड जसा एक विक्रमवीर तसाच खरा खिलाडू वृत्तीचा होता. एकदा १९४६ साली दक्षिण इंग्लंड विरुद्ध भारतीय संघाचा कौंटी सामना होता. इंग्लंडच्या संघात नेमके अकराच खेळाडू होते. राखीव म्हणून कोणताही खेळाडू आला नव्हता. भारतीय संघ फलंदाजी करीत होता. आपल्या १०० धावा पूर्ण करुन मंकड नुकताच बाद होऊन तंबूत आला होता. त्याच वेळी द. इंग्लंडचा खेळाडू ए. पी. सिंगलटन याचा पाय दुखावल्याने त्याला क्षेत्ररक्षण करणे अशक्य झाले. त्या वेळी सिंगलटनच्या जागी मंकड क्षेत्ररक्षण करावयास आला. त्या वेळी भारतीय संघाची फलंदाजी अगदीच कमकुवत झाली होती. सर्वांच्याच अपेक्षा फक्त विजय हजारे यांच्यावर होत्या. मंकड सिंगलटनच्या जागी फाइन लेगला क्षेत्ररक्षण करण्यास आला. त्याच वेळी हजारेने एक चुकीचा टोला मारला आणि मंकडने जवळजवळ ३०-३५ यार्ड धावत जाऊन एक उत्कृष्ट झेल घेतला आणि हजारे बाद झाला! या झेलाची आणि विनू मंकडच्या खिलाडू वृत्तीची सर्वांनी खूपच तारीफ केली असल्यास नवल नाही.

जगातील इतर अष्टपैलू खेळाडूत कीथ मिलर, फँक वॉरेल आणि जॉन रीड हे प्रथम फलंदाज होते नंतर ओलंदाज. या उलट ॲलन डेव्हिडसन, रिची बेनो आणि ट्रेव्हर बेली हे प्रथम गोलंदाज होते, नंतर फलंदाज. या पार्श्वभूमीवर विनूचं स्थान आगळं आहे. तो खऱ्या अर्थानं अष्टपैलू होता. दोन्ही क्षेत्रातील त्याची कामगिरी समतोल अशीच झालेली दिसते. तो वयाच्या ४१ वर्षेपर्यंत कसोटी सामने खेळत होता. एकून ४४ कसोटी सामन्यांत त्याने २१०९ धावा केल्या. भारतीय क्रिकेटमध्ये सर्वोच्च धावा काढण्याचा मान जसा (२३१) विनूच्या नावावर मोडतो तसा सेकंड हायेस्ट धावांचा मानही (२२३) त्याच्याकडेच जातो. गोलंदाजीच्या बाबतीत त्याने एकून १६२ कसोटी बळी घेतलेले आहेत. त्याची फलंदाजीची सरासरी ३१·४७ तर गोलंदाजीची सरासरी ३२·३१ अशी पडते.

विनूच्या आयुष्यात काही पराभवही आले. भारताचा कप्तान होऊनही त्याला अजियात चांगली कामगिरी करता आली नाही. आपल्या कारकीर्दीच्या अत्युच्च शिखरावर असताना कदाचित व्यावसायिक क्रिकेटपटू असल्यामुळे निवृत्त होणे त्याला शक्य झालं नाही. पण विनूचे पराक्रम इतके तेजस्वी आहेत की त्याच्या किंचित अपयशानं ते तेज कणभरही कमी व्हायचं नाही.

आपल्या असामान्य 'फिरकी' गोलंदाजीने विनूनं एक काळ गाजविला होता. आजच्या फिरकी गोलंदाजाबद्दल मंकड ह्याचे विचार असे होते- 'आमच्या वेळच्या परस्थितीत हे गोलंदाज टिकले नसते. तसेच चांगल्या खेळपट्टीवर कशी गोलंदाजी करावी हे तंत्र अजून ते पूर्णपणे शिकलेलेच नाहीत!'

विनू दिवसाकाठी आठ तास क्रिकेटचा सराव करीत असे क्रिकेटमध्ये 'टोटल प्रोफेशनल आउटलुक' असल्याशिवाय क्रिकेट जमणारच नाही, याबद्दल त्याची खात्री होती. विनूचा क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा 'प्रोफेशनल' होता. त्यासाठी 'आयर्न नर्व्ह'चा मनुष्य लागतो, हे विनूला माहीत होतं. विनूचा क्रिकेटचा ओढा पाहून त्याच्या वडिलांनी त्याला विचारलं होतं,— ' क्रिकेट खेळून पोट भरतं का ? '

विनूनं त्या प्रश्नाला उत्तर दिलं नाही, पण त्यानं प्रत्यक्ष कृती करुनच त्यानं सिद्ध केलं की खेळून पोट चांगलच भरू शकतं!

मनुष्याच्या अंगी जेव्हा जिद्द व रग असते त्या वेळी त्याचे कौतुक व प्रशंसा होत असते हा एक निसर्ग नियमच आहे. विनू मंकडने साठी ओलांडली असताना त्यांची शारीरीक, मानसिक स्थिती कशी आहे याकडे किती जणांचे लक्ष होते ? त्यांच्याकडे पाहिले म्हणजे त्यांचा तो पूर्वीचा तजेलदार, हसरा चेहरा दिसत नव्हता. जिंकणे वा हरणे याची कधीही पर्वा न करता जीवनाकडे उत्साहाने पाहणारा माणूस त्यांच्या मुलाच्याच शब्दात सांगावयाचे तर ' माझ्या वडिलांना आता जगण्यात काहीच स्वारस्य वाटत नाहीसं झालं आहे ' या स्थितीला पोहोचला होता. घरी आणि सरकारीही त्यांच्या परिश्रमाचे फळ त्यांना मिळाले होते. घरी त्यांचे सुपुत्र अशोक व राहूल ह्या दोघांनीही क्रिकेट जगात आगेकूच चालू ठेवली आहे तर भारत सरकारनेही त्यांना त्यांच्या ह्या क्रिकेटच्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल ' पद्मभूषण ' ही पदवी देऊन त्यांचा योग्य असा गौरव केला आहे. अशा रीतीने ' पूर्ण समाधानी ' असे त्यांचे जीवन गेले म्हटले तर वावगे ठरू नये.

हे क्रिकेटमधले तेज जे अष्टपैलू खेळाडूच्या रूपाने उदयास आले होते ते २० ऑगस्ट १९७८ रोजी लोप पावले आहे. क्रिकेटमधील एक तेजस्वी तारा ढळला आहे. विनूच्या जाण्यामुळे संपूर्ण क्रिकेट जगताची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. त्याने क्रिकेटमध्ये अनेकांना मार्गदर्शन केले. अनेकांनी त्याचा खेळ आत्मसात केला आहे. विनू हा खेळाडू जरी हरपला असला तरी त्याचा खेळ त्याच्या अनेक शिष्यांनी, मित्रांनी, क्रिकेटपटूंनी आणि प्रेक्षकांनी जतन करून ठेवला आहे. असा विनूचा नेत्रदीपक खेळ मात्र सर्वसामान्य प्रेक्षक कधीही विसरणार नाही. □

# नातं

रविंद्र बा. खरात
तृतीय वर्ष वाणिज्य

'नाही! नाही!! वाटेल ते झालं तरी मी लग्न आता करणार नाही'

'तुला करायला हवं!'

'पण का?'

'आमच्या सुखासाठी'

'सारं जीवन काय तुमच्या सुखासाठी घालवू?'

'आत्तापर्यंतचं आयुष्य आम्ही तुझ्या सुखासाठी खर्च केलं. आता तू आमच्या सुखासाठी खर्च केलं पाहिजे.'

'करीन. पण लग्न करणं म्हणजे आईबापांना सुख देणं नव्हे'

'मुलाचं लग्न करण्यात आईबापांना काय सुख असतं ते तुला अनुभवाशिवाय नाही कळायचं.'

'पण मला अजून पाच वर्षं लग्न करायचं नाही.'

'मी तुझा बाप सांगतोय, तुला लग्न करावं लागेल. त्यासाठी मुली पहायला मी सुरवात केली आहे.'

'तर मग माझंही ऐका. मी ह्या पाच वर्षात लग्न करणार नाही; आणि केलंच तर आंतरजातीय करीन.'

'ऑं?'

'होय!' तो तडक बाहेर चालता झाला.

'सतीश! तू तरी समजूत घाल ह्या नाऱ्याची! आजकालची चार पुस्तकं शिकलेली पोरं —' खांद्यावर उपरणं टाकीत अण्णा उठले.

'अण्णा! फार हातघाई करता तुम्ही! मी समजूत घालीन त्याची".

सतीश उठला. नारायणच्या गावाला जायचं म्हणून इतका आतुर झाला होता आणि ... आणि आल्यापासून दोघा बापलेकांचा झगडा ऐकत होता. त्याला काय करावं हे कळत होतं आणि नव्हतंही! आता असह्य व्हायला लागलं. नारायण चौकातल्या पारावर पोरांशी गप्पा मारुन भांडण विसरायचा प्रयत्न करीत असणार हे त्याला माहीत होतं. तो लगेच नारायणाशी बोलू इच्छित नव्हता. त्यापेक्षा शांतपणे गाजराच्या वावराभोवती फिरावं असं त्याला वाटू लागलं.

वाट तुडवत-तुडवत तो शेतात कधी येऊन पोहोचला हे त्याचं त्यालाही समजलं नाही. उन्ह कलली होती आणि नेमकं ह्याच वेळेला निसर्गराणीनं साज-शृंगार करायला सुरवात केली होती. सतीश मोहरला. नारायणला सारखी गांवची ओढ का? ह्या प्रश्नाचे उत्तर अण्णा-नारायणचे भांडण सोडले तर प्रत्येक गोष्टीतून त्याला मिळाले होते. नारायणचा प्रश्न कसा सोडवावा ह्याचा विचार तो आकाशाकडे बघत करीत बसला होता आणि तो एकदम ओरडला ...त्याच्या डोक्यावर काहीतरी पडलं होतं. समोर पाहतो तर एक आस्टरचं फूल आणि बाजूला शालिनी हसत उभी!

'मला घाबरवून तुला काय मिळालं?'

'एका माणसाची गंमत करायला मिळाली. तुम्ही शहरी लोक किती हो भित्रे? नुसत्या फुलांना घाबरता! दगडांना?'

'स्वतः दगड असल्याने दगडांना घाबरताच येत नाही.'

'तुम्ही? दगड?' शालिनी पुन्हा जोरजोरात हसायला लागली.

'ए! ते जाऊ दे, तुला एक विचारु का?'

'विचारा की!'

'तू मला ते अहो. जाहो म्हणणं सोड.'

'ते नाही शक्य.'

'का?'

'अहो, तुम्ही शिकलेली माणसं ज्ञानानं वयानं मोठी!'

'बस...बस...बस! विषय दुसरीकडे जायला लागला. तुला विचारायचं होतं की अण्णा नारायणच्या लग्नाच्या

मागे का लागलेत ?'

'अण्णा म्हणजे निवडुंग आहेत-विरक्त.नारायण-शालिनी नावाच्या दोन गुलाबपुष्पांना त्यांचं काटेरी कुंपण. त्यातील एक फूल ते देऊ इच्छितात आणि एक मिळवू—— '

'थांब! वाटलं नव्हतं इतकी प्रतिभा असेल तुझ्यात!'

'उगाच भाव खायचा नाही हं!'

'बरं बुवा! माघार! पण मग खेड्यातल्या रीतीप्रमाणे तुझं लग्न त्यांनी प्रथम करायला हवं. ते नारायणच्या का मागं?'

'बराच वेळ झालाय. मी निघते घरी'

'मीही आलो तर चालेल ना?'

'चालेल! पण ह्या विषयावर न बोलता?"

'का?'

'घरातल्या गोष्टी सर्वांनाच सांगायच्या नसतात.'

'मी तुला बाहेरचा वाटतो?'

'न.. न...नाही...तसं नाही पण'

'मग कसा वाटतो?'

'इश्य' म्हणून शालिनी पळायला लागली आणि तिच्यापाठोपाठ सतीश.

'थांब शालिनी. मी नाही विचारीत.' सतीश ओरडला आणि समोर अचानक ट्रक आल्यावर रिक्षानं ब्रेक मारावा तशी शालिनी थांबली. सतीश जवळ आल्यावर ती खेकसली, 'एवढं मोठ्यानं ओरडता?'

'का? काय झालं?'

'अहो आजूबाजूची माणसं वेडी ठरवतील ना दोघांनाही.'

'मग तर अजून जोराने ओरडेन. नाहीतर अण्णा नारायणच्या मागे का लागलेत ते सांग!'

'ऐकायचंच तर?'

'हो?'

'नारायणच्या लग्नात मिळणारा हुंडा माझ्या लग्नात देता यावा म्हणून!'

'अस्सं आहे काय?' सतीश चालता चालता नखं कुरतडू लागला.

'अस्सं हो काय! शहरातले असून नखं कुरतडता?'

'शाले! आयडिया' तंद्री मोडल्यासारखा सतीशने एकदम हात पुढे केला.

'हे काय?' दचकलेली शालिनी.

'नारायणने हुंडा घ्यायचा नाही आणि तूही द्यायचा नाही.'

'ते कसं शक्य...'

'सारं काही शक्य आहे. कळेल तुला.'

रस्ता संपला होता. अंधाराने काळोख करायला सुरवात केली होती. परंतु चंद्र उगवला होता. दूर क्षितिजाजवळ.

× × × ×

'हॅ ऽऽ लो! कितपत झाली तयारी?' दाणकन नारायणाच्या पाठीत थाप बसली. तो कळकळला आणि चिडून स्तंभितच!

'सत्या तू होय! आज दुपारचा कलमडलास होस्टेल-वर? घर सोडून?'

'घरात —— त्या चार भिंतींच्या आत कंटाळा येतो.'

'माझ्या खोलीलाही चार भिंती आहेत म्हटलं!'

'हो! पण त्या कळ दाबली तर उघडतील अशा! बरं ते जाऊ दे. तयारी कितपत झाली?'

'आत्ताशी आशिया ...'

'अभ्यासाचं सोड. तू एम्. ए. झालास. सर्टिफिकेट देऊ का मी? लग्नाचं बोल तुझ्या!'

'लग्न? तुला माहित आहे मी पाच वर्षे ..'

'पण का?'

'अरे मला सेटल व्हायला ...'

'साफ खोटं!' निर्ढावलेला सतीश.

'मग दुसरं काय?'

'तुला इंटर-कास्ट करायचंय ना? अण्णांना म्हणाला होतास.'

'ती धमकी रे! इंटर-कास्ट कधी होतात? प्रेम असल्या-वरच ना?'

'तुझं प्रेम नाही कोणावर?'

'अं. ऽ हं!"

'मला माहित आहे बाळ! तुझं एका परजातीतल्या मुलीशी प्रेम आहे. तिचं नांव नलिनी कुलकर्णी; माझी सख्खी बहिण.'

'स ऽ त्या! तुला कसा सुगावा लागला? म्हणून चिडून आलास माझ्याकडे?'

'इतका नीच आणि पुरोगामी ...आपलं प्रतिगामी विचारसरणीचा वाटतो मी?' अरे आज नाही ओळखलं मी हे! गेल्या वर्षापासून ... म्हणजे तुमचं जमल्यापासून,

'शपथ?'

'शपथ! नारायणाची!! आणि आई-बाबा ॲग्री आहेत. आता जूनमध्ये उडवू लग्नाचा बार!'

'वा! माय डिअर सत्या!' हर्षवायूने झपाटल्यासारखा हात पुढे करीत नारायण ओरडला.

'थां ऽऽ ब!' तितक्याच गंभीरतेने सतीश म्हणाला, 'त्याच बरोबर दुसऱ्या एकाचाही बार उडवायचा आहे.'

‘ कोणाचा ? ’

‘ माझा ! ’

‘ अरे व्वा ! कोण मिळविलीस एवढी …’

‘ शालिनी भोसले. राहणार वडगांव. श्री. अण्णा भोसलेंची कन्या. आणि नारायण भोसलेंची …’

‘ वहिण … पण हे शक्य नाही. ’

‘ का रे ? तू प्रतिगामी … ’

‘ नाही रे बाबा ! पण ती स्त्री आहे. हा आंतरजातीय विवाह. नलीनीशी लग्न केल्यावर मला घर परागंदा होणार ! तुझ्याशी केल्यावर तिला. ’

‘ मग काय करू मी ? तुझं नलिनीवर जसं उच्च .. अतिउच्च प्रेम आहे ना तसं माझंही शालिनीवर. ’

‘ कधी जमलं ? ’

‘ तुझ्या घरी आलो तेव्हा उद्योग काय होता ? ’

‘ भले बहाद्दर ! ते ठीक रे ! पण अण्णांचं काय ? त्यांना नाही पसंत पडणार हे ! ’

‘ तुम्ही नुसतं प्रेम करता राव ! आम्ही प्रयत्न करतो. ’

‘ म्हणजे ! ’

‘ अरे तिकडून आल्यावर दोनदा तुझ्या नकळत अण्णांकडे गेलो … आणि त्यांचं मन बदलवलं. एकदा आई-बाबांना भेटूनही गेले. आजच पत्र आलंय त्यांचं ! वाच. ’ अधीशासारखे पत्र नारायणने ओढले आणि वाचू लागला.

श्री. आप्पा कुलकर्णी,

जास्त लिहीत बसत नाही. यंदा मेमध्ये नारायण-नलिनी, सतीश-शालिनी ह्यांचं उरकून टाकू या. फक्त पुण्याला घ्यायचं कि वडगांवला ते ठरवा तुम्ही वडगांवला ठेवलं तर गांवच्या प्रमुखानेच दोन्हीही पोरांची लग्ने दुसऱ्या जातीच्या पोरांशी केली असा आदर्श मिळेल सर्वांना ! पहा कसं ते ?

सर्वांना आशीर्वाद.

तुमचा

अण्णा

‘ सत्या … माय प्रेमळ सत्या ’ म्हणत नारायणने सत्याला मिठी मारली. होस्टेलच्या खोलीत दोन मित्र एक-मेकांच्या मिठीत होते. नाही … नाही दोन मेहुणे ! एकमेकांचे ! !

□

---

## चांदणं हसतंय

चांदणं हसतंय
निरंतर आज
गंध वाहतो
रातराणीचा,
मदन हसतो
भर ज्वानीचा,
वारा झोंवतो
स्पर्श सुखाचा.
नीरव रातीचा
माझ्या मनात
चांदणं हसतंय
निरंतर आज
चांदणं हसतंय
निरंतर आज

शब्बीर मुलाणी, तृतीय वर्ष कला

## नियती

नियती मला नाचविणारी,
मी फक्त बाहुली,
नियती खरी जगणारी
मी फक्त सावली
नियती खरी हसणारी,
मी फक्त प्रतिमा,
नियती खरा प्रकाश,
मी आहे कालिमा
नियती अखेर सत्य आहे,
मी फक्त आभास,
नियती मर्त्य असूनही,
मी तिचा श्वास !

सविता कुलकर्णी, बारावी शास्त्र

# प्रवास

**एस्. सी. गोवईकर**
अकरावी शास्त्र

प्रवास म्हटले म्हणजे लोकांच्या मनात एक आगळाच उत्साह संचारतो. लहान मुले तर 'आम्ही उद्या गावाला जाणार' असे दुसऱ्यांना पुन्हा पुन्हा सांगत हिंडत असतात नंतर ते नेहमीचे कपडे घाई घाईने धुणे उन्हात टाकून कसेबसे वाळवणे व नंतर वाळलेले, न वाळलेले सगळे कपडे एकत्र करून सूटकेस भरणे चालू होते. रिझर्व्हेशन आधीच करून आणलेले असते. तरी म्हाताऱ्या माणसांचे 'अरे लवकर जा. गाडीला उशीर होईल' वगैरे नेहमीचे उपदेश चालू होतात. अर्थातच त्याकडे कुणाचेच लक्ष नसते. मग लहान मुलांना सावरत सूटकेसेस हातात घेत, 'येतो आता' असे म्हणत पुन्हा पुन्हा मागे पहात निघणे सगळे नेहमीचेच पण एक प्रकारची मजा असते त्यात.

खरे तर आपल्या मनात प्रवासाची एक वेगळीच कल्पना असते. आता स्टँडवर जायचे, गाडी पकडायची, रिझर्व्हड सीटवर बसून निवांतपणे आपल्याला पाहिजे तिथे जायचे, असे प्रत्येकजण ठरवत असतो. अर्थात आपण तसे ठरवतो. त्याच्या नेमके उलटच होत असते. आता हेच पहा ना.

आम्ही एकदा असेच उन्हाळ्याच्या सुट्टीत म्हणून साताऱ्याला जायचे ठरवले. सगळी गडबड आटोपून आम्ही घरून निघालो. स्टेशनवर वेळेवर पोहोचलो पण नेहमीप्रमाणे गाडी 'लेट' होती. आता वेळ कसा काढावा? असा विचार मनात आला. मग इकडे फीर तिकडे जा. हे घेऊन खा, त्या गाडीची पाटी बघ असे करू लागलो. शेवटी एकदाची गाडी आली. (प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा आपल्या भक्ताची परीक्षा घेताना त्याला एवढे तिष्ठवत नसेल एवढे त्या गाडीने आम्हांला तिष्ठवले.) गाडी आली आहे हे कळताच सगळे लोक (ज्यांना त्या गाडीने जायचे होते.) एखादी सोन्याची खाण सापडल्यावर सोने घ्यायला धावावे तसे धावत सुटले. त्या अफाट गर्दीत चिरडलो जाऊ लागलो. अर्थात आमचे रिझर्व्हेशन होते त्यामुळे गाडीत प्रवेश मिळाला. गाडीत प्रवेश करताना आमच्या बंड्याला शेवटी त्या गाडीला साष्टांग दंडवत घालावाच लागला. एका म्हाताऱ्याची काठी त्याच्या पायात अडकल्यावर तो तरी काय करणार म्हणा.

आम्ही आमच्या सीटपर्यंत पोहोचलो नाही तोच 'गाडीत नवीन कोणीही चढायचे नाही' अशी कंडक्टरने ठोकलेली आरोळी ऐकू आली. मग त्या कंडक्टरला आम्ही केलेले रिझर्व्हेशन दाखवावे लागले तेव्हा आम्हांला जागा मिळाली. गाडी गच्च भरली होती. माणसांचे 'बाईच म्होरं सरका की.' 'जागा न्हाई तर कुठं सरू' वगैरे चालू झाले. तेवढ्यात माझ्या शेजारी एक ढोला माणूस येऊन उभा राहिला. मी त्याच्याकडे पहात असतानाच कंडक्टरने 'घेल' मारली आणि आमची गाडी सुरू झाली, सुरू झालेली गाडी थोडे अंतर काटते न काटते तोच—माझ्या अंगावर धाडकन कसले तरी भले मोठे बोचके येऊन पडले माझ्या सर्व हालचाली जवळजवळ बंद पडल्या. श्वास तर घुसमटला जाऊ लागला. मी कसे बसे डोळे उघडून बघतो तर तो ढोला माणूस माझ्या अंगावर पडला होता. काही माणसे "अरे अरे पोरगं मेलं त्याला सोडवा' करायला लागली पण प्रत्यक्षात तर कोणीच सोडवायला उठत नव्हते. शेवटी एक तीन—चार माणसांनी त्या ढोल्याला एखादे जड वाळूचे पोते फरफटत ओढून काढावे तसे काढले. तरी तशाही परिस्थितीत श्रीकृष्णाने एवढा मोठा गोवर्धन पर्वत नुसत्या करंगळीवर कसा उचलला असेल असा विचार माझ्या मनात येऊन गेला. त्या माणसाला बाजूला काढल्यावर मी मोकळा श्वास घेऊ लागलो.

हे सगळे झाल्यावर आमचे उतरायचे स्टेशन आले आणि आम्ही वाटेत बसलेल्या माणसांवरून आणि त्यांच्या

सामानावरून कसरत करीत खाली उतरलो.

रिक्षा करून घरी जातो तोच दाराला कुलूप. आधीच प्रवासात एवढा त्रास झालेला, तशात दाराला कुलूप. आम्ही कपाळावर हात मारला व तिथेच बसलो. पोटात कावळेच नव्हे तर जगातले सगळे प्राणी गोळा होऊन शक्य तितक्या जोरात ओरडत होते. अशी बराच वेळ वाट पाहिल्यावर बाहेर गेलेली मंडळी आली व ' अगबाई, तुम्ही आलात होय! आम्ही म्हटले जरा बाहेर जाऊन यावे, काही त्रास नाही ना झाला ! ' करीत आमची मामी पुढे आली. म्हणे त्रास नाही ना झाला? असा राग आला होता पण काय करणार? राग घालवून मी मुकाट्याने उठलो व सर्व मंडळींबरोबर आत गेलो.

□

---

## विकलांगावस्था

कधी कधी उफाळून येते
मनाच्या गाभाऱ्यातली विलक्षण चीड
समोर दिसेल ती वस्तू
फेकते मी न बाळगता कोणाचीही भीड
कधी तरी मनाच्या बागेत
दरवळून जातो आनंद आनंद
साऱ्या जगभरच्या वस्तूमात्रांना
येतो निशिगंधाचा मंद सुगंध
केव्हा तरी होत जाते
मन माझे उदास उदास
सगळीकडून चाहूल देतात
त्रिष्णतेचे भासच भास
कधी काळी झंकारत जाते
मनात रसिकतेची वीणा
लकेरीच लकेरी गाते मी
आळवीत ' त्या ' अनामिक कोणा
असे माझे वेडे मन
काही काही होत जाते
असे त्याने ' होण्या ' मधेच
मी वेडी जगत असते

विद्या शेणॉय, ११ वी वाणिज्य

तिची अंत्ययात्रा चालली आहे
तिचा जिवंत देह
तिच्या लाचार रक्ताचे सडे पाहून
भेसूर आक्रोश करत आहे
आणि ' मानवता हा श्रेष्ठ धर्म आहे '
असं बुळबुळीत वाक्य ऐकून
खिन्न खदखदत आहे.
खिस्त गांधींच्या तत्त्वज्ञानाच्या
सरणावरती जळताना
ती अनेकदा फुटून गेली आहे
मनोमनी तुटून गेली आहे
जिवंत असूनही,
अस्तित्व नसलेला तिचा देह
तिच्या बाळांनी खांद्यावर तोलला आहे
आणि ती ओरडतीय—
' माझ्या बाळानं मला विकलंय हो
माझ्या बाळानं मला विकलंय
माझ्याच राखेचा भस्म म्हणून उपयोग चाललाय
ह्या भस्मालाच भस्मिसात करून टाका
देव नसलेला देव्हारा
आणि आत्मा नसलेला देह
ह्या पलीकडे माझ्या ठेचकाळलेल्या
ह्या दु:शासनानं विटंबलेल्या
देहाची काय किंमत ?

—स्मिता ज. पुन्डले

कविवर्य मोरोपंत आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा–बारामती
प्रथम क्रमांकाचे भाषण–

# डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर–एक मूल्यमापन

**जी. पी. गायकवाड**
द्वितीय वर्ष कला

प्रत्येक मनुष्य मग तो कोणत्याही देशातला वा समाजातला असो, त्याला या जगात माणूस म्हणून जगता यावे ही त्याची एकमेव इच्छा असते. ज्ञानेश्वरांसारखे महान तत्त्वज्ञ मानव म्हणून जगण्यासाठी धडपडले. समाजात आपल्याला ब्राह्मण म्हणून जगता यावे यासाठी त्यांनी पैठणच्या ब्राह्मणवृंदापुढे लोळण घेतली. पण या सनातनी समाजाने त्यांच्या चमत्कृतिपूर्ण कार्यावर खूष होऊन त्यांना देव मानले, परंतु ब्राह्मण म्हणून समाजात प्रतिष्ठा दिली नाही. त्याचप्रमाणे युगानुयुगे स्वतःला हिंदू म्हणवून घेणारे व स्पृश्यही ज्यांना हिंदू म्हणून मानीत होते अशा या पददलित समाजाला या स्पृश्य हिंदू समाजाने माणूस म्हणून समानतेची वागणूक कधीही दिली नाही. आणि म्हणूनच शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान विद्वानाला आपल्या साऱ्या समाजासह हिंदुधर्माचा त्याग करावा लागला.

युगानुयुगातून एखादा महान पुरुष निर्माण होतो. दीन-दलित, पिडित समाजाला नवविचारांचा संदेश देतो आणि त्याच विचाराने त्या समाजाचा उद्धार होतो. भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षितिजावर अनेक तेजस्वी तारे चमकले. पण शतकानुशतके भारतीय संस्कृती सात-आठ कोटी मानवांना, अस्पृश्यतेच्या कोंडीत जखडून टाकलेल्या गुलामांना मुक्त करू शकली नाही. डॉक्टरांनी या वर्गाला माणुसकीचे हक्क मिळवून देऊन माणूस म्हणून या वर्गाची जगाला ओळख करून दिली. युग बदलणारी माणसंच समाज बदलू शकतात. त्या पुरुषांच्या अस्तित्वानं एक झंझावती वादळ समाजात सुरू होतं आणि त्या समाजाचा चेहरा-मोहराच बदलून जातो आणि याच पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी केलेल्या धर्मांतराचं मूल्यमापन तुम्हांआम्हांला करायला हवं आहे.

इकडे आंबेडकरांनी धर्मांतर केले असेल तिकडे डॉ. मार्टिन ल्यूथरने आपल्या प्राणांचं बलिदान केलं असेल परंतु अजूनही वर्णभेदाची नी जाती विषमतेची पाळेमुळे नष्ट झालेली नाहीत. मानवतेला लागलेली ही कीड मानवी संस्कृतीचा वृक्ष दिवसेंदिवस पोखरतच चालली आहे- अमेरिकेतील निग्रो काय, जर्मनीतले ज्यू काय किंवा भारतातले अस्पृश्य काय! पशूंसारखं त्यांना छळण्यात येतं, भर रस्त्यावर ऐन दुपारी सुधारलेले अमेरिकन काळ्या कातडीच्या निग्रोंना दगडा धोंड्यांनी ठेचून मारतात. आणि इकडे स्पृश्य हिंदू हरिजनांची त्यांच्या संसारासहित होळी करतात–चर्मकरभ्योः नमः! कुलालेभ्योः नमः! चांभाराला मस्कार असो,कुंभाराला नमस्कार असो, हिंदूचा वेद चांभन, राला नमस्कार करतो पण हाडामासाचा चांभार देवळात शिरू शकत नाही. आमच्या पाणवठ्याचं पाणी भरू शकत नाही. वेदातला चांभार ठीक आहे पण व्यवहारातला नको आहे, परवा खैबर खिंडीतून आलेले मुसलमान आमच्या विहीरीचे पाणी भरू शकतात, काल समुद्राच्या मार्गाने हातात तागडी घेऊन आलेले ख्रस्ती पावचा तुकडा खाऊन आमच्या पाणवठ्याचे पाणी पिऊ शकतात परंतु हाडामासाचे असणारे हिंदू हरिजन ते पाणी भरू शकत नाहीत. कायद्याने पाणवठे खुले केले तरी कायदयाने माणुसकीची जोपासना होत नाही. आणि माणसातील हीच अमानुषता हेच अमानुष क्रौर्य एखाद्या नामांतराच्या वेळी प्रकट होते नामांतर कशाचे? कुणाचे? आणि बळी घेतले जातात कुणाचे? होळ्या होतात त्या कुणाच्या संसाराच्या? काल

स्नेह असणाऱ्या, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी असणारी माणसं क्षणात आज एकमेकांशी शत्रु होताहेत आणि हे सारं चित्र पाहिल्यावर प्रश्न पडतो की एवढा आटापिटा करुन डॉ. आंबेडकरांनी केलेल्या धर्मातरानं काय साधलं ?

अर्थात हा प्रश्न बाजूला ठेवूनच डॉ. आंबेडकरांनी ज्या पार्श्वभूमीवर धर्मांतर केलं ती पार्श्वभूमी पाहिली पाहिजे. हिंदुत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच अस्पृश्यांची आहे. हिंदूत्वाची प्राण प्रतिष्ठा जितकी वसिष्ठासारख्या ब्राह्मणांनी, कृष्णासारख्या क्षत्रियांनी, हर्षासारख्या वैश्यांनी, तुकारामासारख्या शूद्रांनी केली, तितकीच वाल्मिकी चोखामेळा, रोहिदास इ. अस्पृश्यांनीही केलेली आहे. हिंदू संस्कृतीच्या संतांनी निर्माण केलेल्या या समतेचा घोष पुढच्या काळात कुणी उत्कटतेने घोषविला नाही. समता वाळवंटातून पुढे मंदिरात गेली नाही. घरी दारी पाणवठ्यावर गेली नाही हिंदू धर्म सांगतो की सर्व मनुष्य ईश्वराचीच रुपे आहेत. येथे उच्च-नीच कोणी नाही असे असताना हिंदुधर्मीय स्पृश्य लोक हिंदु असणाऱ्या अस्पृश्यांना समानतेचे अधिकार देण्यास टाळाटाळ करतात. हे डॉक्टरांनी पाहिलं आणि म्हणूनच त्यांचा रोष होता तो हिंदू संस्कृतीने मान्य केलेल्या समाज व्यवस्थेवर व चार्तुवर्ण्य पद्धतीवर ! कारण त्यांनीच अस्पृश्यांना मातीमोल करुन टाकले होते. जगाच्या पाठीवर असणार नाही अशी अत्यंत दयनीय व लाजिरवाणी स्थिती त्यांनी करुन टाकली होती.

आंबेडकरांच्या मते हिंदुसमाज हा एक मनोरा आहे. एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला आहे. पण या मनोऱ्याला शिडी मात्र नाही; आणि म्हणूनच एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्यांनी त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यातला इसम मग तो कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यांत प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटण्याची प्राज्ञा नाही. अशी ही हिंदू समाजरचना आहे. आणि त्याचं प्रत्यंतर आंबेडकरांनाही आले होते. विद्यापीठाच्या एका पदावर नेमणूक करताना आंबेडकरांच्या कमी गुणवत्तेच्या माणसाला ते पद दिले गेले. आणि या प्रकांड बुद्धिमत्तेकडे रँग्लर परांजप्यांसारख्यांनी सुद्धा काणाडोळा केला ही गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे. अशी एकच झळ या व्यक्तिमत्त्वाला लागलेली नव्हती तर सवर्ण हिंदू शिपाईसुद्धा त्यांच्या टेबलावर फायली वरुन टाकून देत होता. आणि या प्रकांड बुद्धीच्या प्राध्यापकासाठी पाण्याचा वेगळा माठ ठेवला जात होता. डॉक्टर आंबेडकरांना मिळालेल्या या अवमानित वागणुकीच्या पार्श्वभूमीवरही त्यांच्या धर्मांतराचा विचार करायला पाहिजे. त्याचबरोबर सामूहिक रीत्या समाजाच्या दृष्टीकोणातूनही विचार व्हायला पाहिजे

अस्पृश्य हे अस्वच्छ वागतात, गोमांस खातात म्हणून ते वाळीत टाकले गेले म्हणावे तर स्वच्छतेने राहणाऱ्या व मांसाहार सुद्धा न करणाऱ्या हरिजनांना स्पृश्य समजण्यात येते का ? उलट गोमांस खाणारे मुसलमान स्पृश्य समजण्यात येतात. हे हिंदूंच्या दृष्टीने कसे काय चालते ? तर अस्पृश्यांना अस्पृश्य मानणे ही केवळ हिंदूंची लहर आहे. त्या लहरीला ते रुढी मानतात आणि रुढींचा कायदा जबरदस्तीने अस्पृश्यांवर लादण्यात येतो. हिंदूधर्मांतर्गत समाजव्यवस्थेचे हे वैशिष्ट्य एकट्या दुकट्या माणसाला लागू नव्हते तर ७–८ कोटी लोकांच्या विशाल समुदायाला या समाजाने अपवित्र मानले होते आणि ही अस्पृश्यता केवळ अल्पकालीनच नाही तर मरणोत्तरही कायम स्वरूपाची आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकर अस्पृश्यतेला चिरकालीनत्व देणाऱ्या या संस्कृतीला बदनाम संस्कृती असल्याचे संबोधतात, अर्थात ईश्वराची याचना करणारे डॉ. आंबेडकर हे एक परंपरागत अस्तिक होते, परंतु या भाविक अस्तिकाला नास्तिक करण्यास हा हिंदू समाज कारणीभूत झाला हे लक्षात घेतले पाहिजे, एवढेच नव्हे तर एका नास्तिकाबरोबर लाखो नास्तिक या समाजाने तयार केले. ज्याला भगवत् गीतेशिवाय कोणताही ग्रंथ पूज्य व प्रमाण नव्हता तोच पुढे गीता म्हणजे श्रीकृष्णाचे गुणगान करण्यासाठी गवळ्यांनी रचलेला पोवाडा आहे, असा उपहास करणारा निघाला, या साऱ्या कृतींत नि उद्गारांत आंबेडकरांचा त्वेष आहे की त्यांनी सोसायचं म्हणून किती सोसलं ! "जुल्म और जब्र की भी हद होती है-- दबेपर चिंटी भी काट लेती है।" अहो चिरडली जाणारी मुंगीसुद्धा कडाडून चावा घेते आणि ही तर चालती बोलती संवेदनाशील असणारी जिवंत माणसं होती.

एवढं असूनसुद्धा हिंदुधर्मातच राहून समानतेचे—न्यायाचे हक्क मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आंबेडकरांच्या दृष्टीने धर्मासाठी माणूस की माणसासाठी धर्म हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांच्या मते धर्मासाठी माणूस नसून माणसासाठी धर्म आहे. कोणत्याही धर्माचा आचरणात्मक भाग हा त्या धर्माच्या तत्त्वज्ञानावरच अधिष्ठित असला पाहिजे आणि तो तसा नसेल तर त्या धर्माला अंतिम ध्येय असू शकत नाही. एखाद्या समाजाचा आचारात्मक धर्म त्या समाजाच्या विचारात्मक धर्माच्या नांगरास जखडलेला नसेल

तर होकायंत्राशिवाय समुद्रात लोटून दिल्याप्रमाणे त्याची स्थिती होते आणि असा आचारात्मक धर्म प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाची चळवळ आरंभली. त्या वेळी अस्पृश्योद्धाराचा गाजावाजा करणाऱ्या आमच्या हिंदुमहासभेने अस्पृश्यांसाठी वेगळी देवळे बांधण्यासाठी टूम काढली. किती केविलवाणी गोष्ट आहे ही! नशीब हे की अस्पृश्यांसाठी वेगळे रस्ते, निराळ्या ट्रक गाड्या, कोर्टकचेऱ्या सुचविल्या गेल्या नाहीत. नुसता वेगळा मतदार संघ मागितला तर आकाशपाताळ एक करण्यात आले आणि जर त्यांनी निराळ्या गोष्टी मागितल्या असत्या तर आकाशच कोसळून पडलं असतं. आंबेडकरांचा आग्रह हा समान हक्काचा होता. तो हक्क त्यांना भांडून मिळवायचा होता. त्यांना हिंदूंची दया-उपकार नको होते. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे असे गांधीजीपासून सारेजण म्हणत होते. पण आंबेडकरांच्या मते तो हिंदू धर्मावरील कलंक असेल तर तो तुम्ही घालविण्याचा प्रयत्न करा. आम्ही हा नरदेहावरील कलंक आहे असे मानतो म्हणून तो घालविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आणि याच दृष्टीने त्यांनी महाडचा सत्याग्रह केला. परंतु रक्तात भिनलेले संस्कार रक्त सांडल्याशिवाय बाहेर पडत नसतात आणि महाड-नाशिक या ठिकाणी त्यांना रक्त सांडावं लागलं-तरीही हिंदूंचे संस्कार नष्ट झाले नाहीत. डॉ. आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली देवालये आणि पावन झालेली तळी स्पृश्य हिंदूंनी पशूच्या मलमूत्रांनी शुद्ध करून घेतली शेवटी. धन्य तो धर्म!

जो धर्म पंक्तिप्रपंच करतो, कोट्यावधी लोकांना स्वतःच। अपराध नसताना गुन्हेगारापेक्षाही वाईट रीतीने वागवतो- विशिष्ट वर्गाच्या लोकांना पिढ्यान पिढ्या इहलोकीच्या नरकयातना भोगावयास लावतो. माणूस असूनसुद्धा त्यांना जनावरांनाही मिळणाऱ्या सवलती मिळू देत नाही तोकसला धर्म ? या साऱ्या गोष्टीचा तौलनिक सारासार विचार करून हिंदूधर्म अस्पृश्यांचा अभ्युदय करू शकणार नाही या निष्कर्षापर्यंत डॉ. आंबेडकर आले.

त्यांनी हेही पाहिलं की हिंदू समाजसुधारक जातीमध्येच जन्मतात. आपल्या जातीमध्येच लग्न करतात आणि जाती भेदाचे उच्चाटन करा असे म्हणत म्हणत शेवटी जातीमध्येच मरतात. टिळकांसारखी व्यक्ती जीव तोडून स्वराज्यासाठी लढली.परंतुअस्पृश्यता पाळणार नाही व त्यासाठी झटेन हे मान्य करण्यासाठी मात्र विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जाहीरनाम्यावर सही करण्यास बिचकली. परदुःख शीतल म्हणतात तेच खरे ! माणुसकीचे साधे अधिकार मिळविण्यासाठी व समान दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी डॉक्टरांनी केलेली चळवळ शेवटी निष्फळ ठरली. या चळवळीत व्यतीत केलेले श्रम, काळ नी धन वाया गेले. सनातनी हिंदू समाज तसूभरही हलायला तयार नव्हता. अस्पृश्यांना तो हिंदू धर्मान्तर्गत समाज म्हणून मानायला तो तयार होता पण माणुसकीचे हक्क देण्यास किंवा बंधुभावाने व समानतेने वागविण्यास तयार नव्हता. या साऱ्या गोष्टींचा आंबेडकरांना उबग आला आणि जो धर्म समान दर्जा व समान हक्क देईल तो धर्म स्वीकारायचा असा विचार त्यांनी १९३५ साली मांडून दाखविला. एवढेच नव्हे तर मरताना मी हिंदू म्हणून मरणार नाही असाही संकल्प त्यांनी केला. धर्मांतर केल्यामुळे अस्पृश्यांना समानतेचे हक्क तर मिळतच होते पण त्यांची अस्पृश्यताही नष्ट होत होती. कारण जोपर्यंत एखादा माणूस हिंदू धर्माचा घटक म्हणून असेल तोपर्यंतच त्याला हिंदू धर्माच्या पापपुण्याचे-स्पर्शास्पर्शाचे नियम त्याला लागू होतात. हिंदुत्वाचा त्याग केल्यानंतर त्याला तो नियम लागू पडत नाही. ही बाब लक्षात घेऊनच त्यांनी धर्मांतराच्या विचाराला चालना दिली.

परंतु परधर्माचा स्वीकार करताना त्यांनी असेही उद्गार काढले की, जो धर्म या देशातील प्राचीन संस्कृतीला धोका देईल आणि अस्पृश्यांना अराष्ट्रीय बनवील असा धर्म मी कधीही स्वीकारणार नाही. कारण या देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून स्वतःच्या नावाची नोंद करून घेण्याची माझी इच्छा नाही. यावरून डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करताना सुद्धा किती विवेक राखला होता हेच स्पष्ट होते. केवळ हिंदूंवर सूड उगवायचा म्हणून त्यांनी आततायीपणा केला नाही. तसा सूड उगवायचा असता तर मुसलमान धर्म स्विकारून ते सूड उगवू शकले असते. कारण मुसलमान समाजासारख्या प्रबल व कडव्या समाजाचे त्यांना पाठबळ मिळाले असते. ख्रिस्ती धर्माचा विचार करतानाही त्यांच्या डोळ्यांसमोर ब्रिटिश साम्राज्य होते. आपल्या धर्मांतराने हिंदुस्थानवर त्यांची पकड आणखी वाढली असती हा विवेक डॉक्टरांना होता. या साऱ्या दृष्टीकोनातून हिंदु संस्कृतीला जवळ असणारा, हिंदू धर्माचेच एक अंग असलेला व बुद्धीप्रामाण्यावर अधिष्ठित असलेल्या बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला. आणि हा घ्या हिंदूंनो; तुमचा धर्म असे म्हणून त्यांनी हिंदूंच्या देवळांना नि हिंदुत्वाला अस्पृश्यांच्या जीवनातून कायमचे हद्दपार केले. अर्थात बौद्ध धर्माने हिंदुत्वाला हद्दपार केले असले तरी राष्ट्रीयत्वाला हद्दपार केले नाही कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. अशा प्रकारे डॉ.

आंबेडकरांनी अस्पृश्यांबरोबर भारताचेही हित केले असेच म्हटले पाहिजे.

अशा प्रकारे जो धर्म त्यांना माणूस म्हणून ओळखण्यास तयार नव्हता, जो त्यांना पाणी मिळू देत नव्हता, त्यांच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येत होता असा धर्म त्यांना धर्म नव्हता तर ती एक शिक्षा होती. हजारो वर्षांपासून परंपरागत चालत आलेल्या या शिक्षेचे साखळदंड शेवटी डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराने तोडले हे उचितच केले असेच म्हटले पाहिजे.

□

---

## अभिसार

रात्रपुष्पाचे सौंदर्य
मला काही खुणावत होते
निळ्या नभातली चंद्रकोर
मला काही सांगत होती
सौंदर्याचा गर्व
कळसाकडे धावला
प्रतिष्ठेचा अभिमान
नको तिथंच भेटला
रात्रसुगंधाच्या धुंदीने
सौंदर्याच्या गंधाने
चंद्रकिरणांच्या धारेने
प्रतिष्ठा घायाळली
आणि
नीति-अनीतीचे चक्रच
अंधाराने गिळले

**सुषमा नाटेकर**, तृ. व. वाणिज्य

## बहाणे

कसे जाणिवेचे करू मी बहाणे
मला जीवनाचे हजारो उखाणे
खरा कोवळा पूर, दाटे गळ्याशी
कसे वाळते रोज, ओठात गाणे ?
जरी बंड केले, कितीदा मनाशी
लढाईत वरती तहाची निशाणे
खुळे मौन शापीत आयुष्य सारे
तरी कोरले ओठ हसरे दिवाणे ?
उमेदी मनी घेत आकाश झेपा
जिणे मात्र प्रत्यक्ष लाजीरवाणे !
नभी स्वप्न अन् जीवने मातीवरती
कशी दूर होतील व्यस्त प्रमाणे ?
अनुत्तरित माझ्या अशा प्रश्नमाला
न स्वाधीन जगणे, न स्वाधीन मरणे
कसे जाणिवेचे करू मी बहाणे
मला जीवनाचे हजारो उखाणे !

**जो. पी. गायकवाड**, द्वि. व. कला

# उन्हं

**भगवान मांढरे ( वाईकर )**
तृतीय वर्ष वाणिज्य

कोंबड्यानं बांग दिला. गोठ्यागोठ्यातनं गुरा-म्हशींच्या घाट्यांचा आवाजही वाढू लागला. हा हां म्हणता तांबडं फुटू लागलं अन् निद्रिस्त गावगणा जागा होऊ लागला. बाया-माणसांची कुजबुजं वाढली. आडाच्या चाकाच्या कुरकुरईनं भूपाळी गायला सुरुवात केली. नाही म्हटलं तरि साहजिकच गणा पाटलाचा गणगोता उठून आप-आपल्या कामास्नी लागला होता. गणा पाटलाची 'म्हातारी' कोंबड्याच्या पहिल्या बांग बरुबर उठली, नाही म्हटलं तरी, शुकीर उगावला तवाच उटली.

'ए बबे! ऊठ की गं, अगं हा कारभारी आलाया दारात अन् तू तशीच गाढ झोपलीयास व्हय गं!' म्हातारीनं 'हल्या हो' करत आपल्या सुनंला दमदार आवाजात हाळी दिली. बबी उटली अन् अंगावरचा पोत्यारा सावरत धूमटोक मागलदारी पळाली. बिगी बिगी कमरंच्या डबीतल्या मिसरीचा तोबरा तोंडात कोंबला. कारभाऱ्यानं परड्यातल्या आडातनं आणलेली कावड माजवरातल्या रांजणात खाली केली अन् पुन्हा दुसऱ्या खेपंसाठी गुमान निघून गेला. आता चांगलीच सकाळ झाली व्हती. दिस चांगला कासराभर वर आला व्हता. बबीनं मागचं श्यान-पानी आवरलं अन् चुलीपुढं शिरली. रात्रीचाच निखारा शिलगावला. दोन लाकडं चुलीत कोंबली. अन् चहाचं आदाण ठेवलं. आता कुठं इसावा मिळालेल्या बनीनं देव-घराकडं नजार वळावली.

'कमी' बबीची एकुलती एक धाबारा वरसाची लेकं व्हती. देवबरातल्या कोपऱ्यात गुरमटून घोरत पडली व्हती. चागलं उजाडलं तरी अजून कशी उठली नाय म्हणूनशान बघाय आलेल्या बबीनं खासकन अंगावली वाकाळं बाजूला वढली.

'ये, कमे उठं! अगं काय वकुत बिकुत हाय का न्हायं. का खुशाल पसारलीयास; जरा चुलीपुढं बसलीसं तर झिज-शील व्हयं! उठली का न्हायं' कशी तरी 'कमी' कन्हतं, डोळं चोळतं उठून बाजूला बसली अन् डोक्स्यातल्यां केसातनं बॉटं फिरवू लागली.

'ये बबे, काय हायं तिथं तिच्याभवंती? का चुलीपुढं दम निगानां व्हयं? उगाचं कोकरू गुमान झॉपलयां त्याच्या नादी लागायं जायचं' वसरीला उनांत बसलेल्या म्हातारीनं खेकसायला सुरूवात केली.

'आत्यासांब, तुम्हास्नी न्हायं काय कामधंदा, उगाचं रामाच्या पारी वातींग लावू नगा. गुमानं बसा जरा' बबी आतनं गुरगुरली अन् आतनं भांड्यांचा आवाज येऊ लागला.

'पुन्हा आवाज काढ बरं तोंडाननं!' म्हातारीचा आवाज वाढला अन् ती उठून मागलदारच्या चुलीपुढं पाणी तापवाया निघून बी गेली.

एव्हाना कारभाऱ्याच्या पाण्याच्या कावडीच्या खेपा झाल्या व्हत्या. डबड्यातली राखुंडी घेऊन 'गणा' शेजा-रच्या तात्याबरुबर बारंगुळ्याच्या गप्पा मारत व्हता. घरातली भुणभुण कानी लागताच त्यो सरळ देवबरात आला. आथरुणाचा पसारा बघून 'व्हासकन्' बबीवर वराडला. तवर 'कमी' मागलदारी चोर पावलानं आजीच्या पुढ्यात कवाच निघून गेली. 'गणा' मागलदारी गरम पानी आणाया गेला.

'ए आये, लय लाडावलीस बग पॉरगीला तू! दुसरं काय न्हाय, पुढं तिलाच जाच व्हयाचा गं' समजुतीनं घेत 'गणा' म्हातारीला म्हणाला.

'ए गणा, अरं तू बी कशाला नादी लागतुयास? जवर मी हाय ना, तवर काय काळजी नाय बघ कमीची' म्हाता-रीनं आपलं न्हाट हात अंगावरनं फिरवलं अन् कमीचं

अंग शहारलं.

'बरं, पानी तापलया, आंगूळ करून घे.'

नकारार्थी मान हालवत गणा म्हटला, 'परवा तर केलीया, मी न्हाय आता करत. कंटाळा आलाया बग. मी आता चहा घेऊन रानात जातुया. कमीला न्याहारी घेऊन पाठव.'

'मी नाय येणार बा! मला साळत जायचंया, नायतर बाय मारल मला.' कमी रडवानी आवाजात म्हणाली.

'ऑ' गणा वराडल्याबरुबर कमी म्हातारीच्या बगलत दचकन कापऱ्या अंगानं लगाटली.

'ये गणा, तू आता लवकर जा बरं! मी आणल्ये न्याहारी, तुला काय करायचंय. सगळं करत्ये मी' असं म्हणत म्हातारीनं कमरच्या बटव्यातला खोबऱ्याचा तुकडा कमीला दिला.

'हां! अन् हिला शेरडी घेऊन मागनं पाठव खालच्या वावराकडं' गणानं कणगीवऱ्ला 'फड्या' खांद्यावं टाकला.

'व्हय, व्हय. येते मी' बबी भाकरी टाकता टाकता कडाडली.

'अग बबाय बायकांच्या जातीनं मागचं त्वांड घ्यावं' म्हातारीनं पोक्तपणा गाजवीत कोपरखळी मारली. थोड्याच यळानं म्हातारीनं राखनंची गुरं सोडली. 'कमी'ची यणी-फणी करून तिला साळत पाठवली. सयपाकातनं बाह्यार पडलेल्या बबीनं आवराआवर केली अन् शेरडी घेऊन रानात गेली.

दिवस कुठं गेला कायच समजलं नाय. दुपारच्या पोस्ट-मननं 'गणा पाटील' म्हणत दारात टपाल फेकलं. जागच्या जागी झालेली म्हातारी पटकन् खडबडून जागी झाली. डुईवर पदर घेऊन शेजारच्या बाळूला हाक मारली. अन् टपालातला मजकूर वाचून घेऊ लागली. टपाल पुण्यासनं धाकट्या पोरग्यानं 'रामानं' खुशालीचं पाठवलं होत.

पार उनं उतारली. वसरी लोटून म्हातारीनं भाताचं आदाण टाकलं. अन् जवळजवळ तिन्हीसांजची यळ झाली. कमीची पावलं पण वाजली. गुरं बांधायच्या धांदलीत असतानाच रानातनं बबी पण सताट पेंढ्याचं कचक्या वझं घेऊनशान आली.

'इतक्या का ग लवकर आली?' म्हातारीनं इचारलं.

'डोकस् दुखतया' उत्तर आलं.

'दुखायचंच. कमे, पाणी दे तुझ्या आयला. दमून आलीया' म्हातारीनं डोळ वटारीत म्हटलं. तवर गुमान बबी आत गेली. अन् सयपाकाला लागली ती पार जेवाण यळीलाच उठली. कमी पण बाह्यरनं खेळून आली. गणाच्या पण चपल्या दारातल्या पायरीवर वाजल्या.

इकडं तिकडं थोडा यळ निघून गेल्यावर गणा जेवायला बसला कमी पण गणापुढं जेवायला बसली.

'बा, आमटी जरा खाराट लागतीयासा' आचकळ इचकळ तोंड करत कमी आजीकडं बघत गणाला म्हणाली

'तरी मी म्हणत व्हतेच की वं, मीठ मी टाकलया म्हणूनशान.'

म्हातारीनं दोन्ही मुठी आवळल्या.

'अग न्हाय आय! अग कमी इनुदानं म्हणाली, 'अन् एकच हशा पिकला.

'ए बये काय झालं गं दात इचकाया' म्हातारीनं चुलीकडं बघितलं अन् बबीला तोंडात राख कोंबल्यागत वाटलं. तवर गणा पाटील जेवण आटपून उठला पण. थोड्याच यळात समध्यांची जेवणं आटापली

गणा कंदील अन् तांब्या घेऊन परड्यात निघून गेला. बबीनं भांडीकुंडी आवारली. म्हातारीनं देवघरातला दिवा बारीक केला अन् कमीच्या शेजारी कलांडली. दरवाजा लोटून बबीनं भांडी जिथल्या तिथं लावली. दोन फाटक्या वाकळा झटाकल्या अन चुलीच्या पायथ्याला कुशीवर आडवी झाली. वाड्यात सामसूम झाली. कुत्र्यांनी गोंगाट माज-वला. मांजरांची गुरगुर कुठंतरी सुरू झाली. मागल्दारच्या पेरूवर वटवाघळी ची ची करू लागल्या. मधीच टिटवी वरडून बी गेली. शिवारात कोल्ह्यांची कोल्हेकुई सुरू झाली. आसमंतात काळोख भिनत व्हता पण बबीच्या मनात मात्र भर दुपारचं ऊन रणरणत व्हतं. त्या चटक्यात बबीचा जीव तळमळत व्हता अन् ती एका कुशीवरनं दुसऱ्या कुशीवर व्हत होती

☐

# मराठी साहित्य आणि महानुभाव

**मिलिंद रामचंद्र पाटील**
अकरावी (शास्त्र)

महाराष्ट्रात चातुर्वर्ण्याविरुद्ध लढा देणाऱ्या साधू-संतांमध्ये आपण ज्ञानेश्वरांना पहिला मान देतो. परंतु त्याच्याही आधीपासून हा लढा चालू होता. त्याच्याकडे चौकसपणे पाहिल्यास आपणाला एक ठळक उदाहरण दिसते ते म्हणजे चक्रधर. ज्ञानेश्वरांच्याच तोलामोलाचा हा संत होता व वारकरी संप्रदायाइतकाच महत्त्वाचा महानुभाव हा पंथ चक्रधरांनी स्थापन केला.

चक्रधरांनी घर सोडले तरी संन्यास घेतला नव्हता. काही वर्षे त्यांनी भ्रमण केले. या काळाला एकांत काळ असे संबोधले जाते व नंतर त्यांनी संन्यास घेतला. चक्रधरांचा पहिला शिष्य निळभट परंतु त्याचा मृत्यू लवकरच झाल्याने ते पुन्हा एकटे भ्रमण करू लागले. तेव्हाची त्यांची दुसरी शिष्या बाईसा ही मात्र स्वामींच्या अंतकाळापर्यंत त्यांची सेवा करीत होती. स्वामींचा दुसरा शिष्य स्त्रीच होती. यावरून लक्षात येते की, स्वामी स्त्री व पुरुष यात अजिबात भेदभाव करीत नसत. तसेच ते उच्च-नीच असाही भेदभाव करीत नसत. महात्म्याचा मोठा गुण अहिंसा हा चक्रधराच्याही ठायी दिसतो. लीळाचरित्रात अशा पुष्कळ लीळा आहेत, ज्यावरून स्वामींचे भूमात्रावरील प्रेम दिसते. उदा.– एकदा एका कुत्र्याने थटोवासाची झोळी पळवली. दुसऱ्या दिवशीही ते कुत्रे परत आले हे पाहून आऊसाने त्याला दगड मारला. दगड लागल्याने ते कुत्रे केकाटले. लगेच स्वामींनी आपले डोके धरले जणू काही तो दगड त्यांनाच लागला. त्यांनी आऊसाला विचारले " हे सुने का हाणितले. " यावर आऊसा म्हणाली 'काल याने थटोबासाची झोळी पळवली. आज ते परत आले. म्हणून मी त्याला मारले ' स्वामी म्हणाले, 'याला काय कोणी मायबहीण आहे की ती याच्यासाठी रांधून ठेवेल आणि तेथे जाऊन हे जेवण करील ? नाही ना ? मग ते कुत्रे तुमचे अन्न नेण्यासाठी आले यात त्याचे काय चुकले ? अवश्य असल्यास तुम्ही आपल्या अन्नाचा नीट सांभाळ करा पण त्यासाठी या बिचाऱ्याला का मारता ? ' यावरून स्वामींच्या अंतःकरणाची प्रचीती येते.

वर उल्लेखिलेला लीळा चरित्र हा मराठीतील आद्य गद्य ग्रंथ होय. चक्रधराच्या जीवनात घडलेले सर्व प्रसंग या ग्रंथात संकलित केलेले आहेत. हा ग्रंथ संस्कृतमध्ये असावा असे काही शिष्यांचे म्हणणे होते. परंतु चक्रधरांच्या मराठीमध्येच बोलण्याच्या अट्टहासामुळे हा ग्रंथ मराठी या बोली भाषेतच लिहिला गेला. यावरून एक गोष्ट लक्षात येते की चक्रधरांवर त्यांच्या सर्व शिष्यांची अत्यंत श्रद्धा होती व त्यांच्या वचनाचे ते अगदी काटेकोरपणे पालन करीत कारण मराठीत बोलावे असे चक्रधर नेहमीच सांगत. मात्र लीळाचरित्र लिहिले गेले ते मात्र चक्रधरांच्या प्रयाणानंतरच्या पन्नास-पाऊणशे वर्षात आणि म्हादूभटाने लिहिले तो तर षटविद्यासंपन्न काहीसा गर्विष्ठ असा विद्वान पंडित होता. तरीही त्याने हा ग्रंथ मराठीतून लिहिला. यावरून त्याची स्वामींवरील निष्ठा दिसून येते. मात्र यामुळेच त्याने आज मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले आहे.

लीळा चरित्राची भाषा ही (त्या काळात) सामान्य जनांत बोलली जाणारी भाषा आहे. चक्रधरांच्या आयुष्यातील सर्व प्रसंग यात जसेच्या तसेच दिलेले आहेत. या ग्रंथात विराम चिन्हांचा पूर्ण अभाव दिसतो फक्त वाक्याच्या शेवटी दोन टिंबे (:) दिलेली आढळतात. वाक्यातील सर्व शब्द जोडूनच लिहिलेले आहेत. चक्रधर हे मूळचे महाराष्ट्रीयन नव्हते. ते गुजराथचे त्यामुळे त्यांच्या भाषेत अगदी किंचित गुजराथी, तामीळ व संस्कृत शब्द आलेले आहेत. तरीही घरगुती प्रादेशिक शब्द या

ग्रंथात विपुल आलेले आहेत. स्वामींची भाषा रसाळ व मधुर होती याची प्रचीती आपल्याला लीळाचरित्रावरून येते. लीळाचरित्रात काही सुंदर म्हणी, वाक्प्रचार आढळतात. उदा :– राज्य करणे, पान लागणे, पूजा बांधणे, पोटाची खाच जाळणे इत्यादी. एकूण या ग्रंथाला एक प्रकारचा सुबोधपणा प्राप्त झाला आहे.

चक्रधर आपल्या जीवनातील अनेक प्रसंग आपल्या शिष्यांना सांगत. एकदा महदाइसाने विचारल्याने स्वामींनी आपले आत्मचरित्र सांगितले. काही प्रसंग प्रत्यक्ष शिष्यांनी बघितले.-असे अनेक प्रसंग म्हादूंभटाने नागदेवाचार्य, बाइसा व इतर शिष्यांकडून गोळा केले व नागदेवाचार्यांच्य मार्गदर्शनाखाली त्यांचे संकलन केले. या ठिकाणी श्रीकृष्णाच्या गीतेची आठवण होते. कृष्ण-अर्जुन यांच्यामधील संवाद संजयाने ऐकला व तो धृतराष्ट्राला सांगितला. नंतर व्यासांनी सांगितला व गणपतीने लिहिलेला हा संवाद मात्र व्यास किंवा गणपतीच्या नावावर मोडत नाही. गीता लिहिली ती श्रीकृष्णानेच असे आपण म्हणतो, मात्र लीळाचरित्र हे काही चक्रधरस्वामींच्या नावावर मोडत नाही. ते म्हादूभटाच्याच नावावर टाकले जाते. म्हादूभटाने असेच आणखी ‘ ऋद्धिपूर लीळा ’ (गोविंदप्रभू चरित्र) व ‘ स्मृतिस्थळ ’ (नागदेवाचार्य चरित्र) हे ग्रंथ लिहिले. यावरून मराठी साहित्याची सुरवात चरित्र लेखनाने झाली असे म्हणायला हरकत नाही. या सर्व चरित्रात त्यांच्या जीवनातील सर्व प्रसंग कोणताही आडपडदा न ठेवता दिलेले आहेत. कोठेही चरित्रनायकास झुकते माप दिलेले दृष्टीस येत नाही, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य मानावयास हरकत नाही. एकून चरित्रनायकाच्या प्रसंगास धरून त्याचे कार्य व श्रेष्ठत्व यांचे दर्शन घडविण्याचा हा प्रयत्न दिसत आहे.

## चक्रधरांचे शिष्य—

चक्रधरांचे अनेक शिष्य असले तरी मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा काही शिष्यांचा हा अल्पसा परिचय खाली दिला आहे.

## म्हादूभट—

गणपती आपयो नावाच्या विद्वानाजवळ पाच शास्त्रांचा अभ्यास केल्यावर प्रभाकर नामक सहाव्या शास्त्राचा अभ्यास म्हादूभटाने तेलंगपाटील विद्यानगरीत केला. या विद्याभ्यासाने म्हादूभटास गर्व चढल्यास आश्चर्य ते कसले ? याच गर्वात तो चक्रधरांबरोबर वाद घालण्यास गेला. रस्त्यात त्याने अनेक युक्त्या प्रयुक्त्या रचल्या; मात्र प्रत्यक्षात मात्र तो स्वामींच्या आंतरप्रभावापुढे गोंधळला व त्याने स्वामींना अनुसरले. पुढे याने महानुभाव पंथात मानाचे स्थान मिळविले.

आतापर्यंतच्या उपलब्ध पुराव्यावरून म्हादूभट हा मराठीतील आद्य गद्य ग्रंथकार मानावयास हरकत नाही. हे चरित्र लिहताना मात्र त्याने कष्ट घेतले. ‘ खेइभट कृषी... करावेया जाति त्यासरीसे म्हादूभटही जाति : खेइभट कृषी कर्म करीति आणि म्हादूभट तयां मागां मागां गोसावीयाचीया लीळा पुसति : खेइभट सांगति ‘ त्या म्हादूभट नमस्कारुनि घेती. मग शिक्षा करूनि जेवीति : ’ यावरून म्हाइभटाची तळमळ व कष्ट दिसून येतात. म्हणून म्हादूभटाचा गौरव करावा तेवढा थोडाच. स्वामींची ही वाङ्मयमूर्ती निर्माण करून म्हादूभटाने मराठी साहित्यात आपले नाव अजरामर केले आहे. म्हादूभटाच्या काही पद्य रचनाही उपलब्ध आहेत. गद्यावस्थेच्या नावावर मोडल्या जाणाऱ्या धवळ्याचा उत्तरार्ध म्हादूभटानेच लिहला आहे. आणखी काही आरत्याही आहेत मात्र यात त्याचे उल्लेखनीय असे साहित्य दिसत नाही.

## नागदेवाचार्य—

नागदेवाचार्य हे पहिल्यांदा चक्रधरांचा द्वेष करीत परंतु स्वामींचे निरूपण ऐकून त्यांनी स्वामींना अनुसरले. पुढे तेच या पंथाचे सर्वात प्रमुख सूत्रधार झाले.

नागदेवाचार्यांनी लिहलेले मराठी किंवा इतर भाषेतील साहित्य आढळत नाही किंवा तसा उल्लेखही कोठे केलेला नाही. मात्र म्हादूभटाला लीळा चरित्र लिहण्यास नागदेवाचार्यांनीच प्रवृत्त केले. यातील उतरार्ध जवळजवळ नागदेवाचार्यांनीच म्हाद्भटाला सांगितला व त्यांनी लिहून घेतला. स्वामींचे तत्त्वज्ञान संस्कृतमध्ये ग्रथित करावे असे केशोबासाचे म्हणणे होते. त्यास मोडता घालून ते मराठीत योजण्याचे सर्व श्रेय नागदेवाचार्यांकडे जाते. मराठी भाषेचे महत्त्व यांनीच सर्व शिष्यांवर ठसवल्याने महानुभावांची ग्रंथरचना मराठीत होऊ लागली व मराठी गद्य साहित्य इतके समृद्ध होऊ शकले.

## महदाइसा—

मराठीतील आद्य कवी म्हणून मान मिळवणारी महदाइसा स्वामींची शिष्या होती. ती फार जिज्ञासू होती व स्वामींना वेळोवेळी प्रश्न विचारी. स्वामीही तिला नेहमी निरूपण करत. तिने रचलेले महत्त्वाचे काव्य म्हणजे ‘ धवळ्या. ’ मात्र याच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व मात्र म्हादूभटाकडे जाते. धवळ्याच्या पूर्वार्धाशिवाय तिच्या काही स्फुट ओव्याही

आहेत. स्वामींसाठी सोजी (रवा) कांडता कांडता तिनं काही ओव्या रचल्या आहेत.

गोमतीरा तीरीः निळेया गूढराः राजेया गुजराः कृष्णराया
नीळा गुढरूः राजा गुजरूः माणीकी मंडपीः श्रीचक्रधरू
गोमटें मांजीटेंः आरव कुंडीचेंः राजेया डौंडीचेंः चक्रधरा
गोरे अंग बाहीयाः डवरीया चंदनेंः श्रीचक्रधरा झणेंः
दीठी होरा

बापू म्हणे की भाइया, माझेया साजणी, गोत तो साजणीचाही यावो. शीघ्र काव्य रचून स्वामींचे आर्ततेने चिंतन करणे हे महदाइसेच्या स्वभावाचे विशेष होय.

चक्रधरांच्या संपूर्ण चरित्राकडे पाहिल्यास एक गोष्ट लक्षात येते की चक्रधरांनी आपल्या जीवनात कोणताही चमत्कार केलेला नाही. जे अपवाद आहेत ते अवतार स्वीकारायच्या वेळी व अवतार समाप्तीनंतर. चक्रधरांनी हरपाळ देवाच्या मृत शरीरात प्रवेश करून अवतार स्वीकार केला व शेवटी त्यांना शिक्षा झाली व त्यांचा शिरच्छेद झाला; राजाचे सैनिक निघून गेल्यावर त्यांचे शरीर पूर्ववत जुळले व ते हिमालयात निघून गेले असे म्हटले जाते. मात्र या दोन्ही प्रसंगांच्या बाबतीत महानुभाव पंथीयांच्यातही एकवाक्यता नाही. संन्यास घेतल्यावर व एकांतात चक्रधारांनी एकही चमत्कार केला नाही हे मात्र सर्वमान्य आहे. अर्थात चमत्कार नाही, तेथे नमस्कार कसला! म्हणून चक्रधर व त्यांचा पंथ यांची सगळीकडे निंदाच होत गेली व आजतागायत चालू आहे. या विरोधांच्या वादळात आपले ग्रंथ जपून ठेवणे महानुभावांना शक्य नव्हते. म्हणून त्यांनी हे ग्रंथ सांकेतिक लिपीत लिहिले. ती लिपी फुटल्याने दुसरीनंतर तिसरी असे करीत करीत वीस-पंचवीस लिप्यांमधून हे ग्रंथ लिहिले गेले. चक्रधरांच्या वेळेस व त्यांच्या नंतर ब्रह्मवृंदांचा विरोध. तोही इतका कडवा की त्यांनी चक्रधरांना शिरच्छेदाची शिक्षा ठोठावली. पुढे धर्मवेड्या मुस्लिमांची राजवट. या साऱ्या मोठमोठ्या विरोधकांच्या टकरीत महानुभावांनी त्यांचे ग्रंथ जतन केले, एवढेच नव्हे तर चक्रधराच्या आयुष्यातील सर्व बरे वाईट प्रसंग त्यात संग्रहित केले त्यामुळे महानुभाव पंथाचे कौतुक करावे तेवढे थोडेच. आज हे ग्रंथ अभ्यासकांना उपलब्ध आहेत. इतिहासाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व नसले तरी भाषेच्या दृष्टीने त्यांचे श्रेष्ठत्व सर्वांना कळले आहे व ते मान्यही आहे. परंतु महाराष्ट्राची ही अस्मिता प्राणापलीकडे जपणाऱ्या या पंथीयांची निंदानालस्ती आजतागायत चालू आहे ती मात्र थांबली पाहिजे.

**संदर्भ**—


१) श्री चक्रधर चरित्र – विष्णू भिकाजी कोलते.
२) श्री गोविंदप्रभू चरित्र – विष्णू भिकाजी कोलते.
३) श्री चक्रपाणी लीला चरित्र–श्री. प्रभाकर दादा गुर्जर महानुभाव.
४) चक्रधर – प्रभाकर वैद्य.


---

# अमुचे अम्हास जगणे

या जाणिवा कुणाच्या, आम्हास काय त्याचे
की प्रतिभा असे कुणाची, आम्हास काय ठावे ?
प्रज्ञा कशी कुणाची, आम्हास काय त्याचे
ते दुःख ज्यास त्याचे, आम्ही कशा रडावे ?
उपभोग ज्यास त्याचे, आम्ही नको बघाया
ते विश्व ज्यास त्याचे, त्याची तयास माया
हसणे जयास त्याचे, आम्हीही का हसावे ?
रुसणे जयास त्याचे, आम्हीच का पहावे ?
यांच्या कथा व्यथेच्या, का सांगती आम्हाला
अमुचे अम्हास जगणे, मग दोष का दुजाला ?

**बा. द. गोखले, तृ. वर्ष वाणिज्य**

# Private Enterprise with Public Blessings

**S. L. Mishra**
S. Y. B. Com.

A STUDY of 'The Economic Times Research Bureau' reveals that of the 41 new companies that entered the capital market in 1977–78, 26 belong to the joint sector with a total project cost of Rs. 217 crores accounting for about 90.6 per cent of the aggregate investment. Equity contribution of the state to this sector is Rs.1386 lakhs (24.3 per cent.) and of the private sector Rs. 1575 lakhs (27.6 per cent) with the rest coming from the public. But equity and preference form only 29.2 per cent. of the total project cost (Rs. 250 crores) in 1977-78 as compared to 34.7 per cent in 1970-71. It follows that the promoters have borrowed substantially from term lending institutions, insurance companies, and nationalised banks which have together contributed as much as Rs. 130 crores which is 52.1 per cent. of the aggregate project cost.

The concept of the joint sector has been evolved with the objective of harnessing the energies of the private and public sectors in a single industrial unit. After serious discussions, the industrial policy announcement in February 1973 clearly mentioned that wherever cooperation with private enterprise was necessary (under Schedule 'A' of the Industrial Policy Resolution of 1956) the state would ensure either through majority participation or otherwise, that it had the required powers to guide the policy and control the operations of the undertaking.

Indeed the concept of the joint sector is novel with its objective to bring about a co-operative, rather than a conflicting atmosphere in the industrial sphere. Moreover in recent years the joint sector has turned out to be a major 'promotional instrument' of the Government for encouraging new and medium entrepreneurs, setting up units in backward areas and preventing big houses from establishing a firm grip on the economy. The study shows that as many as 15 of the 41 new companies have been located in backward areas. Also, viewed in the background of MRTP constraints, licensing, etc, few large business houses have staged a comeback through the joint sector.

The crucial issue, however, relates to the management of the units and the composition of the board of directors. The study points out that the private sector has very effectively ensured its own interests by having adequate representation on the board so as to govern the policies and operations of the unit. There are also cases where the business houses have appointed their own sole selling agents for the supply of machinery, etc. These developments may well turn out to be the black spots in the joint sector and attempts should be made to see that these units, which are financed mainly from public funds, do not cater to the interests of a particular group.

In India, a sluggish capital market has

called for a great deal of state intervention. Instead of a genuine capital market, there has been a proliferation of financial agencies in the public sector. But it must be realised that rapid industrial development cannot be brought about by these agencies under the existing politico-economic framework in India. They can at best play a secondary role. Instead, there must be a majority contribution from the company promoters and self-financing by the industrial concerns.

A buoyant and vigorous capital market is a precondition for an improvement in the investment climate. Hence positive steps must be taken to revamp the capital market. But here the dilemma of the Indian economy has to be faced. It is well known that, by and large, our people derive their means of livelihood from the unorganised agrarian sector. The little funds they possess are diverted for the development of their respective occupations or consumed unproductively. Hence the onus for the growth of the capital market lies on the few who work in the organised sector. But here again, the incentive to invest in shares and debentures is restricted mainly to the upper income brackets and herein lies the dilemma.

The strategy of growth in India since independence has not been very conducive to the development of industrial capitalism, which, as history shows, is the basis of general economic uplift in many advanced nations of the West. We have adopted the technique of economic planning in a mixed economic framework. The basic philosophy of planning was state participation and intervention in sectors where the private entrepreneurs were unable to make much progress. As far as this idea was conceived with a view to promoting gunuine growth of entrepreneurship and private enterprise, it was perfectly justified. India, by now, would have achieved far higher rates of economic growth than at present if the basic objective of planning had been realised.

But over the five year plans, the role ot the state has gradually widened and the private sector has only played second fiddle. A protective home market together with a high restrictive industrial licensing policy has thwarted the growth of a group of entrepreneurs capable of undertaking ambitious industrial programmes. Large scale capital goods industries have developed only with State patronage. The private sector has in the process. diverted its attention to highly profitable consumer goods industries serving the relatively affluent sections of soeiety. But a nation's industrial base depends on the firm foundation of capital and wage--goods industries.

In a situation when a private enterprise on its own is unable to bear the burden of industrial development, the rationale of state intervention seems logical. But this intervention should be in such a manner that it encourages private investment and is in keeping with the objectives of the private sector.

Here again, it must be clarified that the state must intervene in sectors where private interests are unable to develop or are working against the interests of society. The Government through relaxing fiscal and monetary controls, import liberalisations and simplifying licensing procedures can encourage private enterprise. It must also see to it that the industry is assured of a market. In this connection, it must be mentioned that the Government would do well to stop the preemptive practices of the big houses and create genuine openings for the medium and small entrepreneurs. On the other hand, the private sector must also ensure that they manage their industries efficiently and not create more sick units. In this context, a change in the outlook of labour-management relations is also called for. The state must play its promotional role very efficiently and restore confidence in private enterprise. The private enterprise in turn must make this encouragement a launching pad for further industrialisation and not a forum for more public assistance

# India And The Sports World

**Sanjay Shridhar Bhise**
XII Science

If we take a retrospect we observe that in the last 4 to 5 years Indian sports have gone through many ups and downs,

If we try to draw a graph of India's achievements we find that in the years between 1971 to 1975 India had done well but after 1975 there is a downward trend.

To begin with, let us go back to our 1971 cricket tour of the West Indies and England under the captainship of Ajit Wadekar. We have toured West Indies often but this particular tour brought back our lost glory. India won the test match at Port of Spain, a historic win. In the final match in the first innings the West Indies were bundled out for score of about 225 or so. India then batted and gained a good first innings lead, thanks to an excellent ininngs of 71 by Sunil Gavaskar and a century by Dilip Sardesai; we finally won the match. India repeated the same history at the Lords when Abid Ali made the winning run.

After this tremendous sucess India again toured England but there they suffered a a terrible blow when they were defeated 3-0 by the British

After that India's achievements slackened as far as cricket is concerned. In 1974-75 India lost its series against the West Indies by 3-2 with Pataudi as captain.

India suffered similar blows against all countries except New Zealand and Shri Lanka. Recently India lost to Pakistan by 2matches to nil. Let us hope that under the captainship of Sunil Gavaskar India will regain its lost glory.

As far as badminton is concerned India totally failed in the Montreal Olympics and Bangkok Asian Games. At present India has only one player who will some day or other win gold medal for India at the Olympics if ample coaching is given to him and he is Prakash Padukone, who has won for India a Gold Medal at the Commonwealth Games.

India's total responsibility in tennis is shouldered by the Amritraj brothers—Vijay and Anand, Vijay being the senior of the two. But there are a very few instances where they have won their individual championships in Intennational Tennis. In the Davis Cup Eastern Zone Finals India always lost to Australia.

In football India has never progressed. In the 1975 Asian Games at Teheran India lost its very first match against Hong Kong by a large margin under the captainship of Shabbir Ali. The same performance was repeated at Bangkok when Kuwait defeated India by 6-1 in the league matches. India's captain then was Jogender Singh

India was at its climax in Hockey in 1975 when it won the World Cup Hockey Tournarnent at Kualalmapur defeating

Pakistan 2-1 in the finals.

In that match India scored the first goal when Surijit Singh converted a penalty corner. India increased the margin when Ashok Kumar scored a field goal after an excellent pass from Govinda. Pakistan reduced the lead when its captain Islauddin scored a field goal, They tried hard to get on equalizer but in vain.

The picture was completely reversed in the Montreal Olympics when India was thrown into the sixth position. The same fate followed in the world championship at Buenos Aires. India lost to West Germany by 6–0 aud was out of the league matches. They even failed to secure the 4th place when they were defeated 4–1 by Spain.

I was glad to know that at least India went into the Finals at Bangkok. They must look forward now to the Moscow Olympics. India has been world champion in only one game and that is billiards. Thanks to the endless efforts by Michael Periera.

In athletics India had improved rather well at Bangkok Asian Games when India won 11 gold medals, 80% for athletics and 20% for wrestling. Japan won 71 gold medals followed by China with 41 gold medals. India finished 5th by winning 11 gold, 11 silver and 7 bronze medals.

In chess the Khadilkar sisters will carry on their job of winning various individual championships and one day will take Indian chess to its peak.

Some additional measures are necessary for the coaching of our sportsmen. They are—

1) Excesive coaching at the 11th hour must be avoided.
2) Ample coaching must be given well in advance.
3) A psychological pressure must be created on the minds of the players so as to create a feeling of importance in them. Then and then only they can strive hard for the country.
4) All requirements must be made available.
5) Youngsters must be given chance and selection must be made totally on the basis of merit.
6) Unless all politics is removed there will be no real headway in the field of sports.

---

## वळण

वळणा वळणाच्या
या वाटेवरून जाताना
भीती वाटत असते अपघातांची
अन् अडथळ्यांची ॥
मागे वळून पहातांना
दिसतात फक्त हलणारे हात,
आसवणारे डोळे ॥
पण दुःख त्या निरोपाचं नसतं
किंवा तुटणाऱ्या ताऱ्यांचंही नसतं
ते असतं कल्पनेतल्या
वियोगाचं अन् विरहाचं ॥
मन हुरहुरत असतं
ते एकाच जाणिवेनं की
एक वळण संपलं आहे
दुसरं सुरू झालं आहे

**अनुराधा ठोके,** प्रथम वर्ष वाणिज्य

# आई

सुभाष गणपत सकपाळ
बारावी शास्त्र

सकाळी पाच वाजता घंटा झाली की 'नलू' बाई मला उठवत असत. नंतर सर्व मुले जागी होत. प्रत्येकजण अंघोळ वगैरे आटोपून शारीरिक शिक्षणासाठी उभे रहात. बाईंच्या मागून आम्ही सर्व मुले प्रतिज्ञा म्हणत असु, चहा वगैरे घेऊन सात वाजता शाळेत जाणे हा नित्यनियम. संध्याकाळी बागेत झाडांना पाणी घालणे, झोपाळ्यावर खेळणे वगैरे झाल्यावर घंटा झाली की जेवण करून झोपणे, पुन्हा सकाळी उठणे...

एप्रिल महिना आला. बाईंनी सांगितलं आता तुमची परीक्षा आहे. चांगला अभ्यास करा. परीक्षेचा हा पहिला अनुभव होता. थोड्या दिवसांनी सांगितले मुलांनो विद्याधर तुमच्या सर्वांमध्ये प्रथम आला आहे; सर्वात जास्त मार्क आहेत त्याला. बाईंनी माझी पाठ थोपटली. म्हणाल्या, आता तू इयत्ता दुसरीमध्ये गेलास बरं का? मला फार आनंद झाला. नंतरच्या सात-आठ दिवसात सर्व मुले आपआपल्या घरी गेली. मी बाईंना विचारले, 'बाई, दिपू, राजू, नानू त्यांच्या आईबरोबर घरी गेले. मग माझी आई का नाही आली मला घरी नेण्यासाठी?' बाई म्हणाल्या, 'अरे मीच तुझी आई आहे.'

त्या दिवसापासून मी बाईंना 'आई' म्हणू लागलो. आता त्यांच्या खोलीत जेवू व झोपू लागलो. महिना संपताच सर्व मुले परत आली. आम्ही सर्व आता दुसरीच्या वर्गात बसत होतो. सर्व विषय नलू बाईच शिकवत असत. अशीच वर्षामागून वर्षे गेली. मी बारावी इयत्ता पास झालो. आई म्हणाली 'विद्याधर, तुला हे गाव, आश्रम, मित्र सोडून आता दुसरीकडे शिक्षणासाठी गेले पाहिजे. आता तू मोठा झाला आहेस, शाळा सोडून आता उच्च शिक्षणासाठी कॉलेजमध्ये गेले पाहिजे.' मला फार आनंद झाला. कॉलेजमध्ये, उच्च शिक्षणासाठी वा...वा! परंतु मन दुःखी होतं. कारण आई, मित्र सर्वांना सोडून दूर वेगळे राहण्याची वेळ आली होती. आईने सांगितले औरंगाबाद येथे 'आंबेडकर कॉलेज' मध्ये तू प्रवेश घे कारण तेथील प्राचार्य भावे हे माझ्या परिचयाचे आहेत. माझी औरंगाबादला जाण्याची तयारी सुरू झाली.

जाण्याचा दिवस आला. सर्व मुले व आई मला सोडण्यासाठी एस. टी. स्टँडपर्यंत आली. आयुष्यामध्ये प्रथमच दुःखाचे अश्रू माझ्या डोळ्यातून वहात होते. आईचेही डोळे भरून आले होते. तिने मला मिठीत घेतले व गंगा-यमुना वाहू लागल्या. गाडी आली होती. आईच्या चरणी मस्तक ठेवले, मित्रांना भेटलो व गाडीमध्ये चढलो. गाडी सुटली. दिपू, राजू यांचे हात हलू लागले, गाडीने वळण घेतले व सर्व काही दिसेनासे झाले. आयुष्यातील पहिला, आणि सर्वात मोठा प्रवास करीत होतो. गाडीतून बाहेर पाहण्यास आनंद वाटत होता. सर्व काही नवे नवे दिसत होते. गाडी थांबली. औरंगाबाद आले. मी उतरून बाहेर आलो. प्रथम 'आंबेडकर कॉलेज'चा पत्ता काढला. प्राचार्य भावे यांची भेट घेतली. त्यांनी माझी विचारपूस केली, मार्क पाहिले. माझी पाठ थोपटली. म्हणाले, 'छान, तू आता मेडिकलला प्रवेश घे!' त्यांनी मला फॉर्म दिला व भरून देण्यास सांगितले. फॉर्म वाचला, वाचून सर्व काही कळत होते, पण समजत नव्हते. काय लिहावे कळेना, हातातील पेन तसेच राहिले. मी भावे यांना सांगितले की फॉर्म उद्या भरून देईन, त्यांनी मला तशी सवलत दिली व राहण्याची व्यवस्था केली. मी रात्रभर विचार करत होतो: ती पहिली ओळ, त्या फॉर्ममधील वडिलांचे पूर्ण नाव...मी आईला पत्र पाठविले परंतु कॉलेजची प्रवेश तारीख संपत आली होती. शेवटी मी फार्म भरला. 'वडिलांचे नाव—नलू सरस्वते. मला मेडिकलला प्रवेश मिळाला. आईलाही बातमी कळ-

विली. आईचे अभिनंदनाचे पत्र आले पण वडिलांचे नाव लिहिले नव्हते. मी पुन्हा पत्र पाठविले. तेव्हा आईने पत्रात लिहिले, आता तुला प्रवेश मिळाला आहे तेव्हा नावाची आवश्यकता नाही. मला फार राग आला, मी पत्र पाठविण्याचा कंटाळा करू लागलो. अभ्यास नियमित सुरू होता. असेच करता–करता तीन वर्षे गेली. मी एम्. बी. बी. एस् उत्तीर्ण झालो, शिवाय 'महारोग सर्जन' ही डिग्री घेऊन.

पदवी घेऊन मी आईकडे नंदनबागला, जुन्या मित्राकडे आश्रमात निघालो. मला पाहताच सर्व मित्र नाचू लागले, मी आईचे पाय धरले, नमस्कार केला. त्या दिवशी सर्व आश्रमात आनंदी-आनंद झाला. संध्याकाळी आईने सर्वांना गोड जेवण केले. मी डॉक्टर झालेला पाहून आईचा आनंद गगनात मावेनासा झाला. तिचे डोळे भरून आले, ते आनंद-अश्रू होते. तूर्त मला सरकारी डॉक्टर म्हणूनच काम करावे लागणार होते. माझी नेमणूक कोल्हापूर जिल्ह्यात एका हॉस्पिटलमध्ये झाली होती.

माझी कोल्हापूरला जाण्याची तारीख आली. सर्वांचा निरोप घेऊन मी कोल्हापूरला निघालो. दुसऱ्या दिवसापासून माझी सेवा सुरू झाली. हॉस्पिटलमधील सर्व रोग्यांची ओळख झाली. माझ्याकडे फक्त महारोगाचे पेशंट होते. माझा प्रयत्न रोग्यांना समाधानी, व्यवस्थित ठेवण्याचा असे. प्रत्येकाला वेळेवर औषध उपचार करणे, इंजेक्शन देणे सर्व नियमित असे. सर्व रोगी माझ्यावर खूष होते. मी वार्डमध्ये येताच सर्व नमस्कार करत. असेच दिवस जात होते. काही दिवसांनी माझ्या लक्षात आले की आपल्या पेशंटमध्ये एक वृद्ध जोडपे आहे, एक बाई व तिचा पति. ते फार वर्षापासून महारोगाने पीडित आहेत. अचानक एक दिवस त्या वृद्धेचे पती फार अत्यवस्थ झाले. त्यांना मी स्पेशल रुममध्ये ठेवले व योग्य उपाय चालू केला, दोन दिवस ऑक्सिजनवर ठेवले तेव्हा त्यांना थोडे बरे वाटले. आता तर ते दोघे वृद्ध माझ्यावर फार प्रेम करू लागले, त्यांचा माझ्यावर फार लळा बसला. मी त्यांची नेहमी विचारपूस करी. त्या वृद्धाला मी बाबा म्हणू लागलो, त्यांच्याबरोबर गप्पा वगैरे होत असत. पुन्हा एक दिवस ते फार आजारी नेहमी झाले. मी केलेल्या सर्व सेवेवर, प्रयत्नांवर, पाणी पडले. त्यांचा अंत झाला. त्यांच्याकरता फार कष्ट केले; ते मला 'बाळ' म्हणत पण सर्व व्यर्थ झाले. त्याच्या पत्नीला ही आता आधार राहिला नाही. त्या वृद्धेची मी फार काळजी घेवू लागलो. ती म्हणे, 'बाळ, आता कशाला जगवतोस, माझेही जीवन आता संपत आले आहे.' मी त्यांना म्हणे..

'नाही, तुम्ही माझ्या आईसारख्या आहात. असे म्हणू नका.'

'नाही. बाळ या दुनियेत कोणी कोणाचे नाही.'

'आई तुम्हाला मुलगा, नातेवाईक नाहीत का?'

'बाळ, मला एक मुलगा आहे. पण ...!'

'तुम्हाला मुलगा आहे? कोठे आहे? काय करतो?

'बाळ मला मुलगा झाला आणि आम्ही पापी त्याचे आई-वडील, महारोगाने पछाडलो, कोणत्या जन्मी केलेल्या पापाचे फळ मिळाले कोण जाणे. आम्हाला डॉक्टरांनी सांगितले त्या मुलाला तुमच्यापासून दूर ठेवा. नाहीतर रोगाचा परिणाम मुलावर होईल.'

'मग तुम्ही त्या मुलाला कोठे ठेवलं?

'डॉक्टरांच्या सांगण्यावरून मुलाला काही बाधा होऊ नये म्हणून आम्ही त्याला एका आश्रमात ठेवले. त्यानंतर आम्ही दोघेजण ह्या हॉस्पिटलमध्ये दाखल झालो ते आता-पर्यंत सुटलो नाही. ज्या दिवशी त्याला आश्रमात ठेवले त्या दिवसापासून माझ्या तान्ह्यांचे दर्शन देखील घडले नाही.'

'त्याला कोणत्या आश्रमात ठेवला आहे, त्याचे नाव काय?'

'नंदनबाग येथे नलूबाईंच्या आश्रमात त्याला ठेवले होते. त्याचे नाव विद्याधर आहे.'

'नंदनबाग येथे, नलूबाईकडे? पण तेथे विद्याधर नावाचा माझ्याशिवाय कोणी नाही. नलूबाई माझ्या आई आहेत.'

'काय? नलूबाई तुमच्या आई आहेत. दैव माझ्या-बरोबर आहे तर...काय तेथे विद्याधर कोणी नाही? माझा विद्याधर कोठे गेला : कसा गेला? बाईने जाऊ कसे दिले?

'थांबा तुम्ही, मी शनिवारी नंदनबागला जाणार आहे तेव्हा सर्व पत्ता काढून येईन बर का? आता हे औषध घ्या व आराम करा हं.'

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांची तब्येत फार चिंताजनक झाली. त्यांना ग्लूकोज वगैरे लावला, आता त्यांचा काळ केव्हा येईल ते सांगता येत नव्हतं. मला त्यांच्या मुलाचा शोध लावायचा होता. योग्य इलाज करून त्यांची केस दुसऱ्या डॉक्टरकडे सोपविली व उद्या येतो तोपर्यंत योग्य दक्षता घ्या असे सांगितले.

दुपारची गाडी धरली, घरी आलो. आई व सर्व मित्र फार आनंदी झाले. मी आईला सांगितले. 'आई मला सकाळी परत जायचे आहे.'

'का? आलास आणि ताबडतोब जाणार?'

'हो, कारण माझा एक पेशंट फार आजारी आहे.'

‘ मग तू ते सोडून आलास कसा ? ’

‘ आई मला एक गोष्ट विचारायची आहे म्हणुन एका रात्रीकरीता आलो आहे. ’

‘ कोणती गोष्ट ? ’

‘ आपल्या आश्रमात कोणी विद्याधर नावाचा मुलगा होता का ? त्याची आई कमळाबाई व वडिल वासुदेव गडकर. त्यांनी त्या मुलाला लहान असताना येथे ठेवले होते.’ आईची मनस्थिती बेचैन झाली. तिचे हात-पाय कापू लागले.

‘ हो का ग आई ? कोणी होता का विद्याधर नावाचा मुलगा ? ’

आईची जीभ वळली, तिने अडखळत विचारले ‘ पण काय काम आहे ? ’

‘ माझ्याजवळ दोन पेशंट आहेत. दोघेही वृद्ध आहेत. कमळाबाई व वासुदेव गडकर. दोघेही महारोगाने आजारी आहेत. त्यातील वासुदेवांचा परवा अंत झाला. ’

‘ काय ? ’

‘ हो, अंत झाला. मी फार प्रयत्न केला पण सर्व व्यर्थ गेला. ’

आईला चक्कर आली. मला काय चालले आहे ते कळेना. मी पाणी पाजले. तिला उचलून पलंगावर ठेवले. थोड्या वेळाने तिला शुद्धी आली.

‘ विद्याधर मला माफ कर, मला माफ कर. आतापर्यंत तुझ्यापासून मी सर्व लपविलं. परंतु आता सर्व सांगण्याची वेळ आली आहे. तू कॉलेजमध्ये असताना विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आली आहे.

‘ तू लहान असताना मला ज्या नावाने हाक मारत होतास तेच नातं खरं आहे. तुझी मी आई नाही. बाई आहे, गुरू आहे, शिक्षिका आहे. ’

‘ आई हे काय बोलतेस तू ? ’

‘ हो विद्याधर, हे खरं आहे. ज्यांचा अंत झाला ते तुझे वडील होते. ते रोगाने पछाडले होते, म्हणून त्यांनी तुला येथे ठेवले. ते मिलिटरीमध्ये सर्व्हिसला होते. त्यांना दर-महा मिळणारी पेन्शन ते तुझ्या खर्चासाठी माझ्याकडे पाठवीत. आणि कमळाबाई ही आहे, आई आहे.

आईला मी प्रथमच दुःखी अवस्थेत पहात होतो. तिच्या डोळ्यातून नदी वहात होती. माझ्या मनाची अश्रूंची स्थिती वादळात सापडल्याप्रमाणे झाली होती, कोणत्या मार्गाने बाहेर पडावे ते सुचत नव्हते.

‘ विद्याधर कसला आता विचार करतोस ? आई कोल्हा-पूरला अत्यवस्थ आहे ना ? चल ऊठ जाण्याची तयारी कर. ’

‘ आई तूही कोल्हापूरला आलं पाहिजे. ’

रात्रीची गाडी धरली, आम्ही सकाळी कोल्हापूरला उतरलो. रिक्षा करून हॉस्पिटलमध्ये गेलो. पण...आशेची निराशा झाली. आई सर्वांना सोडून गेली होती.

‘ विद्याधर...’

‘ आ...ई ’

‘ विद्याधर तुझे नाव आता ‘ विद्याधर वासुदेव गडकर आहे. ’

‘ आई तू मला छोट्या रोपापासून मोठं केलस. ह्या वृक्षाच्या सावलीत तू आता माझी आई आहेस असेच समजून सुखाने रहा हीच माझी इच्छा.

□

---

एक क्षण आठवावा
दुसरा त्यात मिळवावा
तिसरा क्षण जुळवावा
चौथ्याच्या भविष्यासाठी

**सुनील दाढे**
बारावी वाणिज्य

# हिमालयाची सावली

**अंजली जोगळेकर**
द्वितीय वर्ष कला

हिमालयाची सांवली ही श्री. वसंत कानेटकरांची नाट्य-कृती. पंडिता रमाबाईंच्या जीवनचरित्राचा अभ्यास करीत असताना त्यांना ह्या नाटकाची कल्पना सुचली. अनंत आपत्ती सहन करीत २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात अनाथ महिलाश्रमाचा प्रपंच नेटाने चालविणारे प्रो. भानू हे ह्या नाटकाचे नायक.

हे नाटक स्वतंत्र आहे की चरित्रात्मक असा प्रश्न आपल्या मनात आपोआपच निर्माण होतो. ही कलाकृती स्वतंत्र म्हणावी तर ह्या नाटकातील प्रमुख व्यक्तिचित्रणे प्रो. कर्व्यांच्या चरित्रावरून घेतलेली आढळतात. तसेच नाटकातील काही प्रसंगांशी त्यांच्या जीवनातील काही प्रसंग समान्तर जातात हे प्रो. कर्व्यांच्या चरित्रावरून आपल्या लक्षात येते. जर हे नाटक चरित्रात्मक आहे म्हणावे तर चरित्रात नसलेले काही प्रसंग नाटकात येतात. उदा. तिसऱ्या अंकात प्रो. भानूंना येणारा पॅरॅलिसिसचा अॅटॅक. मग ह्या नाटकातील नावे कानेटकरांनी का बदलली?

असे वाटते की, कानेटकरांना कर्व्यांच्या जीवनावरील शोकान्तिका दाखवायची होती. त्यांनी जर हे कथानक कर्व्यांच्या जीवनावरून जसंच्या तसं घेतलं असतं तर ही शोकान्तिका होऊ शकली नसती. हे चरित्रात्मक नाटक झाले असते. ह्या नाटकात त्यांना नायक निराश, वैफल्यग्रस्त दाखवायचा होता परंतु कर्व्यांचं जीवन मात्र साफल्याचं, कृतार्थतेचं होतं. या शिवाय प्रो. कर्व्यांना समाजात तसं फार मोठं मानाचं स्थान आहे. असा माणूस जर क्षुल्लक कारणावरून म्हणजेच आपल्याला दैनंदिन कारभारातून वगळून अध्यक्ष-पदावर ठेवलं या कारणावरून अपमानित होत असेल तर त्या पदाला, त्या मानाला काहीही स्थान राहिलं नसतं. किंबहुना हे समाजाला रुचलं नसतं म्हणूनच कानेटकरांनी ह्या नाटकातील नावे व काही मूळ प्रसंग बदलले असले पाहिजेत.

असे असले तरी सुद्धा त्यांनी आपल्या नायकाला दिलेले नाव किंवा त्यांच्या बायकोमुलांना दिलेली नावे ही मूळची नावे सूचित करतातच. प्रा. कर्व्यांचे मूळ नाव धोंडो केशव कर्वे. या नाटकातील नायकाचे नाव प्रो. गुंडो गोविंद भानू. तसेच त्यांच्या पत्नीला बाया असे म्हणत, त्यावरुन लेखकाने बयो असे केले. तसेच कर्व्यांच्या पहिल्या बायकोचा मुलगा रघुनाथ हा ह्या नाटकात जगन्नाथ या नावाने वावरतो. याशिवाय १) कर्व्यांनी आनंदीबाईशी पुनर्विवाह केला होता. २) पं. रमाबाईंच्या सांगण्यावरून त्यांनी आनंदीबाईंच्या नावे ३००० रु. चा विमा उतरविला होता. ३) कर्वे आपल्या मुलांना वयाच्या विसाव्या वर्षापर्यंतच शिक्षण देणार होते. ४) मुलांना परदेशी जाण्यासाठी कर्व्यांनी पैसे कर्जाऊ दिले होते असे काही प्रसंग, तसेच १) 'दोन कर्वे एकत्र आले की काही तरी पैशांचा हिशेब असायचाच.' २) 'मी घरात पाहायला होते म्हणूनच तुम्ही एवढे मोठे झालात.' ४) 'हो ग बाई हो- तू हयांची सून झालीस बायको झाली असतीस म्हणजे कळलं असतं' अशा प्रकारची काही वाक्ये, असे साम्य या नाटकात आणि चरित्रात पाहायला मिळते.

या नाटकातील व्यक्तिचित्रण करताना मूळच्या व्यक्तींच्या स्वभावातील कित्येक महत्वाच्या छटा, त्यांच्या जीवनातील प्रसंग आणि त्यांच्या आयुष्यातील धारणा हे सर्व जसेच्या तसे घेतले आहे. व्यक्तिरेखा, कथावस्तू व घटना सर्वस्वी नसल्या तरी प्राधान्याने काही विशिष्ट व्यक्तींच्या म्हणजे कर्वे व त्यांच्या कुटुंबियांशी निगडीत आहेत. १९ वे शतक २० व्या शतकाशी जिथे भिडले आहे त्या संधीकाळातील काही जबरदस्त माणसे, त्यांच्या जीवनप्रेरणा आणि त्यांच्या काळाने त्यांच्यापुढे टाकलेली आव्हाने यांचे चित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे. मूळची माणसे घेतली

तर कल्पिताला, रचनाकौशल्याला, आणि संस्कार सामर्थ्याला मर्यादा पडतात.

नियतीचा खेळ मोठा चमत्कारिक असतो. आकाशाला गवसणी घालू पाहणाऱ्या या उत्तुंग विजिगीषु जीवनाच्या अवतीभवती सामान्य माणसांचा घोळका सावली शोधत उभा असतो पण सावली त्यांना मिळतच नाही. वाट्याला येतो तो अंधार! फक्त अंधार!

शोकान्तिकेमध्ये नायक उदात्त असतो. त्याच्यावर नियती टपून बसलेली असते. येथे नायक विरुद्ध नियती यांचा संघर्ष सुरू होतो. भानूंचं व्यक्तिमत्त्व उदात्त होतं. ते ध्येयवादी होते. एवढी मोठी रक्कम आश्रमासाठी जमविताना त्यांनी कोणालाही संकटात पाडलें नाही. जे काही थोडेसे मिळाले त्याचा त्यांनी आनंदाने स्वीकार केला. स्त्रियांना नुसतंच शिक्षण देण्याचं कार्य त्यांनी केलं नाही तर स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यासाठी महिला विद्यापीठाची स्थापना केली. समाजाचं मानसिक स्थित्यंतर घडलं पाहिजे असं त्यांना वाटलं. म्हणून त्यांनी समाजाशी एकाकीपणाने सामना दिला.

परंतु हे सर्व करीत असताना त्यांनी आपलं सामाजिक आणि कौटुंबिक जीवन यांची सरमिसळ होऊ दिली नाही. त्यांनी आपल्या पत्नीला धाक घातला की 'ते ३००० रु. दे, दिले नाहीस तर मी माझी जाहीर छी थू करायला लावीन.' असा हा 'आपल्या' कार्याबद्दल अविचल निष्ठा बाळगणारा माणूस अत्यंत उदात्ततेच्या पातळीवर जाऊन पोहोचतो.

नाटकाच्या पहिल्या अंकात तातोबाला 'संस्था माणसांसाठी असतात. माणूस संस्थेसाठी नसतो.' असे निक्षून सांगणारे भानू आपल्यावर तीव्र वेळ आल्यावर हे तत्त्व आचरणात आणू शकत नाहीत. उत्तुंग अशी शक्ती असलेला हा माणूस शेवटी माणूसच असतो. मानवीपणा हाच त्याच्यातील प्रमाद. त्याच्यातील माणूस जागा झाल्यावर त्याचं अधःपतन होतं. त्यामुळे सगळ्या मिळवलेल्या यशावर पाणी पडतं. त्यांचा स्वतःशी आंतरिक संघर्ष चालू असतो. संस्था विकायची नाही असं त्यांचं म्हणणं असतं पण इतर माणसं त्यांना अधिकारपदावरुन दूर करतात. नियती त्यांच्यावर विजय मिळविते. कारण त्यांच्यातील माणूस जागा होतो. सामान्य माणसाचा दुबळेपणा दिसू लागतो. ते भव्य दिव्य रूप लोप पावते. हे ते सहन करू शकत नाहीत. त्यांना पॅरॅलिसिसचा ॲटॅक येतो.

म्हणजेच हिमालयासारखा उत्तुंग पर्वत सुद्धा कोसळतो. हिमालयाची शिखरे ही उत्तुंगच असतात. त्यांच्या सान्निध्यात येणारी माणसे सुद्धा त्यांच्यासारखीच कणखर उत्तुंग बनतात. त्यांची बायकोमुलं सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशीच आहेत. हिमालयाची आकाशाशी स्पर्धा करण्याचं सामर्थ्य ही कल्पना नाहीशी होणे. उत्तुंग व्यक्तिमत्त्व सुद्धा दुबळं कसं बनतं याचं हे एक मूर्तिमंत उदाहरण आपल्यासमोर आहे.

हिमालयाचं कोसळणं हे हिमालयासारखं भव्य असावं लागतं, आणि तसं झालं तर भय आणि अनुकंपा यांनी आपण या थरारून उठतो. परंतु कानिटकरांनी 'हिमालय' दाखविला असला तरी त्याचं कोसळणं हिमालयासारखे नसल्याने मोठ्या, श्रेष्ठ ट्रॅजेडीचा जो परिणाम व्हायला हवा, तसा होत नाही; हे या नाट्यकृतीचे सर्वांत मोठे अपयश आहे.

नैतिक सामर्थ्य असलेल्या व्यक्तिमत्त्वाचं आपल्याला सतत भय वाटत राहातं. हा माणूस आपल्यातील नाही असं वाटायला लागतं– पहिल्या अंकात पुरुषोत्तम जगन्नाथला म्हणतो की 'चला जगूदादा, आपली माणसं आंतमध्ये आहेत.' तसेच नियती अशा माणसाचे काय करेल असं वाटू लागतं. परंतु असं भय भानूंच्याबद्दल नाटककाराने घडू दिले नाही. त्यामुळे इष्ट तो परिणाम होत नाही.

म्हणूनच नेहमीच्या शोकान्तिकेच्या संकल्पनेत बसणारा हा नायक नाही. शोकान्तिकेचे आणि नायकाचे सुद्धा भव्य दिव्य रूप कणखरपणा उदात्तता वगैरे सर्व नाहीसे होते. त्याला किरकोळ रूप येते. यामध्ये अवमानाचं, वैफल्याचं शल्य दाखविलं जातं. हा एकप्रकारे नायकाच्या सामाजिक जीवनाचा मृत्यूच म्हणावा लागेल. तसेच शोकान्तिकेची कारणे व शेवट अत्यंत पोकळ वाटतो. त्याचा डोलारा कोसळून पडतो. नायकाचा दुबळेपणा दाखविला गेल्यामुळे शोकान्तिकेची तीव्रता कमी होते.

हिमालयाला सुद्धा सावली असते. आणि या सावलीत विसावण्यापेक्षा होरपळणारी माणसे दाखविणे हा शोकान्तिकेचा महत्त्वाचा भाग असावा लागतो. कानिटकरांनी या सावलीत होरपळलेली व तरीही त्याच्या दाहकतेपासून विमुक्त झालेली माणसे दाखवून त्याच्या परिणाम शबल करून टाकला आहे. त्यामुळे प्रो. भानू यांचे व्यक्तिमत्त्वातील न दिसणाऱ्या शिखराच्या पराभवाच्या जाणिवेने रसिकमन व्यथित होते.

या नाटकाने ते शिखर गाठले असते तर ही एक श्रेष्ठ शोकांतिका झाली असती. वि. स. खांडेकरांना त्याची जाणीव होती म्हणूनच त्यांनी नाटककाराला उद्देशून म्हटले आहे,

'चरित्रात्मक नाटक किंवा कादंबरी लिहिणे ही एक प्रकारची कसरत आहे. मूळची माणसे घेतली तर कल्पिताला, रचनाकौशल्याला आणि संस्कारसामर्थ्याला मर्यादा पडतात. तुम्ही नावे, माणसांची नाती, व्यवसाय इत्यादी गोष्टी बदलल्या आहेत. तरी तेवढ्याने फार मोठा बदल घडून येत नाही. मूळच्या माणसांच्या संबंधितांच्या हळव्या भावनांना अकारण जपावे लागते. अशा वेळी त्या चरित्रापासून आपल्याला आशयसंपन्न विषय मिळत असेल त्याचा आत्मा तेवढा कायम ठेवून बाकीच्या द्वारे मूळ चरित्रापासून दूर नेणे अधिक हितकारक होणार नाही काय?'

खांडेकरांचे हे म्हणणे मोठे बोलके आहे.

□

---

## देऊळ

गुरव घंटा बडवतो, आरती गातो
माणसाचा श्रद्धाळू कळप भोवती जमवतो
गुरव जगाची निर्मिती सांगतो
कोपऱ्यावरचा शेतकरी आसवांची
शेती पिकवितो
खपाटी गेलेल्या पोटी वेदना दाबून
नियमित एकादशी करतो
नि पाहतो भकास डोळ्यांनी
उध्वस्त घरकुले नि चुरगाळलेली रानफुले
गुरव भजन म्हणतो कोरस सुरू होतो
ट्रस्टी पैशाची अफरातफर करतो
ट्रस्टी घरदार, जमीनजुमला खरीदतो
गुरव देवावर पाण्याचा अभिषेक करतो
घोटभर पाण्यासाठी माणूस खून पाडतो
गुरव आवाजाची चौकट बुलंद करतो
कुणा निष्पाप मजूंचा करून हंबरडा
देवळाच्या घंटेत तुटत जातो
माणूस भैरा होतो
देव गुदमरून जातो
नि देवळाला सुरुंग लावण्याची स्वप्ने पाहतो
मुलगा भजन ऐकतो देवळाचा पायथा कोरतो
बांगड्यांचा खच नि रक्तांचे टिळे
देवळाच्या कळसाला भिडतात
मुलगा उत्खनन करतो
मोहोंजदडो व हडप्पा समूळ उपसतो
गुरव घंटा बडवतो
गुरव आरती गातो
माणसाचा श्रद्धाळू कळप भोवती जमतो.

**आ. दा. साळवे, १२ वी वाणिज्य**

# आमच्या शेजारी जेव्हा टी. व्ही. येतो

संजय भिसे
१२ वी शास्त्र

त्या ऐतिहासिक घटनेला (माझ्या दृष्टीने तरी!) नक्की किती वर्षे झाली ते काही मला आता नीट आठवत नाही. हो कशी आठवणार? कारण माझी मेमरी आहे अत्यंत कच्ची-अरे पण हो! एक गोष्ट मला कबूल केलीच पाहिजे आणि ती म्हणजे सायन्स साईडला गेल्यापासून माझी मेमरी बरीच सुधारली आहे. अहो सुधारणार नाही तर काय होणार, तिथे दुसरा इलाजच नसतो. केमिस्ट्रीतल्या त्या रिॲक्शन्स पाठ नाही केल्या तर पदरात भोपळ्या-शिवाय दुसरे काही पडतच नाही. (अंडे चालले असते हो! पण भोपळा म्हणजे फारच झालं) पूर्वी माझी मेमरी एवढी वीक होती की विचारूच नका. मला पिक्चर दाखवण्याच्या फंदात कोणी पडायचेच नाही. अहो त्यांचे पैसे फुकट जायचे. कारण सिनेमा पाहून बाहेर आल्यावर त्या सिनेमाबद्दल विचारले तर काही आठवायचे नाही. तेव्हा सिनेमा पाहण्याची वेळ आली तर मला बापड्याला ते टी.व्ही वरचा दाखवायचे. बरं असतं आपलं पैसेही पडत नाहीत व तिकीट मिळतंय का नाही याची धास्ती नसते.

अरे हो, टी.व्ही.वरून आटवलं, की जी घटना मी तुम्हाला सांगणार आहे तिचा जवळ-जवळ सगळाच संबंध टी. व्ही.शी येतो. आमच्या बळवंतरावांच्या वाड्यातील सर्व मंडळी अत्यंत चौकस होती, दिल्लीत काय चाललंय इथपासून ते शेजाऱ्यांच्या घरात कसला खमंग वास येत असावा इथपर्यंत त्यांना खडान्खडा माहिती होती. त्यातून म्हाळसाकाकू महिला मंडळाच्या अध्यक्षा असल्यामुळे त्यांना असलेली माहिती इतरांपेक्षा निश्चित वेगळी होती. त्यांना सगळ्यांची 'अंदरकी बात' माहीत असे. इतरांना जी माहिती होती ती अशीच इकडून तिकडून गोळा केलेली. अर्थात त्यातली बरीचशी खरीसुद्धा असू शकते बर का? हं! तर त्या दिवशी आम्ही सगळे (घरातील मंडळी) आतल्या खोलीत एका खमंग विषयावर चर्चा करीत होतो. मी दुहेरी भूमिका बजावत होतो. चर्चेत भाग घेत होतोच, वर दारात उभा राहून रखवालदाराची भूमिका पण बजावत होतो. कोणी येण्याची चाहूल लागली की, मी लगेच एक विशिष्ट खूण करायचो. चर्चा एकदम बंद. सगळे जण सोज्वळ पणाचा आव आणून हसरे चेहरे करायचे. ती व्यक्ती गेली की पुन्हा चर्चा सुरू. हं! तर अशीच चर्चा रंगात आली असताना घराजवळ रिक्षा थांबल्याचा आवाज झाला. सगळेजण धावतच बाहेर आलो. रिक्षा शेजारच्या जोशी काकूंच्या घराजवळ थांबली होती. आम्ही दार लावून घेतले व फटीतून पहायला सुरवात केली. मला जागा न मिळाल्यामुळे मी पलंगावर स्टूल ठेवून व्हेंटी-लेटरमधून पाहायला लागलो. पाच मिनिटानंतर बाळ्या' आईला म्हणाला, 'आई ग काय असेल ग ह्या खोक्यात आई म्हणाली, 'म्हणजे तू पण पाहिले नाही का? कपाळ माझं! अरे ती कार्टी मला अशी धक्के देत होती की, मला काही दिसलंच नाही. काय तरी आणलं नक्की. मी वरून आरोळी ठोकली, अरे बाळ्याऽऽ, अरे टी.व्ही. आणला रे टी. व्ही! तो पर्यंत माझ्याकडे कुणाचेच लक्ष गेले नव्हते. 'वा चक्या पोझीशन मात्र छान घेतली होतीस. पण नक्की पाहिलेनारे? अरे शंभर टक्के पाहिले' मी म्हणालो आई व अरुणा माझ्याकडे आ वासून पहातच होते.' अरे, उद्या पाहूच की आपण. एरिएल दिसेलच न वर,' मी म्हणालो व विषय तेथे संपवला.

त्या दिवशी रात्री मला नीट झोपच आली नाही. माझ्या स्वप्नात जोशी काकांचा टी.व्ही. दिसत होता. च्यायला घेतला काय त्यानं टी. व्ही. शेवटी? तरी मला शंका आलीच. काय आखडत होता सुनिल काल माझ्याशी बोलताना? मी बाळ्याकडे पाहिले त्याचेही डोळे सताड

उघडे. मी म्हणालो, "बाळ्या लेका झोप आता, आपण आपल्या रेडिओलाच टी. व्ही. समजूया.' बाळ्या वर मोठ्यांदा हसला, त्यावर आई आतून गरजली, 'का रे कार्ट्यांनो अजून जागेच का तुम्ही, झोपा पाहू लवकर.' झालं म्हणजे आईसुद्धा जागी होती. नाही तर रात्री आई जागी सापडणे अत्यंत दुर्मिळ. ती रात्री अशी काय घोरायची की, एखाद्या लहान मुलाला भिती दाखवायचे म्हणजे त्याला तिच्याजवळ नुसते आणून ठेवायचे बस रडण्याचे नाव आयुष्यात कधी ते मूलकाढणार नाही.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे म्हाळसाकाकू आमच्याकडे आल्या 'काय वहिनी, तुम्हाला आता बरं झालं नाही.' त्या म्हणाल्या. 'आहे, पण झालं काय ?' 'आई म्हणली' म्हणजे, तुम्हाला नाही कळल. अहे, शेजारी राहून काय फायदा. आम्ही तिकडे दोन कोसावर राहतो तरी आम्हाला कळलं, ' 'काय' ? आई म्हणाली, 'जोशी काकूंनी टी. व्ही. घेतला.' आईच्या उत्तराची वाट न पाहता म्हाळसाकाकू म्हणाल्या, 'तर काय जड झाल होत त्यांना, दोघही नोकरी करतातच नाही घेतलं तरच नवल. अहो एवढा पैसा साटवून करायचं काय ? बरं तर बर नाहीतर टी. व्ही. चे पैसे वसुल होइपर्यंत एकवेळच जेवण कमी करतील. नाहीतर मागच्या वर्षापासून मी पहाते त्या पोराच्या अंगावर एक जोड आहे बाई अगदी.' म्हाळसाकाकू एका दमात म्हणाल्या, 'काय येणार का मग छायागीत पहायला ?' त्यांनी प्रश्न केला-अहो त्यांनी बोलावून तर द्या मग पाहू, आई म्हणाली. त्यावर म्हाळसाकाकू जवळ-जवळ ओरडल्याच, 'हे बोलवायला लागल्यात त्या, अशांच्या उरावरच बसलं पाहिजे.' ते एकायला आई नव्हतीच, ती आत निघून गेली होती. म्हाळसाकाकू तरातरा चालायला लागल्या. त्यांना. रस्त्यात एक खाकी कपडेवाला हातात काळी बॅग घेतलेला माणूस भेटला. म्हणाला. 'जोशी कुठे राहतात ?' म्हाळसाकाकू तुसडेपणान म्हणाल्या, "बाहेर नकाशा लावलाय तो पहा.' व तरातरा घरात गेल्या. नाहीतर लोकांना पत्ते (सध्या खोटे) सांगायचा हा त्यांचा छंदच होता. पण आज ह्यांना जोशींचा पत्ता विचारला तेव्हा म्हाळसाकाकू चिडल्या. का तर जोशींनी टी. व्ही. घेतला होता. हा एक घोर आपराध केला होता.

संध्याकाळी सात वात वाजता अरुणाने वेण्या सोडायला घेतल्या मी म्हणालो, 'काय अरुणे, काय विचार आहे ? डेक्कनवर फिरायला जाणार वाटतं.' त्यावर ती म्हणाली, 'खरच पक्या अगदीच कसा बावळट आहेस, अरे आज छायागीत नाही का' ? मी म्हणालो, 'अग बोलावलं तर जाशील ना ?' अरे पण बोलावण कसलं यात अशा बाबतीत अजीबात औपचारिकपणा बाळगायचा नसतो. जायच अन् सरळ बसायच.' तिचा प्रॉब्लेम सुटला होता पण माझं काय, माझं कालच शाळेत जोशींच्या सुनीलशी कडाक्याची भांडण झाली होती. अरेरे ! उगाचच भांडलो आपण त्याच्याशी. आता आली का पंचाइत ! मला जर अगोदरच समजले असते की तो टी. व्ही. घेणार तर नक्की मी अपमान सहन करुन सुद्धा माझी बाजू सावरली असती ! मी पायरीवर बसून खिन्न मुद्रेने शेजारच्या घराकडे बघू लागलो. सुनील जणू काही विजयी मुद्रेनं माझ्याकडे पहात होता.

दिवसभरात जोशीकाकूंच्या कमीत कमी दहा-बारा चकरा आमच्या घरात होत. पण आता त्यांचं प्रमाण १ ते २ वर आलं. म्हणायचंच म्हणून काकू म्हणायच्या, 'का हो वहिनी तुम्ही टी. व्ही. पहायला येत नाही ?' आई काही बोलायच्या आतच त्यांनीच उत्तर देऊन टाकलं, 'नाही तर सगळी कामं बिमं उरकून कसलं हो जमतंय तुम्हाला. माझंच पहा ना उरकता-उरकता नुसते नाकी नऊ येतात. तो मेला टी. व्ही. आणल्यानंहो, नुसते बटण दाबायचा अवकाश. कसा लोकांना पत्ता लागतो कुणास ठाऊक. आले सगळे लगेच. मेल्यांना ताळ ना मेळ, उठले की आले धावत नी बसले येऊन. अहो ते जाऊ द्या मी म्हणते. एकवेळ ते परवडलं असतं; असतात लोकांना पण आपल्यासारख्या हौशी. पण त्या दिवशी त्यांची एक चांगली पॅंट गेली की हो. आता काय म्हणायचं काय ते लोकांना चोर ते चोर आणि वर शिरजोर. विचारलं तर म्हणतायत तुम्हीच लॉंड्रीवाल्याला दिली असेल आणि तुमच्याच लक्षात नसेल.'

वाड्यातले अनेक लोक जोशीकाकांचे मित्र झाले होते पण ती मैत्री केवळ गुरुवार आणि शनिवारकरता राखून ठेवलेली असे. हळू हळू माझा पण त्यात समावेश झाला. मी तर शनिवारी रात्रीपासूनच सुनीलशी इतका चांगला बोलायचो की खेळातसुद्धा तो एकदा आऊट झाला तरी त्याला डबल चान्स द्यायचो. सोमवार आला की सगळे नियम कडक व्हायचे. पण शनिवार जवळ यायला लागला की सगळे नियम त्याच्या बाबतीत एकदम शिथिल व्हायचे.

क्रिकेटची मॅच टी. व्ही. वर असली म्हणजे मला परवणीच व्हायची, मी गेलो म्हणजे त्यांची तोंडे वाकडी व्हायची माझ्याशी कोणी बोलत नसे, तरी पण मी उगीचच बोलण्याचा प्रयत्न करीत असे. ते सगळे आपल्याच तोऱ्यात

असायचे. कधी कधी मला आडून टोमणे मारायचे. मला ते सगळं कळत होतं. रागदेखील येत होता. पण मॅच पहाणंसुद्धा जरुरी होते. एक दिवस मी निश्चय केला की काय वाटेल ते झालं तरी सुन्याचं तोंड पहायचं नाही-माझं लक्ष पेपरकडे गेलं, त्यात ' आजचे टी. व्ही. चे कार्यक्रम ' या सदरात क्रीडावृत्त यामध्ये सायंकाळी ७-४२ वाजता भारत विरुद्ध पाकिस्तान हॉकीच्या अंतिम सामन्याचे काही भाग दाखवणार होते. मला क्षणभर वाटले खड्डयात गेला आपला निश्चय. जावं सुन्याकडे, पण माझा स्वाभिमान जागृत झाला. मी न जाण्याचेच ठरवले. जसजशी वेळ जवळ येत गेली, तसतसा माझ्या डोळ्यापुढे टी. व्ही. ऐटीत पहात बसलेला सुन्या दिसला. मीसुद्धा माझ्या पलंगावर बसून ती मॅच पहात बसलो. खऱ्या टी. व्ही. त नाही. माझ्या विचारांच्या टी. व्ही.त.

□


## तुमचे भांडार एक सहकारी संघटना

तुम्हाला लागणाऱ्या वस्तू महाविद्यालयाच्या तुमच्या भांडारातूनच घ्या. महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी या भांडाराचा भागधारक आहे.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅक-सेट्स, अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीट्स् व शारीरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी. शूज, सॉक्स, हाफ पँट्स वगैरे वस्तू योग्य किंमतीत मिळतील.

**प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

# ना. सी. फडके—एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व

**मृणालिनी देशमुख**
प्रथम वर्ष वाणिज्य

रेडिओवर बातमी ऐकली ना. सी. फडके वारले आणि खूप वाईट वाटले. बातमी तशी अनपेक्षित नव्हती. तरीसुद्धा वाईट वाटले. १९७७ मध्ये ते खूप अजारी होते. पण तेव्हा काळ आला होता पण वेळ आली नव्हती. आता त्यांना थोडेसे बरे वाटत होते. वाटलं मृत्यू त्यांच्यापासून दूर गेला. पण तो दूर गेला नव्हता. तिथेच बसला होता. कसले तरी अगम्य गणित मांडीत आणि अचानक त्याने त्यांच्यावर झडप घातली.

फडक्यांना कोणी मराठी साहित्यातील युगपुरुष म्हणतात तर कोणी जादुगार. खरे ते कोण होते? मला वाटतं यापेक्षासुद्धा ते काहीतरी जास्त होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होतं, त्यांना काहींनी नावं ठेवली 'स्त्रियांविषयी पाचकळ लिहिणारा म्हणून, पण त्यांनी सदैव 'कलेसाठी कला' हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवले. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर 'माझ्या साहित्यामागे कलेसाठी कला एवढंच सूत्र नाही तर कलेसाठी जीवन ही प्रेरणा अधिक अंशाने आहे. जे जे ऐकलं अनुभवलं त्याला त्याला साहित्यरूप देण्यासाठी मी झटलो आहे. त्या काळात समाजजीवन अतिशय गद्य स्वरूपाचे होते. दारिद्र्य आणि ते न दाखविण्याची धडपड यातून निर्माण झालेले साधी रहाणी नी उच्च विचारसरणी हे तत्त्वज्ञान होते. त्या काळात फडक्यांणा वेगळेच जीवन कथाकादंबऱ्यातून निर्माण केले. वेगळेच वातावरण निर्माण केले आणि ते वातावरण नेहमीच्या वातावरणापेक्षा निराळे होते. भुरळ घालणारे होते. त्यामुळे त्या काळातील तरुण–तरुणींना फडक्यांच्या कादंबऱ्यांनी वेड लावले.

फडक्यांनी लेखनाचा प्रारंभ विद्यार्थी दशेपासूनच केला होता. प्रथम त्यांनी 'मेगाचा टसा' ही लघुकथा लिहिली आणि नंतर त्यांनी लिहिलेल्या 'दादाभाई नौरोजी' या त्यांच्या चरित्रग्रंथाला तर त्यांना २०० रु. चे पारितोषिक मिळाले. तेव्हापासून अखेरपर्यंत ते नियमित लिखाण करीत. त्यांची शेवटची (८४वी) कादंबरी गेल्या वर्षी प्रसिद्ध झाली. 'यशवंत', 'अंजली' अशा मासिकांतून व 'झंकार', 'नवयुग' अशा साप्ताहिकातून त्यांचे लिखाण नियमितपणे प्रसिद्ध झाले आहे. सकाळ, दुपार, संध्याकाळ ३-३, ४-४ तास नियमितपणे लेखनिकाला मजकूर सांगत. कोणत्याही कारणाने त्यांची लेखनसमाधी भंगत नसे. तसेच ते वाचन पण भरपूर करीत. नवे वाङ्मय त्यांनी वाचले होते. आणि त्यावरून त्यांची स्वतःची मते बनविली होती. अप्पासाहेबांची लेखणी सर्वत्र रसिकतेने आणि चिकाटीने संचार करी. ५० वर्षात त्यांच्या मधुर भाषेचे लालित्य, माधुर्य आणि टवटवी जरासुद्धा कमी झाली नव्हती. किंवा तिचा प्रसन्न रंग जरासुद्धा उतरला नव्हता. त्यांची भाषा म्हणजे जणू कसलेल्या गवयाची बहारदार मैफलच! त्यांचे विचार नम्र होते. त्यांना स्वतःची मते होती अणि ती त्यांनी सडेतोडपणे मांडली. प्रसंगी भांडलेसुद्धा. अत्र्यांबरोबरचा त्यांचा वाद खूपच गाजला. त्यांचे विचार ठाम असत. टीकेला ते सडेतोड व खणखट उत्तर देत. त्यांच्या लिहिण्यात, वृत्तीत, मतात निराशा वैताग ढिलेपणा कडवटपणा पडखाऊ-पणा 'जाऊ दे झालं'ची चालढकल अजिबात नव्हती. त्यांच्या मतांना वैचारिक अधिष्ठान होते. जे जे भोगावं लागेल ते ते निमूटपणे सोसण्याची तयारी होती. ज्योतिष आणि परमेश्वर यांवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. फडक्यांची मूर्ती लहान पण कीर्ति महान होती.

त्यांची 'अटकेपार' सारखी एखादी कादंबरी वाचायला घेतली की ते आज आपल्यात नाहीत आपल्याला त्यांच्या नवीन साहित्याचा आस्वाद घेता येणार नाही याची जाणीव होते आणि मन दुःखाने भरून येते. आज फडके जरी

आपल्यात नसले तरी त्यांच्या कादंबऱ्या आपल्यात आहेत आणि अशाच अनंत काळपर्यंत आपल्यात राहणार आहेत. आपल्याला सुखवित. त्यांच्या आठवणी आहेत बकुळ फुलासारख्या सदैव सुगंध देत राहणाऱ्या त्यांनी केलेले लिखाण आपल्याला वाचता येते. त्यांनी मराठी साहित्याची केलेली सेवा आठवते आणि डोळ्यात अश्रू उभे राहतात. गदिमांच्या काव्यपंक्ती आठवतात नी म्हणावेसे वाटते,

पापण्यात गोठविली मी नदी आसवांची.

त्यांना, त्यांच्या स्मृतीला, कोटी कोटी नमस्कार करावेसे वाटतात. मराठी साहित्यातील हिरा हरपल्याची जाणीव होते आणि मनातले ढग बरसू लागतात.

□

## आवाहन

मॉडर्न महाविद्यालय १९७० साली सुरू झाले. १९७१ साली पूर्ण झालेल्या वास्तूमध्ये, उपाहार गृह व विद्यार्थी केंद्राची भर सोडता, काहीही बदल झालेला नाही. याउलट अकरावीपासून पदव्युत्तर वाणिज्यपर्यंतचे वर्ग सुरू होऊन शैक्षणिकदृष्ट्या महाविद्यालयाचा विकास जलदगतीने झाला आहे. आज विद्यार्थीसंख्या तीन हजारांवर गेली आहे. ग्रंथांची संख्या कित्येक पट झाली आहे. या वाढत्या गरजा लक्षात घेऊन ग्रंथालयासाठी स्वतंत्र, प्रशस्त इमारत, प्रयोग शाळांचे आधुनिकीकरण व विद्यार्थ्यांसाठी अधिक सुविधा करणे अगत्याचे झाले आहे. यासाठी आवश्यक असलेला निधी गोळा करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने या कामासाठी येणाऱ्या खर्चापैकी–सुमारे आठ लाख रुपयांपैकी पाच लाख रुपये देण्याचे मान्य केले आहे. या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी सुलभ हप्त्याने गेल्या ३–४ वर्षात प्रत्येकी रु. १००० याप्रमाणे जवळ जवळ रु. ६०००० ची कायम ठेव म्हणून संस्थेकडे महाविद्यालयाच्या विकासासाठी ठेवले आहेत. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना व माजी विद्यार्थ्यांना केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून लहान-मोठ्या देणग्या आमच्याकडे येत आहेत. उपप्राचार्य डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी पालक या नात्याने एक्कावन्न रुपये देणगी देऊन या कार्यास शुभारंभ केला आहे.

आमच्या आजी व माजी विद्यार्थ्यांना तसेच आमच्या सर्व हितचिंतकांना आम्ही मदतीचे आवाहन करतो. आम्हाला उत्तम प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे.

दिनांक २१–३–१९७८ ला महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या तृतीय वर्ष कला, शास्त्र व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांच्या निरोप प्रसंगी या सर्व विद्यार्थ्यांनी ठरावाद्वारे त्यांच्या महाविद्यालयाकडील अनामत रकमेतून प्रत्येकी रु. ५ महाविद्यालयाच्या विकास-निधीमध्ये करून घ्यावे अशी विनंती केली आहे.

आमच्या विद्यार्थ्यांच्या या विधायक आपुलकीबद्दल आम्हाला त्यांचा सार्थ अभिमान वाटतो.

# शिवाम्बू

**विलास चव्हाण**
द्वितीय वर्ष, शास्त्र

सर्व रोगांपासून व व्याधींपासून स्वतःचे संरक्षण करणे आणि रोग झाल्यास त्यापासून सहजरीतीने मुक्तता मिळविणे यासाठी निसर्गाने मानवाला व प्राण्यांना दिलेले अमृत म्हणजेच शिवाम्बू होय. शिव म्हणजे कल्याणकारी व अम्बु म्हणजे पाणी या दोन शब्दांपासून शिवाम्बू (कल्याणकारी पाणी) हा संस्कृत शब्द तयार झाला आहे रक्तवाहिन्यातून मूत्रपिंडात रक्त गेल्यावर तेथे काही प्रक्रिया होऊन त्यातील पाण्याचा अंश वेगळा होतो व त्याचे मूत्रात रूपांतर होते. मूत्रात कॅन्सर, हृदयरोग, क्षय इ. रोगांपासून बरी करणारी द्रव्ये आहेत. आपण खाल्लेले अन्न व पाणी यापासून शरीरात रक्त तयार होते. यासाठी जरूर असलेले क्षार व घटकद्रव्ये रक्तात शोषली जातात. बाहेर टाकाऊ जाणारे मूत्र हे विषारी द्रव्ये नाही. शरीराच्या वाढीसाठी व संरक्षणासाठी लागणारी द्रव्ये मूत्रात सूक्ष्म कणांत विरघळलेल्या स्थितीत (finely potentised) असल्याने ती पुन्हा पोटात घेतल्यास त्यांचे शोषण सत्वर व सुलभतेने होते.

आपल्या आहारातील पदार्थावर शिवाम्बूतील घटकांचे मिश्रण व प्रमाण अवलंबून असते. तसेच स्वमूत्राचे प्रमाण आपला आहार व भोवतालची परिस्थिती व ऋतुमानावर अवलंबून असते. उन्हाळ्यात फार घाम येत असल्याने मूत्राच्या प्रमाणात घट होते. मूत्रात क्षार, व्हिटॅमिन्स, एन्झाइम्स, हॉरमोन्स, अँटिबॉडीज, युरिया वगैरे अत्यंत बहुमोल गुणकारी द्रव्ये आहेत. गुणाच्या दृष्टीने स्वमूत्र कोणत्याही कृत्रिम औषधापेक्षा श्रेष्ठ, सरस, गुणकारी व बिनधोक आहे. शिवाम्बूचे थोडक्यात गुणधर्म १) शिवाम्बू हे सर्व रोगांतून मुक्त करणारे (Panacea) सजीव रसायन आहे. २) प्रतिकार शक्ती वाढवून निरोगी ठेवणारे हे एक टॉनिक आहे. ३) रोगजंतुनाशक असून शरीर व रक्त शुद्ध करणारे आहे. ४) ते विषहारक म्हणजे शरीरातील विषे व प्रतिकूल द्रव्ये नाहीशी करून बाहेरील विषापासून बचाव करणारे आहे.

इंग्रज शास्त्रज्ञ एलिस बार्कर यांचे असे मत आहे की शरीर इतर कोणत्याही औषधी द्रव्यापेक्षा अधिक अद्भुत व परिपूर्ण असे एक द्रव्य तयार करते. हे द्रव्य शरीरातील विषारी जंतूंचा नाश करू शकते. हे द्रव्य म्हणजे मानवमूत्र होय. प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ प्रो. जीन रोस्टँड यानी मनुष्याच्या शरीरातील रसग्रंथींवर संशोधन करून असे सिद्ध केले आहे की, या ग्रंथींतून झिरपणारा हॉरमोन्स नावाचा जीवनरस शरीरासाठी एक उत्तम आहार आहे. याचा काही भाग मूत्रात उतरत असल्याने त्याचा पुन्हा उपयोग केल्यास रोगमुक्ती होऊन शरीर निरोगी राहण्यास फार मदत होते. अमेरिका, जपान वगैरे सुधारलेल्या देशात मानव-मूत्रावर चालू असलेल्या संशोधनातून निघालेल्या निष्कर्षावरून कॅन्सर, क्षय, हृदयरोग वगैरे अनेक भयंकर रोगांवर गुणकारी द्रव्ये मूत्रात सापडलेली आहेत.

फार प्राचीनकाळी वैद्यकीय उपचार अगदी दुर्मिळ व ते ही मोठ्या गावी किंवा शहरी उपलब्ध असत. खेड्यातून शहरात येण्यास त्या वेळी प्रवासाची साधने नव्हती म्हणून शिवाम्बू, गोमूत्र व इतर प्राण्यांच्या मूत्राचा उपयोग सर्रास केला जात असे. हळूहळू वैद्यकीय उपचारांचा प्रसार व सुकाळ झाल्यावर मूत्राचा वापर मागे पडला व आज तर या दिव्य रसायनाबाबत कृत्रिम घृणा मनात बाळगून आम्ही या अमृतास पारखे झालो आहोत व स्वमूत्र प्राण्याच्या शरीराचा निसर्गनिर्मित वैद्य आहे हे आम्ही पूर्णपणे विसरलो आहोत. विद्यमान काळी भारी किंमतीचे साबण तयार करण्यासाठी गोमूत्राचा वापर केला जात असतो. इतकेच नव्हे तर क्रीम्स व ब्यूटी लोशन्ससाठी मानवमूत्राचा उपयोग करण्यात येतो. गुन्हेगारांना मारपीट झाली म्हणजे होणाऱ्या

वेदना व दुःखातून त्वरित आराम मिळविण्यासाठी ते शिवाम्बूचा उपयोग करतात ही माहिती पोलीस, तुरुंगाधिकारी यांना ठाऊक आहे.

शिवाम्बूत युरिया नावाचा एक अत्यंत महत्त्वाचा व परिणामकारक क्षार आहे. हा क्षार उत्तम प्रकारे संरक्षण करतो. त्याची शरीरात उणीव निर्माण झाल्यास डॉक्टर कृत्रिमपणे बनविलेले युरिया रोग्यांस औषध म्हणून देतात. लघवी बंद झाल्यास युरिया क्षाराने ती पुन्हा सुरू होते.

अन्न व पाण्यापासून शरीरात रक्त तयार होत असताना त्यात काही प्रमाणात क्षार व इतर द्रव्ये मिसळली जातात. यावेळी जास्त प्रमाणात असलेली द्रव्ये मूत्राद्वारे बाहेर टाकली जातात. यात शरीरास पोषक असलेली द्रव्येदेखील असतात त्याचप्रमाचे शरीरात काही दोष अगर विकृती निर्माण होऊन रोग झाला असेल तर मूत्रात पोषक तत्त्वा-बरोबरच विकृत द्रव्ये असतात. अर्थात ही दोन्ही प्रकारची द्रव्ये मूत्रात अती सूक्ष्म कणाच्या स्वरूपात विरघळलेल्या स्थितीत असतात. म्हणून ही द्रव्ये शरीरात परत घेतल्यास सहजपणे व परिणामकारपणे शोषली जातात. मूत्रपान व मूत्रमालीशद्वारा शरीरात जाणारी पोषक द्रव्ये ताकद, प्रतिकारक शक्ती व चैतन्य वाढवितात त्याचप्रमाणे विकृत द्रव्ये शरीरात जाऊन होमिओपथिक किंवा व्हॅक्सि-नेशनच्या सिद्धांतानुसार अँटिबॉडीच्या स्वरूपात कार्य करून रोगांचा नाश करतात. अशा पूर्णतः नैसर्गिक व आरोग्यदायी द्रव्याबद्दल गैरसमज व घृणा असावी हे मनुष्याच्या अज्ञानाचेच द्योतक होय. अर्थात हळूहळू गैरसमज दूर होऊन शिवाम्बूचा प्रचार होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

□


## तुमची पुस्तके

## एक ऋणानुबंध

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेत आम्ही हार्दिक सुयश चिंतितो. परीक्षा झाल्यावर आपली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट द्या. अनेक होतकरू विद्यार्थ्यांची ज्ञानपिपासा ही पुस्तके भागवतील व हे विद्यार्थी तुम्हाला दुवा देतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांजवळ ही पुस्तके द्या. तुम्हाला हवीत त्या वेळी तुमची पुस्तके तुम्हाला ते परत देतील.

**प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

# वहिनींच्या बांगड्या : दोन प्रतिक्रिया

[अकरावी (शास्त्र) वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना य. गो. जोशींचे 'वहिनींच्या बांगड्या' हे पुस्तक वाचायला दिले होते. हे पुस्तक वाचल्यावर 'आपल्याला काय वाटले?' ते लिहून आणण्यास सांगितले होते. बहुतांश मुलांनी आपल्या प्रतिक्रिया लिहून दिल्या. त्यांपैकी दोन येथे देत आहोत.]

## एक

**यामिनी दत्तात्रेय फरांदे**
अकरावी शास्त्र

वहिनींच्या बांगड्या ही कादंबरी वाचली. फारच सुंदर आहे. एकदा हातात घेतली की संपूर्ण वाचून होईपर्यंत खाली ठेवावीशी वाटत नाही.

ही कादंबरी थोडी रडायला लावणारी आहे. कदाचित य. गो. जोशींनी जेव्हा ही कादंबरी लिहिली तेव्हाचा समाज कदाचित अशा कथा आवडणारा असावा. या ठिकाणी जोशींनी अनावश्यक वर्णन बरेच टाळले आहे. नाहीतर हल्लीच्या कादंबऱ्यांत उतारेच्या उतारे नुसते वर्णन असते. कधी पहाटेचे तर कधी संध्याकाळचे व ते वाचताना कंटाळा येतो.

य. गो. जोशींनी तुमच्या आमच्या घरात असणाऱ्या गोष्टीच पण अत्यंत रसाळ अशा वर्णन केल्या आहेत. य. गो. जोशींनी निर्माण केलेली व्यक्तिचित्रे— काका, वत्सलाबाई, प्रभा, वासू ही आपल्याला नेहमीच्या जगात अनेक ठिकाणी भेटतात. पण दादा आणि वहिनी क्वचितच दृष्टीस पडतात. वहिनीसारखी स्त्री हल्ली सापडणार नाही. खरे तर कोणत्याही स्त्रीला नवऱ्याकडून आपले कौतुक व्हावे असे वाटते. पण संपूर्ण आयुष्यात त्यांना ते कधीही मिळत नाही. तेव्हा एकदा दादांना त्या सहज म्हणतात,' मला चांगले गाता येते. सतार वाजवायला येते ! सोंगट्यांचा पट चांगल्यापैकी खेळता येतो माहीत आहे तुम्हाला ! तुम्हांला माझ्याविषयी खरेच काय माहीत आहे ! ' खरंच आपल्या भावाच्या सुखासाठी मनुष्य केवढा मोठा त्याग करू शकतो ! पण काही वेळेला मात्र दादांचे वागणे अतिरेकी वाटते. इतके काही कोणी आपल्या भावासाठी करीत नाही आणि एवढे करूनही शेवटी त्यांना काय फळ मिळते ! लग्न होऊन कित्येक वर्षे लोटल्यावर आपल्या भावाचे लग्न निवाल्यावर दागिन्यांची पेटी भावाच्या बायकोला देण्यासाठी आपल्या पत्नीपासून दागिने लपवून ठेवणारे दादा ( या प्रसंगात ) चांगले वाटत नाहीत. शेवटी त्यांनी आपल्या बायकोच्या त्यागाची काय किंमत केली ! तिने एवढे आपल्या भावाला सुख दिले. स्वतःच्या आवडीनिवडी बांधून ठेवल्या पण दादांना आपली बायको कशी आहे हे कळले नाही. अगदी शेवटी कळले पण तेव्हा उशीर झाला होता.

वत्सलाबाई व काका ही दोन्ही व्यक्तिचित्रे अत्यंत उठावदार झाली आहेत. अशा तऱ्हेच्या अनेक व्यक्ती असतात व त्या आपल्या नेहमी पाहण्यात असतात. आपल्या हेकेखोरपणाने अनेक स्त्रिया आपल्या मुलींच्या आयुष्याचे वाटोळे करतात.

ही सर्व कादंबरी अप्रत्यक्षपणे वासूकरिता उभारली असली तरी त्याचा मनावर प्रभाव पडत नाही. बाळ बरा झाल्यावर लहान मुलीसारखी वागणारी वहिनी, पावसात भिजणारी वहिनी, चांदण्यात उभी राहणारी, स्वतःशीच गुणगुणणारी, पावसात गारा खाणारी वहिनी ही अस्वाभाविक वाटत नाही. कारण आयुष्यभर दाबून ठेवलेल्या भावनेचा तो स्फोट असावा असे वाटते. बाळ आजारी असताना मनावर असलेले प्रचंड दडपण एकदम उतरल्याने मनाला येणारा सैलपणा आहे हा.

सोन्यावर आगीचा झोत सोडला तर इतर कशाचाही परिणाम होत नाही असे माझ्यासारख्या शास्त्रशाखेत अभ्यास करणाऱ्या मुलीचे ज्ञान. त्यामुळे कादंबरीत आगीत न जळता तशाच राहिलेल्या बांगड्यांचा जो प्रसंग रंगवलेला आहे त्यावर विश्वास बसायला नको; पण तो बसतो आणि मला वाटते हेच या कादंबरीचे फार मोठे यश आहे.

# दोन

कु. त्रिभुवन
अकरावी शास्त्र

चर्चमध्ये, बायबल-स्टडीच्या वेळेस आमचे पास्टर जेकब आम्हांला कधी कधी एक गोष्ट अत्यंत आग्रहाने सांगतात–

'लंडन शहरात एक विधवा स्त्री रहात होती. तिला पीटर नावाचा दहा वर्षाचा एक गोड छोकरा होता. ती विधवा दिवस–रात्र काबाडकष्ट करून आपल्या हृदयाच्या तुकड्याचे पालनपोषण करीत असे. दोघांना एकमेकांशिवाय या जगात आपलं म्हणून कोणीच नव्हतं.

लहानग्या पीटरला आपली स्थिती समजत होती. पण तो तिला या वयात तरी काहीच मदत करू शकत नव्हता. लहानगा पीटर त्या वयातही फार समंजस बनला होता. एखादे फुलझाड खच्ची केले, की ते जोराने वाढते आणि लवकर फुल धरते म्हणतात, त्याप्रमाणे पीटरची अवस्था होती. काही भावना आणि विचार त्याच्या वयाच्या मानाने खूपच फुलले होते!

तो पीटरच्या मम्चा ( ममीचा ) वाढदिवस होता. परंतु दुर्दैवी पीटर! त्याच्याकडे आपल्या आईला भेट म्हणून देण्यासुद्धा दहा पैशांखेरीज काही नव्हते. तरीही तो हिंमत हरला नाही. दहा पैशांतसुद्धा उत्तम वस्तू आईला तो देणार. होता त्याने जीझसकडे आईसाठी आशीर्वाद मागितला.

लंडन शहरातील त्या फुलांच्या दुकानात पीटर शिरला. 'सर, मला एक दहा पैशास उत्तम फूल देऊ शकाल का?' 'छे, बाळ अरे दहा पैशास कुठे सुंदर फूल मिळू तरी शकते का?' दुकानदाराच्या उत्तराने पीटर हिरमुसला. तरीही शक्यतो नैराश्येचा सूर आपल्या आवाजात डोकावणार नाही याची खबरदारी घेत तो म्हणाला ' प्लीज सर, आज माझ्या ममीचा वाढदिवस आहे. मी तिला ह्यापेक्षा काहीच देऊ शकत नाही.' तरीही खिन्न स्वर दुकानदाराने हेरलाच! त्या दयाळू माणसालाही थोडे वाईट वाटले. तो म्हणाला, 'कोशिश करतो मी,' आणि आश्चर्य, पीटरला दहा पैशांत सुद्धा त्याने एक अप्रतिम फूल दिले. पीटरचा आनंद गगनात मावेना. तो दुकानदाराचे आभार मानून पळतच घराच्या दिशेने निघाला. त्या फुलाने पीटरचे दुःख अस्मानात विरघळत जाणाऱ्या सूर्याप्रमाणे विरघळून गेले.

खर्रर्र घसूस... पीटरला अपघात झाला होता. ते फूल थरथरले. मातृप्रेमाने उत्तेजित झालेले रक्त त्याच्या अंगावर पडले होते ना? अरेरे! गरीब बिचारा पीटर. काय आईला शुभेच्छा देण्याचेही त्याच्या नशिबी नव्हते?

'डॉक्टर, प्लीज, हे फूल तुम्ही माझ्या ममीला देऊ शकाल? तिचा बर्थ डे आहे आज. बस्, माझ्याऐवजी तुम्हीच 'बधाई' द्या तिला, प्लीज डॉक्टर.' शेवटचे आचके देणाऱ्या पीटरकडे पाहून यंत्रजीवी डॉक्टरांना आपल्याला मन आहे याचा भास झाला. त्यांनी पीटरला आश्वासन दिले.

पुनश्च ते डॉक्टरांच्या हातात दिले गेलेले प्रीतीचे फूल थरथरले. डॉक्टरांचे अश्रू त्या फुलावरून ओघळले, फुलाला तरतरून काटा फुटला. कारण पीटर केव्हाच पुढच्या प्रवासासाठी निघून गेला होता.'

ही गोष्ट सांगताना पास्टर नेहमीच रडतात. आम्ही मात्र फक्त भारावतो. पास्टरनी या गोष्टीवर खोलवर विचार केलेला आहे, पण आम्ही मात्र नुसतेच भारावतो! खोलवर विचारच करण्याचं सोडून दिलंय का माणसानं.' अशा भावात्मक गोष्टींवर? ही कथा पीटर व त्याची आई यांच्या प्रेम व विश्वास यावर आधारलेली आहे.

य. गो. जोशींच्या 'वहिनींच्या बांगड्या' हे कथानकही प्रेम व विश्वास, गैरसमज व त्यातून उद्भवलेले, मन हेलावून टाकणारे प्रसंग यांवर आधारित आहे.

हे प्रेम कदाचित २० व्या शतकातील वाचकास कल्पनारम्य वाटले, तर त्यात काही नवल नाही. कारण असे प्रेम— आणि त्यात वहिनी-दिराचे तर नाहीच— क्वचितच— शोधून सापडले तर सापडले. अशा प्रकारचे प्रेम जगणारी माणसं असती तर 'आई' की जिला सध्याच्या वाङ्मयी जगात जिवंत प्रेमाचा झरा म्हणतात व जिच्यावर अनेक साहित्य, काव्य लिहिले गेले आहे, ते लिहिण्याची वेळच आली नसती.

या कथानकातील प्रमुख पात्र वहिनी— एक मातृत्वहीन मातृत्व प्राप्त झालेली, पतिव्रता, प्रेमळ, शांत अशी स्त्री. पतिव्रता असल्यामुळे आर्य स्त्रीला शोभेल अशा प्रकारेच त्यांनी आपले सर्व व्यक्तिमत्त्व आपल्या पतीमध्ये लोपवून टाकले होते. पतीने सांगताच दिराच्या व नवऱ्याच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करणारी, आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवणारी, तरीही निर्मळ मनाने संसार करणारी ही वहिनी, हिच्या बाजूने फक्त वासूच आहे असे कथा वाचताना वाटते. प्रथम मूल मेल्यावरही ते मातृदुःख विसरून वासूने 'आई' म्हणून हाक मारताच पुन्हा आनंदित होऊन त्यालाच मुलगा मानून सांभाळणारी वहिनी असामान्य वाटते. मातृसुख हवे म्हणून आपला अपमान सहन करून प्रभाला

बोलावणाऱ्या वहिनी खरोखरच मोठ्या मनाच्या म्हणाव्या लागतील. प्रभा व वत्सलाबाईकडून एवढे कुत्सित शब्द झेलूनही गप्प बसणाऱ्या वहिनींसारख्या स्त्रिया या जगात औषधालाही सापडणार नाहीत. घरातील प्रत्येक व्यक्तीवर असणारं वहिनींचं प्रेम पाहिलं की वाटतं, वहिनी जन्मल्या त्या फक्त प्रेम देण्यासाठीच व प्रेमाचा महिमा पटवण्यासाठीच. एवढे निर्मळ प्रेम फक्त कथाकादंबऱ्यांतच पाहायला मिळते.

वहिनींच्या खालोखाल दुसरे मुख्य पात्र वासूचे. वासूसारखी व्यक्तिमत्त्वं आपल्या रोजच्या जीवनात बघितली तर पुष्कळच सापडतील. वासुदेव लहानपणी जितका बुद्धिमान, समंजस तितकाच लडिवाळ, बुद्दू व पोरकट वाटतो. त्याच्या स्वभावातील मुख्य गुण म्हणजे 'हट्टीपणा'. लहानपणी माया न मिळाल्याकारणाने त्याचा तो स्वभावच बनून गेलेला आहे. मोठेपणी या स्वभावाचे चटके सर्वच कुटुंबाला वेळोवेळी जाणवतात. दादानी म्हटल्याप्रमाणे, खुरटलेल्या झाडाला फार लवकर फुले येतात, हे वाक्य वासूबाबतीतच काय या जगात शोधावयास जाल तर अक्षरशः असंख्य मुलांच्या बाबतीच खरे टरते. आणि त्याला मुले पोरकी पाहिजेत असेही नाही; परिस्थितीचे चटके बसून ही लहान लहान मुले खेळण्या-बागडण्याच्या वयात समंजसपणे वागतात आणि मग बनतात कृत्रिम! आणि त्यामुळेच ही मुले आपल्या जीवनात आलेले अनेक आनंदाचे क्षण नाकारतात. हां, काही बंडखोर मुले याला अपवाद असतील हा भाग वेगळा.

वहिनींना जेव्हा प्रभा व वत्सलाबाई यांच्याकडून अपमान सहन करावा लागतो, त्या वेळेस वासूने घेतलेला आपल्या पत्नी व सासूबाई विरुद्धचा पवित्रा मला पटतो. कारण आपला संसार ज्या कजाग स्त्रीमुळे मोडू पाहातो अशी आपली सासू व तिची गुलाम झालेली आपली पत्नी यांना त्याला धडा शिकवायचा असतो. वासूला त्याच्या बाबतीत तरी संयुक्त कुटुंबपद्धती हवी असते. कारण आई-बापाविना पोरक्या वासूला वहिनीने आईची तर दादाने वडिलांची उणीव भासू दिली नव्हती. त्यामुळे उत्पन्न झालेले तिघांतले नाते व प्रीतीही अतूट होती. तिची ओढ इतकी तीव्र होती की वासूला दादा-वहिनींनी कितीही म्हटले तरी त्याला सोडून त्या दोघांनी कुठेही जाऊ नये असे वाटत होते आणि त्याने तशी जबरदस्तीही केली. या जबरदस्तीच्या मागे फक्त प्रेम ही भावना होती. वासूला मनापासून असे वाटत होते की आपल्या संसारात दादा-वहिनींनी लक्ष घालून आमच्या बरोबरच आनंद लुटावा. परंतु त्याच्या मूर्ख, मोठ्या व गर्विष्ठ पत्नीमुळे त्याचा हा बेत कचऱ्याच्या टोपलीत जातो व तो हरतो; परंतु वहिनी जिंकतात.

दादांचे व्यक्तिमत्व तर मला बिल्कूल पटले नाही. दादा स्वभावाने चांगले आहेत. एका बापात, भावांत, जे गुण असायला हवे ते त्यांच्यात आहेत. परंतु पती या नात्यात मात्र ते कुठेतरी दुबळे ठरतात. त्यामुळे अती सुख येताच त्यांच्या मनात वाईट विचार येऊ लागतात व मग ते मिळवलेली शांतता थोड्यापुरती गमावतात; तर दुःख, संकटे येताच त्यांच्यापुढे विनम्र होतात, जीवनातील आनंदाचे क्षण न जगणारा परंतु जपणारा हा विचित्र माणूस फारच अलिप्ततावादी वाटतो. दुःखा-सुखाच्या वेळेस फारच भावनाविवश होतो. त्यांच्या अंगी दुःख पिऊन पुनः हसण्याची शक्ती नाही. संकटांच्या वेळेस हाच माणूस पुढे सरसावतो, परंतु धैर्य, शौर्य दाखवावे म्हणून नव्हे तर ते एककर्तव्य आहे म्हणून.

परंतु ही झाली 'दादा' नावाच्या माणसाच्या स्वभावाची एक बाजू. आपल्या एकुलत्या एक भावासाठी केलेला त्याग या कलियुगात मला अवर्णनीय वाटतो. भावाभावांमधले प्रेम असेच असायला हवे की, ज्यामुळे तंटे, हेवा, मत्सर न उद्भवता जास्तीत जास्त एकोपा, प्रेम, सद्भावना वाढीस लागल्या पाहिजेत, नाहीतर कुठल्याही वर्तमानपत्राचे पहिले पान उघडले की प्रत्येक दिवशी एक तरी बातमी असतेच : जमिनीच्या तंट्यावरून भावाभावांत मारामारी किंवा भावाने भावाचा चाकू भोसकून खून केला इ. हे वाचले की माझं मन कसं उद्विग्न होतं. काय माणूस इतक्या खालच्या थराला केव्हा पोहोचला ? तो एवढी नीच कर्मे करू शकतो ?

परंतु दादा मात्र मानवाचे खरे, चांगले स्वप्न दाखवणारा, प्रेमळ, आत्मपरीक्षणी, भावनाशील, वासूच्या सुखात आपले सुख पाहणारा आहे. माझ्या मते प्रेमळ भाऊ, पत्नी लाभल्यामुळे त्याने समाधानी व्हावयास हवे. परंतु म्हणतात ना मानवी मन, सुख-समाधान पायाशी लोळण घेऊ लागताच भविष्याचा मागोवा भूतकाळाच्या आधाराने घेऊ लागतो. तोच स्वभाव दादांत पुरेपूर भिनला होता. त्यामुळे एवढ्या तेवढ्या कारणाने त्याने आनंद गमावला होता. मुलं मेली म्हणून काय झाले ? लगेच विरागवृत्ती धारण करणे कोणत्याही पुरुषाला शोभण्यासारखे नाही. वहिनींना ज्याप्रमाणे प्रथम वासूत व नंतर त्याच्या मुलांत आपली मुलं पाहिली व आपला आनंद द्विगुणित केला त्याप्रमाणे दादानेही करायला हवा होता. आपल्या या भ्याड-

पणाची कबुली दादा वहिनींजवळ देतो.

अरविंद ही व्यक्तिरेखा समाजात ठिकठिकाणी आढळते. शिक्षकांचा मार किंवा शिक्षा वाचविण्यासाठी तो खोटे बोलतो. परंतु समोरच्या व्यक्तीचा मायाळूपणा व जिज्ञासावृत्ती पाहून तो खजिल होतो व खरं सांगतो. अरविंद हुशार आहे पण त्याला व्यवस्थित मार्ग दाखविणारी व्यक्ती सापडलेली नाही. त्यामुळे तो भटकतो आहे. घरात नीट वळण लावणारे कोणी नसल्यामुळे तो वर्गातही खोटे बोलण्याचे धाडस करतो. पण वासू व दादा यांच्याबरोबर मैत्री जमताच त्याची गाडी रुळावरून भरवेगात अपघात न करता धावू लागते.

काकाजी ही व्यक्तिरेखा मला सौम्य, धाडसी परंतु अविचारामुळे काही काळ पत्नीच्या तंत्राप्रमाणे वागणारी वाटते. त्यांचे शेवटचे पाऊल फारच चांगले आहे. त्यांना तरी आयुष्यात मी कुणाचातरी संसार सुखी केल्याचा म्हणा किंवा आपल्या कजाग पत्नीवर अधिकार गाजविल्याचा आनंद मिळतो. पण हे पाऊल उचलण्याअगोदर त्यांची होणारी मानसिक ओढ, तारांबळ हे सर्व पाहूनही आपल्याला काहीच करता येत नाही ह्याबद्दल वाटणारी खंत वाचून मलासुद्धा वाईट वाटले. मध्यंतरी घेतलेला अलिप्तपणा त्यांच्या युद्धाची गुप्त तयारी व मनाची तयारी, खंबीरपणा, शौर्य हे उत्पन्न करण्याकरिताच ह्यांनी घेतली असावी व यातच काही सोपा उपाय सापडतो का म्हणून गीता वाचन असे वाटते.

वासूच्या जीवनातील तो शालेय काळ, त्याचे ते असामान्य सर, या जगात आता हातांच्या बोटांवर मोजण्याइतके तरी सापडतील की नाही शंकाच आहे. कदाचित यातूनच शिक्षकाचा गौरव झाला असे मी मानते. समाज निरोगी होण्यासाठी अशा शिक्षकांनी (निरोगी) असण्याची आवश्यकता आहे हे इथेच पटते.

समाजात सापडणाऱ्या घमेंडखोर, आततायीपणा, चुगलखोर, आगलावूपणा करणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व या कादंबरीत प्रामुख्याने वत्सलाबाईकडे जाते. काकाजींनी दिलेल्या मोकळेपणाचा हा परिणाम सुद्धा असू शकेल याच स्वभावामुळे वासूच्या कुटुंबाची शांतता ढवळून निघते. व अनेक गैरसमज उत्पन्न होतात.

प्रभा मात्र वयोमानाप्रमाणे पाहिल्यास फारच बुद्दू व कल्पनाशक्तीविरहित वाटते. लग्न झाल्यानंतर हिचे आईच्या म्हणा किंवा दुसऱ्याच्या मताप्रमाणे वागणे बरोबर वाटत नाही. तिला लग्नाअगोदरच वासूने दादा-वहिनींबद्दल सांगूनसुद्धा ती आईमुळे मनात नसतानासुद्धा वहिनींना झिडकारते त्यामुळे तिचा फार राग येतो. आईच्या सल्ल्याप्रमाणे वागल्यामुळे किती मनस्ताप भोगावा लागतो हे कळूनसुद्धा परत तीच चूक करणाऱ्या प्रभाचे फारच आश्चर्य वाटते. स्वतःला सुशिक्षित व आधुनिक म्हणवून घेणाऱ्या ह्या माय-लेकी अंधःश्रद्धांच्या आहारी गेलेल्या आहेत, पण जुनाट वाटणाऱ्या दादा-वहिनींचे स्वभाव मात्र आधुनिक वाटतात. हा फरक प्रामुख्याने जाणवतो.

परंतु वहिनी शेवटी मरतात व हा कुटुंब कलह नाहीसा होतो. हे वाचून प्रश्न उभा ठाकतो की, वहिनींना घरातील शांतता, प्रेम पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आपल्या प्राणाचे मोल तर नाही द्यावे लागले ? त्या मात्र संपूर्ण त्यागमय जीवन जगल्या. फक्त दुसऱ्याला होत असलेला आनंद पाहूनच त्या आनंदित होत असत. पण त्यांच्यासाठी मात्र विशेष त्याग केल्याचे वाचनात कुठे आले नाही. 'त्याग' हाच माझ्या मताप्रमाणे वहिनींच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता.

□

# राष्ट्रीय सेवा योजना–शिबीर.

**कु. सुनंदा भा. गोडबोले**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

'राष्ट्रीय सेवा योजना' ही मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवून त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी आंतर-महाविद्यालयीन योजन आहे. या योजनेचे ध्येय आहे- Education through community service राष्ट्रीय सेवा योजनेचं कार्य हे फक्त श्रमदानापुरते मर्यादित नसून त्याला काही वैचारिक पायाही आहे.

१५ ऑगस्टला 'पिसोळी' या दत्तक गावी झेंडावंदन, रक्षाबंधनाचा कार्यक्रम अंधशाळा, लेप्रसी हॉस्पिटल ठिकाणी साजरा केला जातो. दसऱ्याला सोनेवाटपाचा कार्यक्रमही होतो. तसेच वेगवेगळे परिसंवाद, मोठमोठया व्यक्तींची व्याख्याने असे निरनिराळे कार्यक्रम वर्षभर चालतात.

या योजनेतर्फे यंदाच्या वर्षी विशेष शिबिर 'शिवतक्रार–म्हाळुंगी' या गावी झाले. या शिबिरासाठी निवडलेल्या गावाच्या नावापासूनच सगळ्यांच्या मनात कुतुहल होते. शिवतक्रार म्हणजे शिवाजीच्या वेळच्या भांडणासंबंधी की काय? तर खरं म्हणजे निमगाव आणि म्हाळुंगी या दोन गावांच्या सीमेवरून म्हणजे शिवेवरून लोकांची नेहमी भांडणे होत. त्यावरून शिवतक्रार हे नाव पडले. शिवतक्रार म्हाळुंगी तळेगाव–दमढेरे पासून ७–८ मैलांवर असलेलं २७ घरांचं गाव!

१९६९ सालापासून या गावात शेतीला पाटाचे पाणी लिफ्टद्वारा मिळत होते. २–३ वर्षे लोकांनी या पाटाचा उपयोग करून घेतला. पुढे काही आपसातल्या भांडणातून ह्या पाण्याचा कोणी उपयोग करून घेतला नाही. बीजबिल भरायचे राहिले होते. लोक ते भरायला तयार नव्हते. त्यामुळे वीजमहामंडळाने या गावाला वीजपुरवठा बंद केला. त्यामुळे ही योजना बंद पडली आणि पाणी असून शेतीला त्याचा उपयोग नाही अशी त्यांची गत झाली. पुण्यातील 'ग्रामायन' या संस्थेने या गोष्टीत लक्ष घालून ही बंद पडलेली लिफ्ट योजना पुन्हा चालू करायचे ठरविले. त्याकरिता ग्रामायनचे एक कार्यकर्ते श्री. नामदेव माळी स्वतः तेथे ६ महिने जाऊन राहिले आणि गावातील भांडणं सोडविण्याच्या दृष्टीने त्यांनी काही यशस्वी प्रयत्न केले.

या लिफ्टच्या कामाकरिता काही श्रमदानाची आवश्यकता होती. त्याकरिता आम्ही हे शिबिर तेथे घेण्याचे ठरविले. आपल्या 'घराबाहेरचं सामूहिक जीवन' अशा शिबिरांमधून अनुभवायला मिळतं. आमचं हे शिबिरांचं ठिकाण जास्तीत जास्त गैरसोयीचं होतं. पण ते आम्ही मुद्दाम निवडलं होतं. ग्रामीण खडतर जीवन आम्हाला अनुभवायचं होतं. अशा शिबिरांमधून एक प्रकारची सामाजिक जाणीव निर्माण केली जाते. ग्रामीण भागाशी समरस होऊन, त्यांच्या समस्या समजावून घेऊन त्यांना तोंड देऊन आपल्याला तेथे कसे राहता येईल हेही अनुभवायला मिळते. मानवी जीवनातील वेगवेगळे कंगोरे कळतात.

दि. २३ डिसेंबरला आम्ही शिवतक्रारला गेलो. प्रथमतः सर्वजण भांबावून गेलो होतो. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर प्रश्न चिन्हे दिसत होती. आमचे हे पहिले शिबिर होते. आम्ही काही अपेक्षा बाळगून गावात पदार्पण केले होते. गावातील लोक आम्हांला नवीन व आम्ही त्यांना नवीन. नंतर रात्री प्राध्यापकांनी शिबिरात आपल्याला नेमकं काय करायचं आहे ह्याची माहिती दिली. गावकरी मंडळीही या बैठकीला उपस्थित होती. प्रत्येकाने स्वतःची ओळख करून दिली. तेव्हा फक्त एकमेकांचे चेहरे न्याहाळले. पण नंतर १० दिवसांत आम्ही एकमेकांच्या मनाशी समरस झालो. असा गेला शिबिराचा प्रथम दिवस.

दि. २४ पासून खरी कामाला सुरवात झाली. सकाळी ६ वाजता उठून दिनचर्येला सुरवात झाली. सकाळी ८ ते १२ ही श्रमदानाची वेळ होती. दुपारी येऊन अंघोळी,

जेवणं, विश्रांती करून पुन्हा संध्याकाळी ४ ते ६ श्रमदान केले. संध्याकाळी २ गट पाडून 'राष्ट्रीय सेवा योजना-ध्येये व उद्दिष्टे' यावर चर्चा केली. नंतर गावकऱ्यांशी गप्पा मारत मारत हा दिवस संपला.

दोन तीन दिवसातच सगळेजण कामाशी अगदी एकरूप होऊन गेले होते. सगळं काम अंगवळणी पडलं होतं. एके दिवशी सकाळच्या कामाला सुट्टी दिली तर चुकल्यासारखं वाटायला लागलं. रोज रात्री आम्ही वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करायचो. गावकरी लोकदेखील आमच्यात खूपच सामील झाले होते. गावकऱ्यांनी आम्हाला सर्वतोपरी उत्कृष्ट सहकार्य दिले. ग्रामीण लोकमनाची एक प्रतिमाच आमच्या मनात कोरली गेली. नंतर एके दिवशी गावकऱ्यांच्या माहितीसाठी गावात एक अनुबोधपट दाखविण्यात आला गावकऱ्यांना आवडतील असे संत नामदेव तसेच विविध तीर्थक्षेत्रे वगैरे संबंधी होता.

दररोज काम व चर्चा यामुळे पुढे सराव झाला. गावात एक छोटीशी पहिली ते चौथी अशी शाळा आहे. त्या मुलांचे आम्ही रोज संध्याकाळी खेळ घेत होतो. ती मुलंसुद्धा आमच्यात खूपच समरस झाली होती.

आणि म्हणतात ना– क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे, त्याप्रमाणे आम्ही शाळेतील मुलांना अंघोळी करा, नखे काढा असं नुसतं न सांगता त्यांना प्रत्यक्ष नदीवर घेऊन जाऊन आंघोळी घातल्या अशा तऱ्हेने त्या मुलांशी आमची गट्टी जमली. या शिबिरामुळे सगळ्यांमध्ये एक प्रकारची सामाजिक जाणीव निर्माण झाली. चर्चेमुळे विचारांची देवाणघेवाण होऊन वैचारिक पातळी उंचावली. ग्रामीण जीवनाचा सखोल अभ्यास करण्याची एक संधी मिळाली. अशा तऱ्हेने व्यक्तिमत्व विकासाला चालना देणारे हे एक शिबिर झाले.

ह्या शिबिराविषयी आमच्या मनात ज्या काही अपेक्षा आकांक्षा होत्या त्या सर्वतोपरी यशस्वी झाल्याच असे नाही. काही अपुऱ्या काही भरलेल्या अंतःकरणाने आम्ही हे १० दिवसांचे शिबिर संपवून घरी परतलो, ते काही नवीन विचार घेऊन... मनाशी काही प्रतिज्ञा करून ग्रामीण भागासाठी काही तरी खारीएवढे काम केले ह्या सद्भावनेने. अशा शिबिरांचा वारंवार लाभ व्हावा, त्या शिबिरांस जाण्याची संधी मिळावी व थोडेफार समाजाच्या ऋणाचे ओझे कमी व्हावे ह्या थोड्याफार स्वार्थी हेतूने व मोठ्या प्रमाणात उदात्त हेतूने शिबिरास जाण्याची परमसंधी परत कधी मिळते ह्या आशेवर व झालेल्या शिबिराची गोड चव जिभेवर घोळत ठेवून पुढच्या शिबिराची चातकाप्रमाणे वाट पाहात असलेल्या अनेक शिबिरार्थींपैकीच मी एक. आणि मग का बरे या शिबिरास अपूर्व संधी म्हणू नये ?

# लहान मुलांसाठी चालविल्या जाणाऱ्या आनन्दप्रवृत्ती

**राजश्री आ. सिद्ध**
तृतीय वर्ष कला

" करी मनोरंजन जो मुलांचे ।
जडेल नाते प्रभूशी तयाचे ॥ "

**—साने गुरुजी**

पूज्य साने गुरुजींनी बालकांबद्दल आस्था असणाऱ्या कोणाही माणसाला यामधून कायमचे मार्गदर्शन करून ठेवले आहे. या ओळींचा विचार करता असे दिसून येते की ते आपल्याला ' मनोरंजनातून शिक्षण ' या कल्पनेकडे सहजच घेऊन जातात. ' आनन्द विरुद्ध अभ्यास ' ही बालजीवनातील लढाई संपवणारा हा विचार आहे. वास्तविक पाहाता मनोरंजनातून शिक्षण घडतेच. ते कोणी हेतुपुरस्सर दिलेले असो वा नसो. परिसरामधून विविध प्रकारच्या रंजक आणि अन्य प्रवृत्तींचा मारा मुलांवर होत असतो. बालपण हा काळ जीवनातल्या भावी व्यक्तिमत्त्वाचा पाया घालणारा काळ आहे. आपण सर्वसामान्य विकसनाकडे नजर टाकली तर आनन्द घेण्याची उगमस्थाने बदलत जातात, असेच दिसते. १) शरीर क्रियातून आनन्द २) बौद्धिक व मानसिक करामतीतून आनन्द आणि ३) नवनिर्मितीचा आनन्द असे तीन टप्पे पडतील. आनन्द घेण्याच्या पुढच्या टप्प्यावर आपण मागच्या टप्प्यावरचे आनंद पुढे नेतच असतो, परंतु आपण ते मागे टाकलेले असतात एवढेच. सांस्कृतिक व सामाजिक दर्जा बालकाचे बरोबरीच्या मुलांबरोबरचे वर्तन ठरवतो. पूर्व प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलाला लोकांनी आपल्याला व्यक्ती म्हणून ओळखावे असे वाटते. मुलाला कोणाचे तरी प्रेमाचे मार्गदर्शन हवे असते. सुरक्षिततेची भावना त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे. शिक्षक जर प्रेमळ असला तर मुलं शाळेत रमतात. त्यांचा आत्मविश्वासही वाढीला लागतो व त्यांच्या ठिकाणी योग्य वृत्ती निर्माण होतात. परंतु अजूनही ती प्रामुख्याने स्वतःचाच विचार करतात. पूर्व प्राथमिक शाळेतून जर मूल प्राथमिक शाळेत आले असेल तर पुष्कळच मिळून मिसळून वागते. प्राथमिक शाळेत निरनिराळे समूह कार्यक्रम आखले जातात. त्यामुळे मूल दुसऱ्याबरोबर खेळायला, सहकार्य करायला शिकते. बालकांचा आत्मकेंद्रीपणा अशा तऱ्हेच्या समूह कार्यक्रमामुळे बराच कमी होतो व बालक समाजाभिमुख बनायला लागते. म्हणून शाळेतील समूह कार्यक्रम बालकांच्या हिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. त्यांची फार काळजीपूर्वक आखणी करणे महत्त्वाचे. त्यांच्या भावनेची अवस्थाच अशी असते की ते आपल्या लहरीप्रमाणे, इच्छेप्रमाणे, आवडीप्रमाणे दुसऱ्याजवळ वर्तन करते. शाळेमध्ये खोडकरपणा करते. शिक्षकांची टिंगल करते. पण त्याच वेळी आपल्या शाळेविषयी, शिक्षकांविषयी त्याला अभिमान असतो. या सर्व अनुभवातून बालकाला एक प्रकारे स्वतःची जाणीव होत असते व त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असते.

लहान मुलांमधील आणखी एक मोठा भाग म्हणजे त्यांचा स्वातंत्र्यवादी विचार— ' तू नको धरूस, मला ते एकट्यालाच चांगलं खाता येतं ' किंवा ' मीच अंघोळ करणार ' ' मीच कपडे घालणार ' वगैरे हट्टीपणा करते तेव्हा दुसऱ्याने मदत करण्यापेक्षा आपणच आपले काम करावे ही इच्छा मुलाची असते. एखादी गोष्ट करण्यासाठी मोठी माणसे मुलाच्या सारखे मागे लागतात व मुलात प्रतिकारी वृत्ती निर्माण होते. उदा० मूल नुकतेच बोलायला लागलेले असते. आईला त्याचे फार कौतुक वाटते. कोणीही आले गेले की मुलाने त्यांना बोलून दाखवावे व त्याचे कौतुक व्हावे असे आईला वाटते. मूल थोडा वेळ आईला प्रतिसाद देते, पण नंतर कंटाळते, व काहीही बोलण्याचे नाकारते व मुलावर हट्टीपणाचा आरोप येतो. मुले शिस्तीला प्रतिकार दाखवितात यात विशेष काही घडते असे म्हणता येणार नाही. हे साहजिकच आहे. कारण मुलांना सारखे ' हे कर ' आणि

'ते करू नकोस' असे ऐकावे लागते. त्याच्यावर कित्येक नियम लादले जातात. मूल खेळण्यात गुंतलेले असते. तोच त्याला जबरदस्तीने जेवायला बोलावले जाते. जेवताना बसले पाहिजे. उभे राहून इकडे तिकडे हिंडून जेवायचे नाही. चाकूकात्र्यांशी खेळायचे नाही. इस्त्रीला हात लावू नकोस. स्वयंपाक करताना सारखा मधेमधे का येतो आहेस वगैरे अनेक उपदेशाचे डुटके मुलाला सारखे पाजले जातात नियम पाळले पाहिजेत ही समज प्रौढांजवळ जितकी असते तितकी मुलांजवळ असत नाही. त्यामुळेच मूल हट्टीपणा करते.

एकंदरीत विचार करता त्यांच्या आविष्काराला संधी देणे अत्यंत महत्त्वाचे मानले पाहिजे. बालपणापासून खडू, विटकरी घेऊन उमटवलेल्या रेषा, गोलात चित्रकलेचा उगम दिसून येतो. गंमत म्हणजे कुठल्याही मुलानं काढलेलं कुठलंही चित्र हे केवळ त्याचं स्वतःचं अनोखं असं असतं. बालआनंद महोत्सवातल्या कुठल्याही कार्यक्रमात या विभागातच जास्त मुलांची गर्दी आढळते, ती ह्या कारणामुळेच. चित्र म्हणजे केवळ कागद, पेन्सिल, रबर, पट्टी आणि रंगच नव्हेत. ह्या विभागाप्रमाणेच संगीतामध्येही प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे सूर असतात, स्वतःचे ताल असतात. स्वतःच्या अस्मितेची, शक्तीची जाणीव होणं हे जितकं महत्त्वाचं आणि सुखदायक तितकंच आपल्या भोवतालच्या बरोबरच्या व्यक्तींची जाणीव होणंही महत्त्वाचं. ह्या सामूहिकतेची जाणीव, अनुभव बाल आनंद महोत्सवाच्या कार्यक्रमात केला जातो. त्यासाठी समूहगीते, सामूहिक नृत्य ह्या माध्यमांचा उपयोग होतो. एका आनंद मेळ्यातल्या बँकेतला हा संवाद पहा— एक मुलगी : अहो, बँकवालेकाका, आम्हांला आईसक्रीमचा कारखाना काढायचाय पैसे द्या ना जरा. आम्हा सर्व मित्रांना फार उपयोग होईल कारखान्याचा. बँकवाले– तुमच्या आधी आम्हांला एखाद्या डॉक्टरांना हॉस्पिटल बांधायला पैसे देऊ देत. मग मिळतील तुम्हांला पैसे !

असे अनेक विचार करायला लावणारे, काम करायला लावणारे, अस्मितेची वाढ करणारे, सामूहिक जाणीव देणारे, बुद्धीला चालना देणारे विभाग बाल आनंद महोत्सवात असतात. त्यांतून अनेकवार आनंद मिळवून शिणलेल्या मनाला विसावा देण्यासाठी मनोरंजन करणारे कक्ष असतात. नाटक, चित्रपट, खेळ, खेळणी, कठपुतली, विविध गुणदर्शन ह्या कार्यक्रमांनाही निर्मितिक्षम स्वशिक्षणात संजीवनाचं स्थान आहे.

अशा पद्धतीनं होणाऱ्या बाल आनंद महोत्सवात भाग घेतल्यामुळं आपल्यालाही काही येतंय— हा आत्मविश्वास, स्वतः निर्मिती केल्याचा आनंद, त्यातून मिळणारी प्रयत्नशीलता, अस्मितेची अन् समूहाची जाणीव, फुलणारं अनुभवविश्व, विचारशक्ति-कल्पनाशक्तींना चालना, चारचौघात स्वकर्तृत्वावर पुढं येण्याचं धैर्य अशा अनेक सद्गुणांचा विकास होतो. म्हणजेच मुलाचं व्यक्तिमत्त्व अनेक अंगांनी खुलवलं जातं, फुलवलं जातं. निसर्गदत्त ऊर्मींची वाटचाल नवनिर्माणाकडे होत जाते. अशी व्यक्ती केवळ तिच्या एकट्यापुरतीच मर्यादित न राहता साऱ्या समाजाच्या मूल्याचा विचार करते. त्या दृष्टीने प्रौढांनी भावी समाज सुदृढ होण्यासाठी बालकाच्या आनंदाची जोपासना करणे आवश्यक आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की बालपणातील आनंदाचे प्रमाण हे भावी जीवनातील वैशिष्ट्य ठरते. भावी व्यक्तिमत्त्वाचा पायाच मुळी ह्या काळात घातला जातो.

मोठ्यांनी लहानांसाठी साहित्य, चित्रकथा, नाटक, बालचित्रपट हे जास्त प्रमाणात निर्माण करायला हवे. त्या त्या वेळी त्यातली चांगली व वाईट गोष्ट त्यांना बरोबर बाजूला करता येते. उदा. नाटकातला राक्षस राजकन्येला पळवतो, शेवटी राजपुत्र राक्षसाला मारतो व राजकन्येची सुटका करतो. नंतर त्यांचे लग्न होते. त्यातून राक्षस वाईटच, त्याला शिक्षा झाली हेच चांगले झाले. आणि लग्नात मजा करायला मिळते, आपले सर्वजण लाड करतात, नवे कपडे, गोड खाऊ मिळतो ही मनात कल्पना असल्यामुळे त्या दोघांचे लग्न ही चांगली गोष्ट असं ते ठरवितात. येथे त्यांचा बालिशपणा दिसून येतो. अशा प्रकारच्या व्यक्ती कोणत्याही समाजात एक बाजू ठरतील.

विकासाशी सुसंगत असणाऱ्या आनंदप्रवृत्ती कोणती भूमिका बजावतात या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेतला की चार प्रमुख गोष्टी लक्षात येतात. १) सुदृढ व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी– या काळात संवेदनांचा भावानुभव, भावी संकल्पना आणि वर्गीकरण यांच्याशी निगडित होतो. चोखणे, स्पर्श करणे, ऐकणे, सगळ्या शक्ती वापरून पाहणे, नव्या अनुभवांना सामोरे जाणे हे या पायाभरणीत घडत असते. आपल्याला समजलेले सांगायला मुले किती उत्सुक असतात हे आपण नेहमी पाहतो. २) अनुभूतींच्या साधर्म्य वैधर्म्याचे बंध जाणवण्याची ही मौलिक रीत बौद्धिक, तार्किक, वर्गीकरणाच्या कठोरतेत हळूहळू सुटते, मागे पडते, काही वेळा पार गाडली जाते. आनंद प्रवृत्तींनी साधक वर्तन आणि साध्यरूप वर्तन यांचा मिलाफ, समतोल प्रस्थापित होतो. ३) आनंद प्रवृत्तींचा वैयक्तिक

उन्नतीतील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांच्या-मधून व्यक्ती विकासप्रवण होते. तेच ते आयुष्य जगण्याच्या चाकोरीबाहेर नेऊन विविधतेचा गुंतागुंतीचा, नवाच प्रत्यय आनंदप्रवृत्तींच्या द्वारा मिळत असतो. ४) आनंदप्रवृत्तींच्या द्वारे उपचारात्मक कार्यभागही साधता येतो. आनंदप्रवृत्तींचे संस्कार असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा क्रियाशील आणि ग्रहणशील नवनिर्मिती आणि रसिकता या दोन्ही धारांमध्ये शिक्षण देणे आवश्यक आहे. कारण या दोन्ही प्रवृत्ती विकृतीच्या धारेला लागू शकतात आणि परस्परांवर भ्रष्टतेची छाया आणू शकतात.

आनंदप्राप्तीची तपस्या हास्यास्पद वाटावी असे वातावरण व दडपण उत्पन्न होत आहे, परंतु मानवी शक्तींची व्यक्तरूपात येण्याची ऊर्मीच या तपस्येकडे नेत असते, हे लक्षात घेण्याची नितान्त गरज आहे. आपल्याला तिसरीत आल्यावर ‘ये ग ये ग स री’ बालिश वाटते म्हणजेच आपला आवाका वाढल्यावर आपल्या शक्तीला पुरेसे खाद्य आपण शोधीत जाणार. इतर अनेक शक्तींवर संस्कार करण्यासाठी विविध शैक्षणिक व्यवस्था कार्य करतात. आनंदप्राप्तीला मात्र त्यात क्षुल्लक मानले जाते. क्रियाशील व ग्रहणशील आनंदप्राप्तीच्या क्षमतेबाबतही हेच खरे आहे. □

---

## दुःख



उभारलेल्या ताटावरती
पाखरू बसलं
धक्का देऊनी अलगदसा
कुणीतरी गेलं
ताट राहिलं उभंच मात्र
साद घातली वाऱ्यानी
पिवळसर पर्णांमधुनी
स्वरांकित गीतांनी
ओठांवरती खुणा राणीच्या
उमटविल्या पाखरांनी
होई जीव कासावीस
निर्झरावाणी
बांध फुटतात आसवांना
पण ...
कल्पना नसते
पाखराला

**दंडवते एस. व्ही.**, द्वितीय वर्ष कला

# वार्षिक अहवाल
# १९७८-७९

## क्रीडासंघटना : वरिष्ठ महाविद्यालय

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन दैदिप्यमान यश संपादन केले आणि महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली. विविध क्रीडा प्रकारांत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांत विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी त्यांच्या अंगी असलेले क्रीडानैपुण्य दाखविले.

आंतरमहाविद्यालयीन 'जिम्नॅस्टिक्स' स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयाने प्रथमच अजिंक्यपद मिळवून महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली. त्याचप्रमाणे 'व्हॉलीबॉल' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत मुलींच्या संघाने सतत पाचव्यांदा अजिंक्यपद मिळविले. तसेच बॉल-बॅडमिन्टन स्पर्धेत विद्यार्थिनींनी सतत तिसऱ्या वर्षी विजयश्री महाविद्यालयाकडे खेचून आणली. आंतरमहाविद्यालयीन फुटबॉल, टेबल-टेनिस, बॅडमिंटन, बुद्धिबळ या स्पर्धांत उपान्त्य फेरीपर्यंत मजल मारून आमच्या विद्यार्थ्यांनी पुण्यातील क्रीडा समीक्षक आणि रसिकांची वाहवा मिळविली. त्याचप्रमाणे मल्लखांबमध्ये आमच्या महाविद्यालयास उपविजेतेपद मिळाले.

क्रीडा क्षेत्रात विविध स्तरांवर मॉडर्न महाविद्यालयाचे वैभव वाढविणारे विद्यार्थी आमच्या महाविद्यालयात आहेत याचा आम्हाला अभिमान वाटतो.

आंतरविभागीय सामन्यांसाठी आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी पुणे विभागातर्फे भाग घेतला.

१. पंधारे एम्. एम्. तृ. वर्ष कला : वजन उचलणे
२. जालनापूरकर आर. डी. प्र. वर्ष शास्त्र : मल्लखांब
३. जालनापूरकर आर. डी. प्र वर्ष शास्त्र : जिम्नॅस्टिक्स
४. मठाधिकारी पी. व्ही. तृ. वर्ष वाणिज्य : जिम्नॅस्टिक्स
५. साठे एस् एम्. द्वि. वर्ष वाणिज्य जिम्नॅस्टिक्स
६. कुलकर्णी व्ही. एम्. प्र. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
७. चौधरी आर. डी. तृ. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
८. चिंचाळकर जी.जी.तृ. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
९. कु. राका आयना तृ. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
१०. कु. स्वाती हर्डीकर द्वि. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
११. कु. आशा देशपांडे तृ. वर्ष वाणिज्य बॉल-बॅडमिन्टन
१२. कु. आशा देशपांडे तृ. वर्ष वाणिज्य व्हॉलीबॉल
१३. कु. सविता अरगडे द्वि. वर्ष वाणिज्य व्हॉलीबॉल
१४. कु. स्वाती हर्डीकर द्वि. वर्ष वाणिज्य व्हॉलीबॉल
१५. कु. कृपा सोमण द्वि. वर्ष वाणिज्य व्हॉलीबॉल
१६. कु. संध्या चाट द्वि. वर्ष शास्त्र व्हॉलीबॉल
१७. कु. स्मिता खैरे प्र. वर्ष वाणिज्य पोहणे
१८. ए. दाते एम्. कॉम्. पार्ट १ वॉटर पोलो
१९. कु. सुवर्णा कुंभारे तृ. वर्ष कला बास्केट बॉल
२०. कु. छाया कुकडे तृ. वर्ष कला बास्केट बॉल
२१. कु. जयश्री साने प्र. वर्ष वाणिज्य खो–खो
२२. सोमण ए. बी. द्वि. वर्ष शास्त्र खो–खो
२३. भागवत यु. के. द्वि. वर्ष वाणिज्य खो–खो
२४. वाकणकर ए. व्ही प्र. वर्ष वाणिज्य खो–खो

आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये खालील खेळाडूंनी पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

| | | |
|---|---|---|
| १. पंधारे एम्. एस्. तृ. व. कला | | वजन उचलणे |
| २. जालनापूरकर आर. डी. प्र. व. | शास्त्र | मल्लखांब |
| ३. जालनापूरकर आर. डी. प्र. व. | शास्त्र | जिम्नॅस्टिक्स |
| ४. साठे एस्. एम्. द्वि. व. वाणिज्य | | ,, |
| ५. कुलकर्णी व्ही. एम्. प्र. व. वाणिज्य | | बॉल-बॅडमिंटन |
| ६. कु. आशा देशपांडे तृ. व. ,, | | व्हॉलीबॉल |
| ७. कु. सविता अरगडे द्वि व. ,, | | ,, |
| ८. कु. स्वाती हर्डीकर ,, ,, ,, | | ,, |
| ९. कु. स्मिता खैरे प्र. व. वाणिज्य | | पोहणे |
| १०. दाते ए. एम्. कॉम्. पार्ट १ | | वॉटर पोलो |
| ११. कु. जयश्री साने प्र. व. वाणिज्य | | खो–खो |
| १२. वाकणकर ए. व्ही. ,, ,, ,, | | ,, |
| १३. भागवत यु के. द्वि. वर्ष शास्त्र | | ,, |

## विशेष स्मरण

६. श्री राजीव जालनापूरकर यांची रशियामध्ये होणाऱ्या मल्लखांब प्रात्यक्षिकांसाठी भारतातर्फे निवड झाली त्याबद्दल आम्हांला फार अभिमान वाटतो.

७. कु. वीना कदम आणि सीमा भापसे या मुली महाराष्ट्र महिला फुटबॉल संघातून खेळल्या.

## विशेष स्मरण

(अ) 'अमृतसर' येथे झालेल्या आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत आमच्या कॉलेजचे 'राजीव जालनापूरकर' यांनी प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण-पदक मिळविले.

(ब) आपल्या महाविद्यालयातील अतुल वाकणकर यांची खो-खो तील विशेष कामगिरी :

(१) धुळे येथे झालेल्या पुरुषांच्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक विजेल्या महाराष्ट्र संघातील खेळाडू.

(२) म्हैसूर येथील पायोनिअर्स संघाने भरविलेल्या अखिल भारतीय खो–खो स्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट संरक्षक' पारितोषिकाचा मानकरी.

(३) हैदराबाद येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेत विजेत्या पुणे विद्यापीठ संघातील खेळाडू.

(४) इंडो–सिलोन संयुक्त विद्यापीठीय शिष्य-वृत्तीचा मानकरी.

(५) त्याचप्रमाणे त्यांना आंतरविद्यापीठ क्रिडा समितीतर्फे वार्षिक रुपये १०००/– ही क्रीडा शिष्य-वृत्ती मिळविली. अभिनंदन !

## आंतरवर्गीय वार्षिक क्रीडा स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयात विविध सांघिक व वैयक्तिक खेळांच्या आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धांना विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्तम प्रतिसाद मिळाला या सर्व स्पर्धा विद्यार्थ्यांनीच उत्तम प्रकारे आयोजित केल्या होत्या. या सर्व स्पर्धांना श्री. किरण लागू, श्री. छाब्रा व आमचे विद्यार्थी प्रतिनिधी श्री. मोहन हेगडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

आमच्या महाविद्यालयात दरवर्षी प्रमाणे या वर्षीही 'मॉडर्न श्री' हा बहुमान देण्यात आला. सदर बहुमान तृ. व. वाणिज्यचे श्री. विंचूरकर यांना मिळाला तसेच श्री. सुनील सूर्यवंशी यांना या वर्षीचे मुलांचे क्रीडानैपुण्यपद मिळाले.

या वर्षी महाविद्यालयाच्या आंतरवर्गीय स्पर्धा घेतल्या गेल्या व त्यामध्ये 'जनरल चॅंपियनशिप' टी. वाय्. बी. एस्सी. या वर्गास मिळाली.

या वर्षी 'मिस मॉडर्न' स्पर्धा प्रथमच आयोजित करण्यात आली. मिस् सुनीता शिंदे यांची मिस मॉडर्न म्हणून निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी आम्हांला श्री. कोल्हटकर, श्री. दीपक गोडबोले, कु. शकुंतला खटावकर श्री. साठे, श्री. नितीन मिटकर, श्री. ओझा, श्री कुलकर्णी, कु. भारती शहा यांचे बहुमोल साहाय्य लाभले. त्यांच्या स्वयंस्फूर्त सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

आमच्या महाविद्यालयीन प्राध्यापकांनी क्रीडाक्षेत्रात खूपच सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याचा उल्लेख केल्याशिवाय अहवालाची पूर्तता होणारच नाही. आंतर विभागीय विविध उपक्रमांत आमच्या महाविद्यालयातील खालील प्राध्यापक पुणे विभागीय निवड समितीचे सदस्य होते.

(१) प्रा. अनिल नातू (२) प्रा. सुरेश दातार. (३) श्री. पी. डी. कुलकर्णी (४) श्री. किरण लागू (५) प्रा. अशोक पाथरे

| | | |
|---|---|---|
| **मोहन हेगडे** | **किरण लागू** | **प्रा. पद्माकर आपटे** |
| **कु. माधवी नातू** | क्रीडा संघटक | कार्याध्यक्ष |
| विद्यार्थी प्रतिनिधी | | |

## मॉम

कॉलेजमधील साहित्यकांच्या प्रतिभेला उजाळा देणारं, त्यांची प्रतिभा फुलविणारं आणि लालित्यपूर्ण असं आपल्या कॉलेजचं हस्तलिखित म्हणजे 'मॉम'!

१९७८-७९ या वर्षात 'मॉम' ने एकूण दहा अंक काढले. त्यापैकी काव्यविशेषांक, क्रिकेट विशेषांक, महिला विशेषांक हे अंक उल्लेखनीय ठरले. दै. केसरी, दै. प्रभात ह्या वृत्तपत्रांनी मॉमचा विशेष गौरव केला.

'मॉम' ला प्रा. श्री. द. दि. पुंडे ह्यांनी अमोल मार्गदर्शन केले. संपादनाची जबाबदारी श्री. रमेश हुंडे, 'द्वितीय वर्ष, कला' ह्यांनी यशस्वी रीतीने पार पाडली. 'मॉम' चे सहसंपादक म्हणून श्री. बा. द. गोखले व कु. स्मिता पुंडले ह्यांनी काम केले, तर सजावट, मुखपृष्ठ, हस्ताक्षर इत्यादी खाती ललित कर्नावट, सुलभा कुलकर्णी, प्रकाश पंधारे, संध्या टापरे, एल्. के. पाटील, टी. पी. मचाले आणि कु. शुभदा थिटे ह्यांनी सांभाळली.

'मॉम' ला आपल्या कॉलेजमधील सर्व लेखक-लेखिकांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केले त्यामुळेच हे अंक निघू शकले. सर्वांनी सर्वतोपरी केलेल्या साहाय्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**रमेश हुंडे**
सचिव, 'मॉम'

**प्रा. द. दि. पुंडे**
मार्गदर्शक प्राध्यापक

## वादविवाद मंडळ

वादविवाद मंडळाने आपल्या परंपरेला साजेल असे स्पृहणीय यश या वर्षीही प्राप्त केले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. (१) श्रीरामपूर येथे झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील वक्तृत्व स्पर्धेत श्री. गायकवाड जी. पी. (द्वितीय वर्ष साहित्य) व कु. स्मिता पुंडले (द्वितीय वर्ष शास्त्र) यांनी भाग घेतला. महाविद्यालयास प्रथम क्रमांकाची सांघिक ढाल मिळाली. सतत तीन वर्षे ही ढाल आपल्या महाविद्यालयास मिळत असल्यामुळे ही ढाल कायम स्वरूपात आपल्या महाविद्यालयातच राहणार आहे. श्री. गायकवाड याना उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत प्रशस्तिपत्र मिळाले.

(२) बारामती येथे झालेल्या कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत श्री. गायकवाड व कु. स्मिता पुंडले यानी भाग घेतला. वादविवाद स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाला प्रथम क्रमांक सांघिक ढाल मिळाली आहे. महाविद्यालयाला ही ढाल दुसऱ्या वेळेस मिळत आहे. त्याशिवाय श्री. गायकवाड यांना वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांकाबद्दल फिरती ढाल मिळाली असून विविध प्रकारची रु. ४४६ ची पारितोषिके मिळाली. कु. पुंडले यांना विविध प्रकारची रु. १७७ ची व्यक्तिगत पारितोषिके मिळाली आहेत.

(३) भुसावळ येथील युवक महोत्सवात वक्तृत्व स्पर्धेत कु. पुंडले यांना तृतीय क्रमांक चे प्रशस्तीपत्रक मिळाले.

(४) डॉ. हिवाळे वाद स्पर्धा, अहमदनगर, येथे श्री. प्रमोद सडोलीकर (तृ. व. वाणिज्य) आणि कु. स्मिता पुंडले यांना प्रशस्तीपत्र मिळाले.

(५) नगर येथे झालेल्या वैद्य गुणे वादविवाद स्पर्धेत कु. पुंडले व श्री. सडोलीकर यांना प्रशस्तीपत्रे मिळाली आहेत.

सर्व यशस्वी स्पर्धकांचे मनःपूर्वक अभिनन्दन.

**दि. श्री. डांगे**
विद्यार्थी-प्रतिनिधी,
वादविवाद मंडळ.

**डॉ. शं ना. नवलगुंदकर**
मार्गदर्शक प्राध्यापक

## कलामंडळ

आपल्या महाविद्यालयाने यंदाच्या वर्षी विविध स्तरांतील मुलांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास व्हावा ह्या दृष्टिकोनातून अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आयोजित केलेल्या "कालिदास संगीत" स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या समूह-गीतास तृतीय पारितोषिक मिळाले. फिरोदिया करंडक स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली. ह्या स्पर्धेमध्ये श्री. सुरेश घोलप यांची कामगिरी कौतुकास्पद होती. त्याचप्रमाणे पुणे डेक्कन जेसीज यूथ क्लब द्वारा घेण्यात आलेल्या यूथ टॅलेन्ट फेस्टिव्हलमध्ये आपल्या महाविद्यालयास खालील बक्षिसे मिळाली.

१) नाटक – हंगर-स्ट्राइक :– उपविजेते पद
२) समूहगीत :– उपविजेते पद
३) सर्वोत्कृष्ट अभिनेता :– श्री. अतुल देशपांडे
४) तबला-सोलो वादन :– धनंजय पुरंदरे

त्याचप्रमाणे भुसावळ येथे झालेल्या आंतर महा-

विद्यालयीन युवक महोत्सवात श्री. सुरेश घोलप यांना 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' हे बक्षीस मिळाले व कु. स्मिता पुंडले यांना मराठी वादविवाद स्पर्धेत तिसरे बक्षिस मिळाले. तसेच आपल्या महाविद्यालयाच्या समूह-नृत्याचा (भांगडा) प्रयोग चांगला होता. भांगडा बसविण्यासाठी सर्वश्री विलास सातभाई व राजू आजबे यांनी विशेष कष्ट घेतले. कलामंडळाचे सेक्रेटरी श्री. राजू आजबे व व्यवस्थापक प्रा. गोखले यांनी सर्व स्पर्धांच्या वेळी अनेक अडचणी बाजूला, सारून जे कष्ट केले त्याचेच प्रतीक म्हणजे आपल्या महाविद्यालयाने मिळविलेली वरील पारितोषिके हे होय.

## क्रीडा संघटना : कनिष्ठ महाविद्यालय

१९७८–७९ या शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेऊन चांगलीच प्रगती दाखविली. एकूण २२ विविध खेळांमध्ये सुमारे ३५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाग घेतला.

जिल्हा परिषदेने भरविलेल्या आंतरशालेय पावसाळी व हिवाळी सत्र स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी पुढील खेळांत हिरिरीने भाग घेतला. व्हॉलीबॉल, हॉकी, बॅडमिंटन, जिम्नॅस्टिक्स, कुस्ती, बास्केटबॉल, खो-खो, फुटबॉल, कबड्डी, टेबल-टेनिस, पोहणे व मैदानी स्पर्धा.

वरील स्पर्धांतील विशेष नैपुण्य खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| (१) जलतरण | (मुले) – | अजिंक्यपद |
| (२) खो-खो | (मुले) – | उपविजेतेपद |
| (३) खो-खो | (मुली) – | विजेतेपद |
| (४) मैदानी स्पर्धा | (मुली) – | सर्वसाधारणपद |

हॉकी, बास्केट बॉल, व्हॉलीबॉल यांतील खेळाडूंनी उपान्त्यपूर्व सामन्यांपर्यंत मजल मारली.

आंतरशालेय पुणे जिल्हा मैदानी स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थांनी विशेष नैपुण्य मिळविले.

(१) कु. वसुधा तुमपल्लीवार १२ वाणिज्य

| | |
|---|---|
| १०० मी. धावणे | प्रथम क्रमांक |
| ४०० मी. धावणे | प्रथम क्रमांक |
| लांब उडी | तृतीय क्रमांक |

(२) कु. मिथिला जवडे १२ वी वाणिज्य

| | |
|---|---|
| २०० मी. धावणे | प्रथम क्रमांक |
| ८०० मी. धावणे | प्रथम क्रमांक |

(३) कु. संगीता ताटके १२ वी शास्त्र

| | |
|---|---|
| १०० मी. धावणे | द्वितीय क्रमांक |
| ८०० मी. धावणे | द्वितीय क्रमांक |

(४) कु. अपर्णा जोशी १२ वी शास्त्र

| | |
|---|---|
| उंच उडी | प्रथम क्रमांक |

(५) कु. मिथील जवडे, सुनीता देशपांडे वसुधा-तुमपल्लीवार, व संगीता ताटके या विद्यार्थिनींनी ४ × १०० रीले स्पर्धा जिंकून नवीन उच्चांक प्रस्थापित केला. त्याचप्रमाणे महिलांच्या वैयक्तिक नैपुण्यपदाचा मान कु. वसुधा तुमपल्लीवार हिने पटकाविला.

श्री. तारीश कौशिक, १२ वी शास्त्र या विद्यार्थ्याने गोळाफेक, थाळीफेक, हातोडाफेक आंतरजिल्हा स्पर्धात नवीन उच्चांक प्रस्थापित करून सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

या वर्षी प्रथमच जलतरण स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी आमच्या महाविद्यालयास विजेतेपद मिळवून दिले.

(१) श्री. मिलिंद जोशी

| | |
|---|---|
| (अ) १५०० मी. फ्री स्टाइल | प्रथम क्रमांक |
| (ब) ४०० मी. फ्री स्टाइल | प्रथम क्रमांक |
| (क) २०० मी. फ्री स्टाइल | प्रथम क्रमांक |
| (ड) १०० मी. फ्री स्टाइल | तृतीय क्रमांक |
| (इ) १०० मी. बॅक स्ट्रोक | तृतीय क्रमांक |
| (प) २०० मी. बॅक स्ट्रोक | द्वितीय क्रमांक |
| (फ) १०० मी. बटरफ्लाय | द्वितीय क्रमांक |

(२) श्री. गोरे सुनील

(अ) २०० मी. बॅक स्ट्रोक तृतीय क्रमांक

मिलिंद जोशी, श्री. गोरे, कलकर्णी श्री. कुंटे या विद्यार्थ्यांनी ४ × १०० फ्री स्टाइल रीले पोहून सांघिक द्वितीयपद मिळविले. ४ × १०० मी. वैयक्तिक रीले (बटरफ्लाय, बॅक स्ट्रोक, फ्री स्टाइल) श्री. मिलिंद जोशी याने प्रथम क्रमांक मिळवून जलतरणातील वैयक्तिक नैपुण्य मिळविले.

श्रीनगर येथे भरविण्यात आलेल्या आंतरराज्य शालेय क्रीडा स्पर्धांत (पावसाळी) महाराष्ट्र राज्य खो-खो संघाने सतत अजिंक्यपद आपल्याकडे राखले. या विजेत्या संघाचे कुशल नेतृत्व कु. मिथिला जवडे या आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनीने केले. तिला खालील विद्यार्थिनींची सुरेख साथ लाभली.

कु. निशिगंधा अंबिके, कु. नंदिनी कुलकर्णी, कु. वसुधा तुमपल्लीवार, कु. सुनीता देशपांडे, कु. संगीता ताटके,

याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

त्याचप्रमाणे श्रीनगर येथे भरविण्यात आलेल्या आंतरराज्य शालेय क्रीडा स्पर्धात (पावसाळी) आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी भाग घेतला.

(१) श्री. असनीकर व्ही. डी.
(२) श्री. संजय जोशी
} (खो-खो)

(१) कु. सुजाता गांधी
(२) कु. सुजाता कोळमकर
} व्हॉलीबॉल.

नागपूर येथे भरविण्यात आलेल्या आंतरराज्य शालेय क्रीडा स्पर्धात (हिवाळी) आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य स्पर्धेत भाग घेतला होता.

(१) श्री. तारीश कौशिक
(२) कु. वसुधा तुमपल्लीवार

## आंतरवर्गीय स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयात विविध सांघिक व वैयक्तिक खेळांच्या आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांत विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला व त्या यशस्वी रीतीने पार पडल्या. या वर्षी मुलांचे वैयक्तिक नैपुण्यपद आय्. पी. एस्. सिध्यू-१२ वी शास्त्र व मुलींचे वैयक्तिक नैपुण्यपद कु. शुभदा थिटे- १२ वी कला हीस मिळाले. तसेच या वर्षीचे सर्वसाधारण क्रीडा नैपुण्यपद १२ वी वाणिज्य या वर्गाने पटकाविले.

क्रीडा विभागास प्राचार्य, प्राध्यापकवर्ग यांचे नेहमीच सहकार्य लाभले. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**मोहन हेगडे**
विद्यार्थी प्रतिनिधी

**किरण लागू**
क्रीडा संघटक

# शारीरिक शिक्षण विभाग : वरिष्ठ महाविद्यालय

## 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्'

आमच्या महाविद्यालयाने प्रथमपासूनच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासाकडे सर्वांगीण लक्ष दिले आहे. १९७८-७९ या शैक्षणिक वर्षात १ ऑगस्ट १९७८ रोजी शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरवात झाली. शारीरिक शिक्षणाचे वर्ग चालू असताना त्यातूनच विद्यार्थी व विद्यार्थिनींची संघनायक म्हणून निवड केली, व त्यांना ८ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट १९७८ या काळात प्रशिक्षण देण्यात आले. अशा प्रकारे ३ विद्यार्थी व ३ विद्यार्थिनींची संघनायक म्हणून निवड करण्यात आली.

प्रथम वर्ष वाणिज्य, कला व शास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून तीन दिवस याप्रमाणे तास घेण्यात आले. यंदाच्या वर्षी १५०विद्यार्थी व १२० विद्यार्थिनी अशा एकूण २७० विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षणाचा लाभ घेतला.

ह्या वर्षी विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणास आवश्यक असलेला गणवेष शरीरिक शिक्षण विभागातून योग्य दरात देण्याची व्यवस्था केली होती.

शारीरिक शिक्षणाच्या तासाच्या वेळी खालील उपक्रम घेण्यात आले.- रोड रनिंग, जिमनॅस्टिक्स, योग्य पद्धतीचा व्यायाम, छोटे-मोठे खेळ तसेच शारीरिक शिक्षणाने उंची वाढविणे, शारीरिक दोष असल्यास ते घालवणे, स्पोर्टस्, मसाज व आरोग्य सल्ला यांसारख्या विषयांवर शारीरिक शिक्षण संचालक यांनी व्याख्याने दिली. याशिवाय क्रीडांगण सफाई, गाजर गवत उच्चाटन यांसारखे सेवात्मक कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी हाती घेतले होते.

खालील विद्यार्थ्यांनी या वर्षी उत्तम शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून काम बजावले.

| | |
|---|---|
| १. श्री. देशमुख प्रसाद | प्र. व. वाणिज्य |
| २. श्री. लिमये अनिल | प्र. व. वाणिज्य |
| ३. श्री. आळेकर किरण | प्र. व. शास्त्र |
| ४. कु. हांडे शैला | प्र. व. लका |
| ५. कु. कदम बीना | प्र. व. वाणिज्य |
| ६. कु. जोगळेकर हेमलता | प्र. व. शास्त्र |
| ७. श्री. मठाधिकारी अनिल | तृ. व. वाणिज्य |

श्री. अनिल मठाधिकारी, (तृ. व. वाणिज्य), श्री. खानविलकर सुनील (द्वि. व. वाणिज्य), श्री. गोळवलकर (द्वि. व. वाणिज्य), श्री. दीक्षित (द्वि. व वाणिज्य,) श्री. कुलकर्णी (द्वि. व. वाणिज्य), श्री. मानसिंग पाटोळे (प्र. व. शास्त्र). वरील विद्यार्थ्यांनी वेळोवेळी शारीरिक शिक्षण विभागास सहकार्य केले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद !

**अनिल लिमये**
(प्र. व. वाणिज्य)
**कु. शैला हांडे**
(प्र. व. साहित्य)

**किरण लागू**
संचालक
शारीरिक शिक्षण विभाग

# शारीरिक शिक्षण विभाग : कनिष्ठ महाविद्यालय

११ वी व १२ वीचे कला, शास्त्र व वाणिज्य विभागांचे मिळून सोळा वर्गांसाठी शारीरिक शिक्षणाचे तास त्यांच्या नेहमीच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आले. प्रत्येक वर्गातील दोन (एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी) याप्रमाणे १६ विद्यार्थी व १६ विद्यार्थिनींची शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून निवड करण्यात आली. या संघनायकांना १ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट या काळात प्रशिक्षण देण्यात आले. पहिल्या सत्रात, ऑगस्ट महिन्यात सर्व विद्यार्थ्यांची उंची व छातीची मोजमापे घेण्यात आली व त्या दृष्टीने त्या बाबतीत सुधारणा घडविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

शारीरिक शिक्षणास आवश्यक असणारा गणवेष शारीरिक शिक्षण विभागातून योग्य दरात मिळण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

या वर्षी शारीरिक शिक्षण विभागाने एक समूह गीत बसविले होते. त्यासाठी डॉ. सौ. श्यामला वनारसे व प्रा. संगोराम यांच्याकडून मार्गदर्शन लाभले. आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच शारीरिक शिक्षण विभागाने या वर्षी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (N. D. A.) या ठिकाणी सहल आयोजित केली होती. या सहलीत शारीरिक शिक्षण संघनायकांनी उत्साहाने भाग घेतला.

स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

खालील विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून उल्लेखनीय काम केले.

| | |
|---|---|
| १) कु. थिटे शुभदा | १२ वी वाणिज्य |
| २) श्री. पडवे प्रशांत | १२ वी वाणिज्य |
| ३) ,, सेंगर आर. एम. | ११ वी वाणिज्य |
| ४) कु. छत्रे रेश्मा | ११ वी वाणिज्य |
| ५) कु. बावडेकर | १२ वी वाणिज्य |
| ६) कु. नरवणे व्ही. आर. | १२ वी वाणिज्य |

आमचे प्राचार्य व इतर प्राध्यापकवर्ग यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**किरण लागू**
संचालक
शारीरिक शिक्षण विभाग

**विनोदकुमार छाब्रा**
शारीरिक शिक्षण
शिक्षक

# राष्ट्रीय सेवा योजना

यंदाच्या वर्षी ९० विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये प्रवेश देण्यात आला. प्रायोगिक तत्त्वावर १२ वीच्या वर्गातून काही विद्यार्थ्यांची पथकामध्ये निवड करण्यात आली. योजनेची माहिती देणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली.

सालाबादप्रमाणे १५ ऑगष्ट व २६ जानेवारी ह्या दिवशी पथकाचे सेवाग्राम पिसोली येथे ध्वजवंदन आणि श्रमदानाचे कार्यक्रम करण्यात आले. २६ जानेवारीला होळकरवाडी येथे ग्रामस्थांच्या समवेत रस्त्याच्या कामासाठी श्रमदान ठेवण्यात आले होते.

'राखी पौर्णिमा,' 'दसरा' आणि 'मकर संक्रान्त' ह्या दिवशी अंधशाळा, रिमांड होम, लेप्रसी हॉस्पिटल, कोंढवा आणि सेंट्रल मेंटल हॉस्पिटल ह्या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले. २६ जानेवारीला लेप्रसी हॉस्पीटल, कोंढवा येथे महाविद्यालयाच्या कला मंडळाच्या विद्यार्थ्यांनी संगीत व अन्य करमणुकीचे कार्यक्रम सादर केले. ह्यासाठी श्री. घोलप, श्री. राजेंद्र जाधव ह्या तृ. व. वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पर्वती पाचगांव येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

विशेष शिबिर 'शिवतक्रारम्हाळुंगी' येथे २३ डिसेंबर, १९७८ ते १ जानेवारी, १९७९ अखेर आयोजित करण्यात आले होते. त्याचबरोबर सर्वेक्षण, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिण्यात आले होते.

'शिवतक्रार-म्हाळुंगे' ह्या गावी वर्षभरात एक दिवसाचे शिविर आयोजित करून वृक्षारोपणाचे कार्यक्रम ठेवण्यात आले होते.

पुणे विद्यापीठाच्या 'वडदाडे' ह्या मध्यवर्ती शिबिरासाठी पथकातून ११ विद्यार्थी पाठविण्यात आले होते.

वर्षभराच्या कार्यक्रमात मा. प्राचार्य व सल्लागार समितीचे बहुमोल सहकार्य लाभले.

**जयंत जोगळेकर, राजेंद्र जाधव, विलास भिलारे, रवींद्र खरात**
विद्यार्थी प्रतिनिधी

**म. आ. कुलकर्णी**
प्रमुख

# साहित्य संघटना

साहित्य संघटनेच्या कार्यकारी समितीवर या वर्षी प्रा. डॉ. शं ना. नवलगुंदकर (कार्याध्यक्ष); प्रा. डॉ. सु. व्यं. धायगुडे, प्रा. सौ. शाळिग्राम आणि प्रा. अहिरराव यांची नियुक्ती झाली. विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून श्री. निलेश दांगट, श्री. रमेश हुंडे, श्री. भोसले, श्री. सासवडे, श्री. जोशी, आणि कु. यशोधरा देसाई यांची निवड करण्यात आली.

मंडळाच्या सर्वसाधारण सभेत महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला विद्यार्थ्यांस उपयुक्त होतील अशी पुस्तके देणगी म्हणून द्यावीत असा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे नवीन सत्र पद्धतीला उपयुक्त ठरणारी पुस्तके विकत घेऊन ग्रंथालयाला देण्यात आली.

"ॐ" हे भित्तिपत्रक साहित्य मंडळाच्या वतीने प्रकाशित केले जाते. या भित्तिपत्रकाच्या संपादक मंडळावरील, निलेश दांगट, शब्बीर मुल्लाणी, प्रकाश पंदारे, कु. उमा मेहता, हरिष कांबळे, ललित कनविट, अशोक कदम यांनी अंकाचे काम पाहिले, डॉ. शं. ना. नवलगुंदकर, प्रा. सौ. कुलकर्णी ह्यांनी मार्गदर्शन केले. आतापर्यंत त्याचे तीन अंक प्रकाशित झाले, पहिला अंक 'आणीबाणीची परिस्थिती नको पण शिस्त हवी' या विवाद्य विषयावर डॉ. प्रा. भीमराव कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. दुसरा अंक 'स्वामी विवेकानंद आणि विश्वबंधुत्व' या नावाने प्रा. डॉ. सौ. श्यामला वनारसे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. तिसरा अंक 'भारताच्या लोकसंख्येचा प्रश्न' या विषयावर प्रा. चिरपुटकर यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

साहित्य संघटनेच्या वतीने ५ सप्टेंबरला 'शिक्षक दिन' साजरा झाला. त्या वेळी डॉ. दि. का. गर्दे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. ग. प्र. प्रधान यांचे अत्यंत उद्‌बोधक भाषण झाले. त्याचबरोबर प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष साहित्य वर्गाच्या वतीने प्रा. संगोराम यांच्या अध्यक्षतेखाली 'शिक्षक दिन' साजरा झाला. शिक्षकांचा गौरव करणारी विद्यार्थी-प्रतिनिधींची भाषणे झाली. १४ सप्टेंबर रोजी 'हिंदी दिन' साजरा झाला. त्या वेळी श्री. केशव प्रथमवीर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला हिंदीप्रेमी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

१९७९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. मानसशास्त्र विभागाच्या वतीने ४ ऑक्टोबर रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. सौ. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली मानसशास्त्राच्या विद्यार्थिनींनी निबंधवाचन केले, व लहान मुलांच्या मनोप्रवृतीच्या संदर्भातील विविध विषयांवर चर्चा केली. डॉ. सौ. फाटक यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्लेटोचे तत्त्वज्ञान या विषयावर निबंधवाचन आणि चर्चा सत्र हे उपक्रम करण्यात आले, तसेच भूगोल विभागाच्या वतीने C. W. P. R. S. येथे अभ्यास सहल म्हणून भेट देऊन तेथील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती करून घेतली. साहित्य मंडळाची वाटचाल चालू आहे.

संघटनेच्या या सर्व कार्यक्रमांना प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी सदस्य यांचे जे बहुमोल सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर
कार्याध्यक्ष

# शास्त्र संघटना

१९७८–७९ या शैक्षणिक वर्षासाठी शास्त्र संघटनेचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते.

कार्याध्यक्ष : प्रा. स. य. गंभीर

सदस्य प्राध्यापक सर्वश्री ए. व्ही. रायरीकर. एन्. सी. दुधाले, आर्. जी. लिमये.

विद्यार्थी प्रतिनिधी :- कु. एस्. जी. गुणे. श्री. व्ही. डब्ल्यू. कुलकर्णी, श्री. ए. एच्. भागवत, श्री. एम्. वाम्. फाटक. कु. चार एस्. एन्.

शास्त्र संघटनेचे उद्घाटन दि. ८ सप्टें. १९७८ रोजी गरवारे महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी डी. वाणी यांच्या हस्ते झाले. पाश्चात्त्य देशांत वेळोवेळी त्यांना आलेल्या अनुभवांच्या अनुषंगाने, " गरज ही शोधांची जननी आहे " या विषयावर उद्बोधक व मनोरंजक चर्चा केली.

संघटनेतर्फे पुढील विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

(१) सायन्स–न्यूज हे भित्तिपत्रक वेळोवेळी प्रकाशित करण्यात आले.

(२) प्रथम सत्रामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासाच्यादृष्टीने उपयुक्त अशा विषयांवर फिल्म्स् दाखविण्यात आल्या.

(३) प्रथम सत्रामध्ये बौद्धिक चाचणी ( Quiz-test ) घेण्यात आली.

(४) द्वितीय सत्रामध्ये शास्त्र संघटना व रसायन शास्त्र विभाग यांच्या विद्यमाने प्रवरानगर येथील विविध प्रकल्प पाहण्यासाठी औद्योगिक सहल आयोजित करण्यात आली.

संघटनेचे विविध उपक्रम घडवून आणण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींनी केलेले परिश्रम, त्यामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घेतलेला उत्साहपूर्ण सहभाग, सहकारी प्राध्यापक मित्रांची साथ, व प्राचार्य व उपप्राचार्य यांचे मार्गदर्शन याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार.

**प्रा. स. य. गंभीर**
कार्याध्यक्ष

# वाणिज्य संघटना

वाणिज्य शाखेतील द्वितीय व तृतीय वर्ष वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशा ह्या संघटनेचे हे पाचवे वर्ष. संघटनेच्या कार्यकारिणीत ह्या वर्षी पुढील विद्यार्थ्यांनी सचिव म्हणून काम पाहिले.

**विद्यार्थी सचिव : –**

१) जयंत जोगळेकर तृ. व. वा.
२) पुलकेशी मठाधिकारी – ,, –
३) सुनंदन लघाटे – ,, –
४) सुरेश घोलप – ,, –
५) सुभाष ललवाणी द्वि. व. वा.
६) शंतनु कुलकर्णी – ,, –
७) रवींद्र कोंढावदे – ,, –
८) कु. संध्या जोशी – ,, –

**संघटनेचे उपक्रम :—** १) संघटनेने ह्या वर्षी पुढील औद्योगिक संस्थांना भेटी दिल्या — दी राजा बहादुर मोतीलाल मिल्स, किर्लोस्कर न्यूमॅटिक्स, साठ बिस्किट्स लि. इ

२) संघटनेच्या 'कॉम' भित्तिपत्राचे तीन अंक प्रकाशित झाले.

३) दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तकांव्यतिरिक्त जादा पुस्तके देण्याची सोय करण्यात आली. ह्या वर्षी सुमारे ११०० रु. च्या पुस्तकांची भर संघटनेच्या पुस्तक पेढीत पडली.

मार्च महिन्याच्या शेवटी संघटनेतर्फे तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम आयोजित केला जाईल.

**अ. गो. गोसावी**
कार्याध्यक्ष

# ग्रंथालय विभाग

फेब्रुवारी १९७९ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची एकूण संख्या २३,२३० झाली. ग्रंथालयामध्ये सध्या ८७ नियतकालिके व १२ वर्तमानपत्रे घेतली जातात. विद्यार्थ्यांना नियतकालिके अभ्यासिकेत उपलब्ध करून दिली जातात व वर्तमानपत्रे विद्यार्थी करमणूक केंद्रामध्ये वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात.

विद्यापीठ अनुदान मंडळ पुस्तक पेढी योजनेतील पुस्तकांतून यंदा १६५ विद्यार्थ्यांना पुस्तक संच वर्षभर घरी वापरण्यास देण्यात आले.

कला, वाणिज्य आणि शास्त्र शाखांकडील प्रथम वर्ष ते तृतीयवर्ष या वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांना अभ्यासात जास्त उत्तेजन देण्यासाठी एक जादा वाचकपत्र देण्यात आले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासास उपयुक्त अशी २,६९१ पुस्तके आपणाकडे आहेत. ही पुस्तके गृहवाचनासाठी देण्यात येतात. वरिष्ठ महा-महाविद्यालयाप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि शास्त्र शाखांकडील प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्ष या वर्गातील गुणानुक्रमे पहिल्या पाच विद्यार्थ्यांना अभ्यासात जास्त उत्तेजन देण्यासाठी एक जादा वाचकपत्र उपलब्ध करून देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सोईच्या दृष्टीने प्रथम आणि द्वितीय सत्रांत अभ्यासिका सायंकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यात आली.

रोज सरासरी १८२ पुस्तके याप्रमाणे २८ फेब्रुवारी १९७९ पर्यंत झालेल्या ग्रंथालयीन कामकाजाच्या दिवसांत एकूण ४६,५९२ ग्रंथ गृहवाचनासाठी घरी देण्यात आले. त्याचप्रमाणे रोज सरासरीने ३२० पुस्तके, प्रश्नपत्रिका व मासिके याप्रमाणे एकूण ८१,९२० ग्रंथ अभ्यासिकेत वाचण्यासाठी देण्यात आले.

ग्रंथालय समितीच्या १९७८–७९ या वर्षात फेब्रुवारी १९७९ अखेर एकूण तीन सभा झाल्या. ग्रंथालय समितीत खालील सदस्य होते.

(१) डॉ. भीमराव कुलकर्णी (कार्याध्यक्ष व Prof. in-charge Library)

(२) उपप्राचार्य, प. स. चिरपुटकर

(३) प्रा. अ. गो. गोसावी (वाणिज्य विभाग)

(४) प्रा. म. रा. माराठे (पदार्थविज्ञान विभाग)

(५) प्रा. कु. वं. व. देशपांडे (वाणिज्य विभाग)

(६) श्री. द. गो. बापट (चिटणीस) (ग्रंथपाल)

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अभ्यासिका प्रमुख नियतकालिके, मासिके व जर्नल्स यांतील उपयुक्त लेखांची जंत्री व सूची तसेच महत्त्वाच्या लेखांची कात्रणे व त्य ची वर्गीकरणानुसार बांधणी हे आमच्या ग्रंथालयाचे वैशिष्टच आहे.

एम्. कॉम्. च्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी Open Access System ने त्यांना सर्व पुस्तके उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली आहे.

पदव्युत्तर वर्गाच्या तृतीय वर्षाचे विद्यार्थ्यांना सर्वसाधारणतः एका वेळी दोन पुस्तके गृहवाचनासाठी मिळतात. तसेच मागणीप्रमाणे त्यांना नियतकालिके व मासिके उपलब्ध करून दिली जातात.

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयाला बहुमोल ग्रंथ भेट देऊन उपकृत केले आहे.

१) डॉ. भीमराव कुलकर्णी
२) डॉ. शं. ना. नवलगुंदकर
३) प्रा. म. आ. कुलकर्णी
४) प्रा. अ. गो. गोसावी
५) प्रा. उ. भा. कोठारी
६) प्रा. बाळ आपटे
७) श्री. एस्. के देवधर
८) श्री. अरोस्कर
९) श्री. डी. के. देशपांडे
१०) श्री. एस्. एस्. वाघ
११) सौ. एस्. एस्. शहा
१२) श्री. एस्. व्ही. बेके
१३) श्री. मो. ह. पिंपळखरे
१४) श्री. एम्. व्ही. फडके
१५) श्री. अतुल व्ही. जोशी
१६) श्री. एस्. एन्. सावरकर
१७) श्री. के. सी. परदेशी
१८) श्री. आर्. एम्. छाजेड
१९) कु. शुभदा चि. थिटे
२०) ब्रिटिश लायब्ररी, पुणे
२१) प्रगती प्रकाशन
२२) राणे प्रकाशन

२३) राज प्रकाशन

२४) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, प्रकाशन

२५) ओरिएंट लाँगमन, प्रकाशन

**डॉ. भीमराव कुलकर्णी**
प्रोफेसर इन्‌-चार्ज लायब्ररी

**द. मो. बापट**
ग्रंथपाल

## वार्षिक स्नेहसंमेलन

या वर्षीचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १४, १५, १६, फेब्र. ७९ या दिवशी आयोजित केले होते. विद्यार्थी-प्रतिनिधी व वर्गप्रतिनिधी मिळून पुढील उपसमित्या करण्यात आल्या होत्या.

(१) अल्पोपहार (२) फनफेअर (३) फनी गेम्स (४) प्रदर्शन.

वरील सर्व उपसमित्यामधील विद्यार्थीप्रतिनिधी व वर्गप्रतिनिधी यांनी विविधउपक्रमांचे संयोजन चांगल्या प्रकारे केले.

वर्गवार, विविधगुणदर्शनाचे कार्यक्रम करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संमेलन यशस्वी करण्यास चांगले सहकार्य दिले.

**श्री. हेडगे**
**श्री. शहा**
**कु. नातू**
(विद्यार्थीप्रतिनिधी)

**प्रा. पद्माकर आपटे**
(कार्याध्यक्ष)

## नियोजन चर्चा मंडळ

ह्या शैक्षणिक वर्षात नियोजन चर्चा मंडळाला वैकुंठ मेहता इन्स्टिटयूटमधील श्री. अे. डी. पुराणीक ह्यांनी १६ ऑगस्ट १९७८ रोजी भेट दिली. 'शिक्षण आणि भारतीय नियोजन' ह्या विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

**प्रा. अ. ल. पाथरे**
कार्याध्यक्ष

## 'मॉडर्न मित्रमंडळ'

शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या नवागताच्या करिता बी. सी., ई. बी. सी. चे फॉर्मस भरण्यासंबंधी मॉडर्न मित्रमंडळाने मार्गदर्शन व सर्व सहाय्य उपलब्ध करून दिले. 'मराठवाड्यातील दंगल' ह्या विषयावर एक चर्चा-सत्र आयोजिण्यात आले. त्यात वाचण्यात आलेल्या निबंधाचे संक्षीप्त सार इतरत्र देण्यात आले आहे. कोजागिरी पौर्णिमेला महाविद्यालयाच्या पटांगणात मित्रमंडानी दुग्धपानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमा-बरोबरच 'प्रतिज्ञा' एकांकीचे प्रयोगही सादर करण्यात आला. उरळीकांचन येथे झालेल्या 'दलितांच्या समस्या' चर्चा सत्रास मंडळाचे १२ सभासद हजर राहून त्यानी चर्चेत भाग घेतला. मॉडर्न मित्रमंडळाच्या वर्षभराच्या कामकाजात प्रा (सौ) डॉ. शामला वनारसे, प्रा. रायकर, श्री. रवींद्र खरात, श्री. गंगाधर गायकवाड, श्री. देवधर, श्री. एस. वाय कुलकर्णी ह्यांचे बहुमोल सहाय्य झाले.

**म. अ. कुलकर्णी**
प्रमुख

## 'विद्यार्थी भांडार'

जागेची आडचण लक्षात घेऊन विद्यार्थी भांडारात होणारी जर्नल्स्‌ची विक्री यंदा प्रयोग शाळे मार्फतच करण्यात आली. दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना लागणारे सर्व प्रकारचे स्टेशनरी साहित्य भांडारामार्फत विकण्यात आले. ह्याकामी श्री शंकर येळे, श्री शेळके, श्री जोगळेकर ह्या विद्यार्थ्यांचे बहुमोल सहाय्य झाले. प्रा. आढाव ह्यांनी भांडाराच्या कामकाजात विशेष मदत केली.

**म. अ. कुलकर्णी**
प्रमुख

## STAFF ACADEMY

| Sr. No. | Day and Date | Topic | Speaker | Chairman of the Session |
|---|---|---|---|---|
| 1. | Wednesday, 27th September, 78 | "Adult Education Programme | Shri M. K. Pandhe, Education Officer, Zilla Parishad. | Shri M. K. Pandhe, Education Officer, Zilla Parishad. |

It is proposed to hold a special session to felicitate the following staff members or having successfully completed their Doctoral Research Degrees in their respective fields of studies.

| | |
|---|---|
| 1. Dr. S. V. Dhayagude | (English) A Comparative Study of Some Aspects of Western and Indian Poetics |
| 2. Dr. S M. Katdare | (Biology) Invitro studies of the Effect of actino mycene -D on the Morphogenesis of Chic Embryos in order to understand the Mechanism of its action. |
| 3. Dr. R. V. Gandhe | (Botany) Smuts in Maharashtra, |

**Dr. S Y. Paranjpe**
Secretary

**Dr. L. H. Gadgil**
Principal and President

**BLOOD DONATION PROGRAMME : LIST OF BLOOD DONORS**

1. Professor P. D. Apte
2. Prof. Mrs. Sulabha Deusker
3. Prof. Mrs. Anuradha Kulkarni
4. Miss Geeta Joshi
5. Mhalgi P. B.
6. Shinde A. B.
7. Ajbe M. C.
8. Kshirsagar S. B.
9. Belhe S. B.
10. Vilas Apte
11. Shirole P. B.
12. Lalwani S. M.
13. Inamadar A. M.
14. Joshi A. R.
15. Kher K. B.
16. Gujarathi S. B.
17. Dange D. S.
18. Pathak S. P.
19. Bhosale R. P.
20. Ghodke S. N.
21. Satbhai V. V.
22. Hegade M. S.
23. Hirve S. P.
24. Sathe J. G.
25. Dixit S. S.
26. Pungalia Bharati
27. Ranadive S. V.
28. Shakeel Shaikh
29. Patil M. M.
30. Mathadhikari P. V.
31. Potnis C. E.
32. Deshpande S. A.
33. Shinde S. P.
34. Kadake Milind
35. Bakare M. P.
36. Deshmukh C. D.
37. Vohara R. K.
38. Barve P. Y.
39. Deshpande S. P.
40. Narkhede D. B.
41. Deshmukh Mohini
42. Mishra S. L.

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती - सन १९७८-७९

| अ. क्र. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | श्री. गयावळ प्रदीप नारायण | १२ वी शास्त्र |
| २ | श्री करवा प्रकाश रामधन | १२ वी " |
| ३ | श्री. कुलकर्णी अविनाश दत्तात्रय | १२ वी " |
| ४ | श्री. निबंधे शरद चंद्रकांत | १२ वी " |
| ५ | श्री. पेद्राम दत्तकुमार बलराज | १२ वी " |
| ६ | श्री. शिरोळे सुरेश हनुमंतराव | १२ वी " |
| ७ | श्री. घोरपडे अमृतराव भगवान | ११ वी " |
| ८ | श्री. पुजारी प्रदीप रामचंद्र | ११ वी " |
| ९ | श्री. शिंदे अरविन्द बलवंतराव | ११ वी " |
| १० | श्री. शेवाळे महेन्द्रकुमार मारुती | ११ वी " |
| ११ | श्री. गोरडे विठ्ठल कारभारी | ११ वी " |
| १२ | श्री. दीक्षित मिलिन्द मधुसूदन | ११ वी " |
| १३ | कु. चावक अनिता सुरेश | प्रथम वर्ष " |
| १४ | कु. ललवाणी पौर्णिमा मोतीलाल | प्रथमवर्ष " |
| १५ | कु. गोडबोले शुभदा भास्कर | प्रथमवर्ष वाणिज्य |
| १६ | श्री. फलटणे प्रमोद जयकुमार | प्रथम वर्ष वाणिज्य |
| १७ | कु. रोहोकले उषा देवराम | द्वितीय वर्ष शास्त्र |
| १८ | कु. नाईक मंगला दिनकर | ,, |
| १९ | श्री. आंबेकर प्रकाश दिगंबर | द्वितीयवर्ष वाणिज्य |
| २० | कु. बारी प्रतिभा प्रभाकर | ,, |
| २१ | श्री. विळगी अनिल दत्तात्रय | ,, |
| २२ | कु. गोडबोले सुनदा भास्कर | ,, |
| २३ | कु. जोशी पद्मजा प्रभाकर | ,, |
| २४ | कु. कामत उज्वला अनंत | ,, |
| २५ | कु. पाठक ज्योती गजानन | ,, |
| २६ | श्री. धामणे चंद्रशेखर वसंतराव | तृतीय वर्ष शास्त्र |
| २७ | श्री. भोर नथू मारुती | ,, |
| २८ | श्री. सोनावणे मनोहर रामदास | तृतीय वर्ष वाणिज्य |
| २९ | कु चौधरी सीमा पुरुषोत्तम | प्रथम वर्ष शास्त्र |

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती

| नाव | वर्ग |
|---|---|
| १. श्री. गांधी संतोषकुमार रमणलाल | १२ वी. शास्त्र |
| २. कु. कुलकर्णी सविता सदाशिव | ,, |
| ३. श्री. ढवू चंद्रशेखर वीरभद्र | १२ वी वाणिज्य |
| ४. श्री. कुलकर्णी किरण दिगंबर | ,, |
| ५. कु. करमरकर वासंती पांडुरंग | ११ वी शास्त्र |
| ६. ,, केदारी ज्योती बाबूराव | ,, |
| ७. ,, येवलेकर माधुरी अरविन्द | ११ वी विज्ञान |
| ८. ,, हरीसंगम सुधा श्रीकृष्ण | प्रथम वर्ष शास्त्र |
| ९. ,, गडकरी स्वाती रमेशचंद्र | प्रथमवर्ग वाणिज्य |
| १० ,, गोडबोले रंजना कृष्ण | ,, |
| ११ श्री. ओस्वाल सतीषकुमार चुनीलाल | ,, |
| १२ ,, गुण सीमा गणेश | द्वि. वर्ष शास्त्र |
| १३ ,, मेहता मीनाक्षी माधव | तृ. वर्ष वाणिज्य |
| १४ ,, नगरकर शोभा मधुकर | एम्. कॉम्. पार्ट-२ |

## राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती १९७८-७९

| नाव | वर्ग |
|---|---|
| १ श्री. गणपुले माधव गोविंद | १२ वी वाणिज्य |
| २. कु. इमानदार वासंती गंगाधर | तृतीय वर्ष कला |
| ३. ,, गडकरी रोहिणी रमेशचंद्र | ,, |
| ४. कु. चित्रे शुभांगी सुरेश | द्वितीय वर्ष शास्त्र |
| ५. श्री. गावडे संतू हरीभाऊ | द्वितीय वर्ष वि. |
| ६. कु. करंदीकर रश्मी श्रीपाद | ,, |
| ७. ,, पुंडले स्मिता जयंत | ,, |
| ८. श्री मांजरेकर मधुकर रंगनाथराव | तृतीय वर्ष वि. |
| ९. ,, शेवडे नारायण बाळकृष्ण | ,, |
| १०. कु. हार्डीकर स्वाती रामकृष्ण | ,, |
| ११. श्री. केळकर प्रदीप पुरुषोत्तम | ,, |
| १२. कु. मंगरूळकर वंदना व्यंकटेश | ,, |
| १३. श्री. पाटसकर गोपाळ दत्तात्रय | ,, |
| १४. ,, पटेल यशवंत देवराम | ,, |
| १५. ,, वाल्हेकर बाळासाहेब रामचंद्र | ,, |
| १६. कु. आठल्ये पद्मजा सदाशिव | तृतीय वर्ष वा. |
| १७. श्री. महाजन राजेंद्र वसंत | ,, |
| १८. श्री. पोंक्षे विवेक दत्तात्रय | प्रथम वर्ष वि |

## गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलमधून पास झालेल्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सन १९७८-७९

| | | | |
|---|---|---|---|
| १. श्री. मेहता चंद्रकांत महादेव | द्वि. वर्ष वाणिज्य | २. श्री. खैरनार संजय दौलत | ११ वी शास्त्र |

## भारत सरकारची अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती सन १९७८-७९

१ कु. गोकुळे संध्या त्रिंबक ११ वी वाणिज्य

## गणित व विज्ञान विषयांसाठी राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती सन १९७८-७९

| | | | |
|---|---|---|---|
| १ श्री. पोंक्षे विवेक दत्तात्रय | प्रथम वर्ष शास्त्र | ४ कु. कोठाडीया संगीता फुलचंद | प्रथम वर्ष शास्त्र |
| २ कु. कदम वर्षा यशवंत | ,, | ५ कु परांजपे निलीमा मुकुंद | ,, |
| ३ श्री. निकम दीपक वामनराव | तृतीय वर्ष शास्त्र | | |

## भारत सरकारची क्रीडा शिष्यवृत्ती

| | | | |
|---|---|---|---|
| १ कु. अंबिके निशीगंधा सुरेश | १२ वी शास्त्र | ४ कु. ताटके संगीता दिनकर | ,, |
| २ कु. कुलकर्णी नंदिनी भीमराव | ,, | ५ कु. जबडे मिथिला कांतीलाल | १२ वी वाणिज्य |
| ३ कु. असनीकर विवेक दत्तात्रय | ,, | ६ कु. तुमपल्लीवार वसुधा चंद्रशेखर | ,, |

## भारत सरकारची अहिन्दी राज्यांतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी हिन्दी शिष्यवृत्ती १९७८-७९

१. कु. बांगर प्रतिभा धोंडिबा द्वितीय वर्ष कला

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | | | |
|---|---|---|---|
| १ कु. पलांडे रत्नमाला धोंडू | ११ वी कला | ११ श्री. शिंदे विजय यशवंत | ,, |
| २ कु. हॅरिस व्हिक्टोरिया विनसेंट | ११ वी शास्त्र | १२ श्री. सालसकर संजय केशव | ११ वी शास्त्र |
| ३ कु. हॅरिस मेरी विनसेंट | ,, | १३ श्री. पवार विजय बसंतराव | १२ वी ,, |
| ४ श्री. बाळु पंडीयन | ,, | १४ श्री. दळवी अरुण गजानन | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ५ कु. राणे छाया वसंतराव | ११ वी वाणिज्य | १५ श्री. डांगे सुदाम खाशाबा | ,, |
| ६ कु. चौधरी ज्योती दयानंद | १२ कला | १६ श्री. गाडे अविनाश धोंडीराम | ,, |
| ७ कु. कदम वंदना उद्धवराव | ,, | १७ श्री. जाधव मोहन शंकर | ,, |
| ८ श्री. बोराटे सुधीर दिनकर | १२ वी शास्त्र | १८ कु. माळुंजकर अंजली शरद | ,, |
| ९ श्री. मोहनचंद कुमार | ,, | १९ कु माळुंजकर मंजिरी शरद | ,, |
| १० श्री. कपिलकुमार श्रीवास्तव | ,, | २० श्री. निकम दीपक वामनराव | तृतीय वर्ष विज्ञान |

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | | | |
|---|---|---|---|
| १ कु. पाटील वर्षा रामचंद्र | ११ वी वाणिज्य | ८ कु. कामत सावित्री व्यंकटेश | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| २ श्री. ओगन्नावार विजय बाबूराव | ,, | ९ श्री. कुबेर आदित्यसेन लक्ष्मण | प्रथम वर्ष कला |
| ३ कु. जाधवराव मंदाकिनी पिलाजीराव | १२वी वाणिज्य | १० श्री देशमुख रामनाथ पांडुरंग | तृ. वर्ष कला |
| ४ श्री काळे अजय वासुदेव | ,, | ११ श्री. चिखले रघुनाथ ववन | तृ. वर्ष शास्त्र |
| ५ कु. भटेवरा चंदा अमोलक | प्रथम वर्ष कला | १२ कु. सायकर शोभा सदाशिव | तृ. वर्ष कला |
| ६ कु. पाटील विद्या रामचंद्र | ,, | १३ श्री. कुलकर्णी रवीन्द्र दत्तात्रय | तृ. वर्ष शास्त्र |
| ७ कु. ओगन्नावार पद्मावती बाबूराव | द्वि. व. कल | १४ श्री. मुंडले शशिकान्त श्रीपाद | तृ. वर्ष वाणिज्य |

## १९७९–८० मधील प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर दहा दिवसापर्यंत अग्रहक्काने जागा राखून ठेवण्यात येतील. निरनिराळ्या वर्गामध्ये सत्रपद्धतीमुळे मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा असल्याने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर पहिल्या दहा दिवसांतच प्रवेश घेणे महत्त्वाचे आहे हे लक्षात घ्यावे.

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लवकर प्रवेश घेण्यामध्ये काही आर्थिक अडचणी असतील तर त्या प्राचार्यांच्या निदर्शनास आणाव्या. त्यांचा सहानुभूतीने विचार करण्यात येईल.

पुढच्या वर्षी आर्ट्स, कॉमर्स विभागाकडे एफ्. वाय्., एस्. वाय्. प्रमाणेच टी. वाय् लाही सत्रपद्धती सुरू होईल. एफ्. वाय्. मधील जास्तीत जास्त दोनच अभ्यासक्रम मागे राहिलेल्यांना एस्. वाय्. मध्ये प्रवेश मिळेल.

टी. वाय्. बी. ए. ला जो 'विशेष' विषय म्हणून विद्यार्थ्यांना घ्यावयाचा असेल, त्याचे दोन पेपर्स एस्. वाय्. लाच शिकविण्यात येतील. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्याला स्पेशल अभ्यासक्रम घ्यावयाचा का 'जनरल' याचा आताच निर्णय करणे अवश्य आहे. ११ वीचे निकाल लागल्या दिवसापासून बारावीला प्रवेश देण्यात येतील.

बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना ज्येष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळेल व एफ्. वाय्. पासून सत्रपद्धती ( Semester System ) असल्यामुळे या विद्यार्थ्यांनी विषय निवडीबाबत अतिशय चोखंदळ व जागरूक राहणे आवश्यक आहे.

सत्रपद्धतीमुळे वर्ग व तास वाढतील. त्यामुळे पुढच्या वर्षी वेळापत्रकामध्ये बरेच बदल करावे लागतील. विद्यार्थ्यांनी सूचना-फलकावर वेळोवेळी त्यासंबंधाने ज्या सूचना लावल्या जातील तिकडे लक्ष ठेवावे.

प्रवेश अर्ज व माहितीपत्रकासाठी परगावच्या विद्यार्थ्यांनी दि. १ जूननंतर रु. २ ची मनिऑर्डर पाठवावी म्हणजे पोस्टाने माहितीपत्रक पाठविले जाईल. महाविद्यालयात कामाच्या वेळेत ( ११ ते ३ ) माहितीपत्रक व प्रवेश अर्ज १ जून १९७९ पासून मिळण्याची व्यवस्था केली आहे.

प्राचार्य

PROGRESSIVE EDUCATION SOCIETY, POONA 5

## INSTITUTIONS

| | |
|---|---|
| Modern High School, Poona 5 | ( Estd. 1934 ) |
| Modern High School, Poona 8 | ( ,, 1967 ) |
| Prathamik Vidya Mandir | ( ,, 1936 ) |
| Sir Sassoon David Hostel ( For Boys ) | ( ,, 1940 ) |
| Girls' High School | ( ,, 1946 ) |
| Shishu Vidya Mandir | ( ,, 1968 ) |
| Girls' Hostel, Poona 5 | ( ,, 1968 ) |
| Modern College of Arts, Science & Commerce | ( ,, 1970 ) |
| N. C. L. Kindergarten and Primary English Medium School, Poona 8 | ( ,, 1976 ) |

---

The Progressive Education Society's Institutions are absolutely non-sectarian in character and offer special facilities to poor, deserving pupils of all classes without distinction of caste and creed.